



# आपला महाराष्ट्र


मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३४१ ■ रविवार १३ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

Post Regd.No./DHL/53/24-26



बॉम्बे चष्माघर

गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


## ब्रिक्सने वीस वर्षे महत्त्वाकांक्षी अजेंड्यावर काम करावे ग्लोबल गव्हर्नन्ससाठी दहा प्रस्ताव तयार करावे : मोदी

**नवी दिल्ली, दि. १२ : ब्रिक्सच्या अठराव्या शिखर परिषदेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संघटनेच्या भविष्यातील वाटचालीसाठी महत्त्वाकांक्षी अजेंडा निश्चित करण्याचे आवाहन केले. ब्रिक्सला वीस वर्षे पूर्ण झाली असून पुढील वीस वर्षांसाठी नव्या दिशेने काम करण्याची गरज असल्याचे मोदी यांनी सांगितले. भारताकडे असलेल्या ब्रिक्सच्या अध्यक्षपदाच्या काळात लोककेंद्री आणि मानवता प्रथम, या दृष्टिकोनाला प्राधान्य देण्यात आल्याचे मोदी म्हणाले. लवचिकता, नाविन्यता, सहकार आणि शाश्वतता या भारताच्या प्रमुख प्राथमिकता राहिल्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ब्रिक्सशी सामान्य नागरिकांना जोडण्यासाठी भारताने विविध उपक्रम राबविल्याचेही त्यांनी सांगितले.**



ब्रिक्सच्या अध्यक्षपदाच्या काळात साडेतीनशे पेक्षा अधिक बैठका घेण्यात आल्या आहेत. तीस शहरांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे मोदी यांनी सांगितले. ब्रिक्सने गेल्या वीस वर्षांत जागतिक मंचावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ही संघटना कोणाविरोधात नसून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याच्या भूमिकेवर आधारित असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील वीस वर्षांसाठी नव्या आणि महत्त्वाकांक्षी अजेंड्यावर काम करण्याची गरज आहे. यासाठी ब्रिक्सच्या कामकाजाच्या पद्धतीतही बदल करणे आवश्यक असल्याचे मोदी म्हणाले. निर्णयांच्या अंमलबजावणीवर भर ब्रिक्सचे (पान ८ वर)

### युद्ध सर्वांच्या हिताविरूध्द : शी जिनपिंग

नवी दिल्ली : ब्रिक्स शिखर परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी मध्यपूर्वेतील आणि आखातातील सध्याच्या संघर्षावर चिंता व्यक्त केली. या युद्धामुळे त्या भागातील नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून, हा संघर्ष आंतरराष्ट्रीय समुदायाच्या हिताचा नाही, असे जिनपिंग यांनी म्हटले. मध्यपूर्व आणि आखातातील संघर्षामुळे निर्माण झालेली अस्थिरता थांबवून शांतता आणि सुरक्षा कायम ठेवण्यावर भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी ब्रिक्स देशांनी अधिक सक्रिय भूमिका बजावावी, तसेच सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या मुद्द्यांवर सदस्य देशांमधील समन्वय वाढवावा, असे आवाहन त्यांनी केले. (पान ८ वर)



### बारा राज्यात मुसळधार नंदुरबारला ऑरेंज अॅलर्ट

नवी दिल्ली, दि. १२ : अल निनोचा प्रभाव संपूर्ण देशात दिसून येत आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये समाधानकारक पाऊस झालेला नाही. अनेक भागातील पावसाची तूट वाढताना पाहायला मिळत आहे. याचा परिणाम जलसाठ्यांवर झालेला दिसत आहे. पाऊस कमी झाल्याने अनेक धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली नाहीत. शेतकरी बांधवही संकटात आहेत. अशातच देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून पुढील तीन दिवसांत हे क्षेत्र ओडिशापासून गुजरातपर्यंत पुढे सरकण्याचा अंदाज आहे. बारा सप्टेंबरला (पान ८ वर)

## लोक अदालतीच्या माध्यमातून मनपाच्या तिजोरीत एक कोटींहून अधिक भरणा

**धुळे, दि.१२- राष्ट्रीय लोक अदालतीच्या अनुषंगाने धुळे महानगरपालिकेने थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी राबविलेल्या विशेष मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवारी दि.१२ सप्टेंबर जिल्हा न्यायालयात आयोजित लोक अदालतीत मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. दुपारी एक वाजेपर्यंत मनपाच्या तिजोरीत एक कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता कर जमा झाला.**

धुळे महानगरपालिकेने ५० हजार रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता कर थकीत असलेल्या सुमारे चार ते पाच हजार मालमत्ताधारकांना नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिसांच्या अनुषंगाने राष्ट्रीय लोक अदालतीत थकीत मालमत्ता कर भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. थकीत करावरील शास्तीमध्ये माफी देऊन नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले होते.



या आवाहनाला प्रतिसाद देत शनिवारी सकाळपासूनच जिल्हा न्यायालयाच्या परिसरात मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांची गर्दी होऊ लागली. कर भरण्यासाठी नागरिकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. अनेक मालमत्ताधारकांनी लोक अदालतीच्या माध्यमातून थकीत कराचा भरणा करून शास्तीमाफीचा (पान ८ वर)

## महिला आंदोलकांना जरांगेंचा संदेश फडणवीस-शिंदेंच्या सौ.ना लेणं द्या

**जालना, दि. १२ : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषण करणारे मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईतील आंदोलनाबाबत मोठी घोषणा केली आहे. उपोषणाच्या १५ व्या दिवशी त्यांनी २० सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, महिला आंदोलकांनीही मुंबईला सोबत येण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावर जरांगे यांनी महिला आंदोलकांसाठी वेगळी भूमिका मांडली. मराठा महिलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे यांच्या घरी हळदी-कुंकू घेऊन जावे, असे आवाहन केले. हळदी-कुंकू हे सौभाग्याचे प्रतीक असल्याचे सांगत त्यांनी या माध्यमातून सरकारवर निशाणा साधला.**



मनोज जरांगे म्हणाले की, महिलांनी (पान ८ वर)

### गरूड वाचनालयात आज सत्यशोधक मेळा

धुळे, दि.१२- शहरातील जेलरोड गरूड वाचनालयाच्या शिंपी सभागृहात दि.१३ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता विद्रोही सांस्कृतिक चळवळ आयोजित सत्यशोधक मेळा हे प्रा.डॉ. लिलाधर पाटील लिखित विशेष पथनाट्य सादर केले जाणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.अशोक पवार भुषविणार आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त डॉ. लिलाधर पाटील यांचे व्याख्यान होणार असून सत्यशोधक मेळा हे प्रबोधनात्मक पथनाट्य सादर केले जाणार आहे. या वेळी कॉ.किशोर ढमाले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. (पान ८ वर)




### संजय सोया प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

## राज्य व राष्ट्रीयस्तरावर पदकांची कमाई करणाऱ्या कर्तृत्ववान कुस्तीगिरांचा रोख रक्कम देऊन सन्मान

धुळे, दि.१२- धुळे जिल्ह्याला कुस्तीची समृद्ध आणि गौरवशाली परंपरा लाभली असून, या लाल मातीने अनेक नामवंत कुस्तीगीर घडविले आहेत. याच परंपरेचा वारसा पुढे नेत राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाची छाप पाडणाऱ्या जिल्ह्यातील होतकरू कुस्तीगीरांचा संजय सोया प्रतिष्ठानच्या वतीने रोख रक्कम, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

धुळे जिल्ह्यातील कुस्तीगीरांनी आपल्या अथक परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर शालेय, विद्यापीठ तसेच विविध संघटनांच्या माध्यमातून आयोजित राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अनेक खेळाडूंनी या स्पर्धांमध्ये पदके मिळवून धुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या खेळाडूंच्या कर्तृत्वाची दखल घेत त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून हा अनोखा उपक्रम राबविण्यात येत आहे.

धुळे शहर आणि जिल्ह्याला लाल मातीची स्वतंत्र ओळख आहे. कुस्तीच्या आखाड्यात घाम गाळत अनेक पिढ्यांनी या परंपरेला समृद्ध केले आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्राप्रमाणेच क्रीडा क्षेत्रातही धुळे जिल्ह्याचा ठसा उमटला आहे. ग्रामीण भागापासून शहरापर्यंत अनेक व्यायामशाळा आणि तालमींमध्ये आजही युवा कुस्तीगीर मेहनत घेत आहेत. या खेळाडूंना योग्य खुराक, आर्थिक मदत आणि प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

तीन वर्षांपासून उपक्रम सुरु

धुळे जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे आणि प्रमुख आश्रयदाते संजय शेठ अग्रवाल यांच्या पुढाकारातून हा उपक्रम गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे. कुस्तीगीरांना केवळ कौतुकाची थाप न देता त्यांच्या प्रशिक्षणासाठी आणि खुराकासाठी प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

विशेष प्रावीण्य दाखविणाऱ्या कुस्तीगीरांना खुराकासाठी सुकामेवा तसेच रोख रक्कम देण्यात आली. त्याचबरोबर राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना भरीव रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. संजय सोया प्रायव्हेट लिमिटेड प्रतिष्ठानच्या सौजन्याने हा उपक्रम राबविण्यात येत असून, त्यामुळे आर्थिक अडचणी असलेल्या गुणवंत खेळाडूंनाही पुढील वाटचालीसाठी मोठे पाठबळ मिळत आहे. कान्हा रीजन्सी, (पान २ वर)

## शिक्षणानेच जीवनात बदल होऊ शकतो आ. अमरिशभाई पटेल यांचे प्रतिपादन

**शिरपूर, दि.१२- ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले, तर ते राज्य, देशच नव्हे तर जागतिक पातळीवरही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकतात. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन सातत्याने झाले पाहिजे. शिक्षणानेच माणसाच्या जीवनात खरा बदल घडू शकतो. स्वत:ची प्रगती साधतानाच समाज आणि देशाच्या विकासात योगदान देण्याची भावना मनात ठेवावी. प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तम शिक्षण आणि पुढे जाण्याची संधी मिळावी, हीच आपली भूमिका आणि आपले ध्येय आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी केले.**



आमदार अमरिशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त शिरपूर तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन राजगोपाल चंदुलाल भंडारी हॉल, आर.सी. पटेल मेन बिल्डिंग, शिरपूर येथे १२ सप्टेंबर रोजी सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या संस्था ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, ट्रस्टी सौ. कृतिबेन पटेल, ट्रस्टी सौ. स्नेहादीदी पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, खजिनदार बबनराव अग्रवाल, गोपाल भंडारी, अतुल भंडारी, विजय भंडारी, उपनगराध्यक्षा सौ. संगिता देवरे, देवेंद्र पाटील, संचालक मंडळ, अधिकारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमीक इन्चार्ज पी. व्ही. पाटील, विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिरपूर तालुक्यातील पदाधिकारी, नागरिक, तालुक्यातील इंग्रजी शिक्षक, स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग :कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक प्रदीप गहिवरे यांनी तालुकास्तरीय (पान ८ वर)

## वडिलांचा चिमुकल्या मुलींवर काचेच्या बाटलीने प्राणघातक हल्ला; चार वर्षांच्या बालिकेचा मृत्यू

**सोनगीर दि. १२(प्रतिनिधी)- मानसिक संतुलन बिघडलेल्या तरुणाने आपल्याच दोन चिमुकल्या मुलींवर काचेच्या बाटलीने सपासप वार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची अत्यंत धक्कादायक आणि सुन्न करणारी घटना सोनगीर बारी परिसरात शुक्रवारी दुपारी घडली आहे. या दुर्दैवी हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या चार वर्षांच्या मोठ्या मुलीचा शनिवारी सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दुसरीवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. घटना घडल्यानंतर शनिवारी (दि. १२) सकाळी फॉरेन्सिक टीम आणि सोनगीर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने घटनास्थळाची पाहणी करून पुरावे गोळा केले व पंचनामा पूर्ण केला.**

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील सेंधवा (जि. बडवाणी) येथील रहिवासी



असलेले सोलंकी कुटुंब मूळ गावी जाण्यासाठी निघाले होते. शुक्रवारी (दि. ११ सप्टेंबर) सकाळी धुळे-शिरपूर मार्गाने जात असताना, पती दिनेश आसाराम सोलंकी (वय २१) याचे अचानक मानसिक संतुलन बिघडले. त्याने धावत्या गाडीतच पत्नी राधिका सोलंकी आणि दोन लहान मुली नित्या (वय २) व दिव्या (वय ४) यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. परिस्थिती बिघडल्याने वाहनचालकाने त्यांना सोनगीर बारी परिसरातील हायवेवर उतरवून दिले.

गाडीतून उतरल्यानंतर अधिकच चिडलेल्या दिनेशने स्वतःच्या अंगावरील कपडे काढून पत्नीवर धाव घेतली. पत्नीने प्रसंगावधान राखून तेथून पळ काढून जीव वाचवला. मात्र, संतापलेल्या दिनेशने आपल्या दोन्ही निष्पाप मुलींना जवळच असलेल्या पुलाखाली नेले. तेथे पडलेल्या (पान ८ वर)






## नंदुरबार जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या- शिवसेना उबाठाचे प्रशासनाला निवेदन

**नंदुरबार, दि.१२– जिल्ह्यात यंदा अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिकांवर मोठे संकट ओढावले आहे. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पिके वाळण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे जिल्ह्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख पंडित माळी यांनी प्रशासनाकडे केली आहे. विविध म**



**ागण्याचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी आशा सिंगवी यांना देण्यात आले.**

अपुऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणी, बियाणे, खते, औषधे आणि मशागतीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाली आहे. उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असल्याने (पान ८ वर)

### मित्रनगर, आर्वी येथे महामार्गावर

## तासंतास वाहतुकीचा होतो आहे खोळंबा जिल्हाधिकारी, पो.अधीक्षक लक्ष घालावे

**धुळे, दि.१२- मित्र नगर, आर्वी या परिसरात सुरू असलेल्या मुंबई आग्रा महामार्गावरील कामांमुळे जबरदस्त वाहतुकीची कोंडी सायंकाळ नंतर होत असून जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग व राष्ट्रीय महामार्ग यांनी तातडीने कारवाई करणे गरजेचे झाले आहे.**

मालेगावकडून येतांना तसेच मालेगावकडे जातांना दोन्ही बाजुने जाणाऱ्या वाहनांची या ठिकाणी कोंडी होत असून अवघ्या पाच किलोमिटरचा पट्टा पार करण्यासाठी दोन ते अडीच तास लागतात.या सगळ्यामध्ये वाहनांचे इंधन, वाहनचालकाचे श्रम यातुन होणारा त्रास वर्णन करण्यासारखा नाही. सायंकाळ नंतर सरळ महामार्ग रामभरोसे सोडला जातो. दिवसा काही प्रमाणात काम करणाऱ्यांची माणसे वाहतुक सुरळीत करण्याच्या प्रयत्नात दिसतात. व धिम्या गतीने का असेना, पण वाहतुक सुरू राहते. सायंकाळ नंतर वाहतुक वाढल्यानंतर व या व्यवस्थेवर लक्ष देण्याकरीता कोणीही नसतांना परिस्थिती अधीक भयानक होते. लहान मुले, महिला या प्रवाशांची मोठी कुचंबणा होते. बस गाड्याही दोन दोन तीन तीन तास अडकल्याने प्रवाशांना उशीर तर होतोच पण त्याचवेळेला महिला प्रवाशांना किती कुचंबणा सहन करावी लागते याचे वर्णन केले जावू शकत नाही. अनेक खाजगी वाहन चालक मुंबईला जाण्यासाठी औरंगाबाद मार्गे (पान ८ वर)


दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -1,39,700 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,000 रु.+3% GST
चांदी- 2,34,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



भैय्यासाहेब अनुपजी अग्रवाल

धुळ्याचे लोकप्रिय आमदार
धर्मयोद्धा व धुळ्याचे भाग्य विधाता
श्री. अनुपजी अग्रवाल
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

: शुभेच्छूक :
अग्रवाल समाज, धुळे

# नंदुरबारसह राज्यातील छत्तीस जिल्ह्यांमध्ये स्वतंत्र मराठी भाषा कार्यालय- ना.सावंत

**नंदुरबार, दि.११- मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार अधिक प्रभावीपणे करण्यासाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये स्वतंत्र मराठी भाषा कार्यालये सुरू करण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातही स्वतंत्र मराठी भाषा कार्यालय सुरू करून त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात किमान ५००चौरस फुटांची जागा उपलब्ध करून देण्यात यावी, असे निर्देश उद्योगमंत्री तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिले.**

नंदुरबार येथे साहित्यसमवेत संवाद व आढावा बैठक बिरसा मुंडा सभागृहात संपन्न झाले. यावेळी उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.सामंत बोलत होते. या परिषदेस आमदार चंद्रकांत रघुवंशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.अनबलगन पी, मराठी भाषा विभागाचे भाषा संचालक डॉ.अरुण गिते, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी आदी उपस्थित होते.

उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्यातील मराठी भाषा कार्यालयात महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत प्रकाशित करण्यात आलेली पुस्तके, ग्रंथ आणि साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मराठी भाषेच्या वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी हे कार्यालय महत्त्वपूर्ण ठरेल. मराठी भाषेच्या प्रमाण भाषेबरोबरच विविध बोलीभाषांचे जतन आणि संवर्धन करण्याची गरज आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भाषा, अहिराणी



तसेच स्थानिक बोलीभाषांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येतील. भाषा आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन साहित्य संमेलने, सांस्कृतिक महोत्सव आणि विविध भाषिक उपक्रमांचे आयोजन करता येईल. यासाठी मराठी भाषा अधिकारी समन्वयक म्हणून काम करेल. जिल्ह्यात दरवर्षी मराठी भाषा, साहित्य, बोलीभाषा आणि संस्कृतीशी संबंधित संमेलन आयोजित करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

जिल्ह्यातील लेखकांचे प्रकाशित साहित्य शासन खरेदी करणार नंदुरबार जिल्ह्यातील लेखकांनी प्रकाशित केलेल्या मात्र ग्रंथालयांपर्यंत पोहोचू न शकलेल्या पुस्तकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून अशा पुस्तकांची खरेदी करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून योग्य पुस्तकांची निवड करून त्याच्या प्रती शासन खरेदी करेल आणि त्या जिल्ह्यातील विविध ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. यामुळे नंदुरबारमधील लेखकांनी लिहिलेले साहित्य केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित न राहता जिल्ह्यातील वाचक आणि ग्रंथालयांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

वाहरू सोनवणे यांच्या गावाला पुस्तकांचे आणि कवितांचे गाव करणार

ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक वाहरू सोनवणे यांच्या श्रीखेडा गावाला पुस्तकांचे आणि कवितांचे गाव करणार असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. तसेच आदिवासी साहित्य, बोलीभाषा आणि मौखिक साहित्य परंपरेला मुख्य प्रवाहातील मराठी साहित्याशी जोडण्यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी साहित्यीकांनी नंदुरबार हा विविध मराठी बोलीभाषांनी समृद्ध असलेला आदिवासीबहुल जिल्हा आहे. अभिजात मराठी भाषा अधिक समृद्ध करायची असेल तर नंदुरबारसारख्या जिल्ह्यांमधील बोलीभाषांचे जतन आणि संवर्धन आवश्यक आहे. त्यासाठी बोलीभाषा संवर्धन केंद्र उभारण्याची अपेक्षा व्यक्त केली.




# आर.सी.पटेल महा.त आयडीपीसी फॅकल्टी कार्यशाळा उत्साहात संपन्न

**शिरपूर, दि.१२- आर. सी. पटेल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात स्वामीनारायण संस्थेच्या मइंटेग्रेटेड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट कोर्सफ (आयडीपीसी) अंतर्गत फॅकल्टी ओरिएंटेशन वर्कशॉप ऑन प्लॅनिंग अँड कंडक्टिंग आयडीपीसी या विषयावर फॅकल्टी ओरिएंटेशन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**

या कार्यशाळेसाठी बीएपीएस स्वामीनारायण संस्थेचे आयडीपीसी तज्ञ मार्गदर्शक हरिक्रिष्ण गोहिल हे प्रमुख संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. त्यांनी आयडीपीसी ची मूळ संकल्पना, तिची उद्दिष्टे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रमांचे प्रभावी नियोजन, आयोजन व अंमलबजावणी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. अपयश हे यशाच्या दिशेने वाटचाल करण्यातील अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. अपयशाची खंत न बाळगता त्यातील कारणांचे विश्लेषण करून त्यातून सकारात्मक धडे घेणे व पुढील उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यशासाठी योग्य नियोजन, सातत्य, संघभावना, प्रभावी संवाद आणि उपक्रमांचे योग्य मूल्यमापन या पंचसूत्रीचे महत्त्व विविध उदाहरणांद्वारे विशद केले. त्यांनी खेळ व कृतीआधारित उपक्रमांमध्ये प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यशाळेत प्राध्यापकांशी संवाद साधताना त्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम, वेळेचे व्यवस्थापन, प्राध्यापकांचा व्यावसायिक विकास आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे आयोजन याविषयी व्यावहारिक दिशा दाखवली.

सदर कार्यशाळा प्राचार्य प्रा. डॉ. हितेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. गौरव पिंगळे यांनी नियोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रा. अपर्णा जगताप यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थापनशास्त्र विभागप्रमुख प्रा. मानसी वैद्य, प्रा. नुपूर अग्रवाल, प्रा. नंदकिशोर सोनार, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा. ऐश्वर्या पंजवाणी, प्रा. गोपाल बिडे, प्रा. रामकुमार सूर्यवंशी यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यशाळेला प्राध्यापकवृंदाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# शहाद्यात अठरा सप्टें.ला पुरूषोत्तम वक्तृत्व स्पर्धा

**शहादा,दि.१२ (का.प्र.)- स्वातंत्र्यसैनिक, सहकार व शिक्षणमहर्षि कै.अण्णासाहेब पी. के. पाटील यांच्या १२ व्या स्मृती दिनानिमित्त पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ व श्री. पी. के. अण्णा पाटील फाउंडेशन, शहादा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन विभागीय पुरुषोत्तम वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर विश्वेश्वरैय्या सभागृह, शहादा येथे संपन्न होणार आहे.**

पुरोगामी महाराष्ट्रातील पश्चिम खान्देशात गांधी विचारांची आच, आस आणि कास जपणारे व्यक्तिमत्व कै. अण्णासाहेब पी. के. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण, सहकार व समाजसुधारणेसाठी अर्पण केले. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील यांच्या नेतृत्वात आज ही संस्था शिखराप्रत पोहोचली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार या चार जिल्ह्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व गुणांना वाव देण्याचा प्रयतक केला जात आहे.स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पुरुषोत्तम पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट वक्त्यांना



रोख पारितोषिक आणि चषक देऊन गौरविले जाईल. प्रथम पारितोषिक: रु. १००००/-, द्वितीय पारितोषिक: रु. ७०००/-, तृतीय पारितोषिक: रु. ५०००/- उत्तेजनार्थ (२ पारितोषिके): प्रत्येकी रु. १०००/- असे एकूण रु. २०००/-. जाहीर केलेल्या पारितोषिकांची ५०% रक्कम विजेत्या स्पर्धकास व ५०% रक्कम विजेत्या स्पर्धकाच्या महाविद्यालयास प्रदान करण्यात येईल.

वक्तृत्व स्पर्धेचे विषय महाराष्ट्र माऊली साने गुरुजींची साहित्य साधना, युद्ध नको बुद्ध हवा, मन माझे सुंदर होवो, सोशल मीडिया: संवादाचे माध्यम की एकटेपणाची सुरुवात, प्रगतीच्या शर्यतीत आपण नेमके काय गमावले? हे आहेत. नोंदणीची अंतिम मुदत: दिनांक १५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक जगदीशभाई पाटील (उपाध्यक्ष), प्रा. मकरंदभाई पाटील (सचिव), संयोजक समितीचे अध्यक्ष डॉ. विश्वास पाटील, कार्याध्यक्ष डॉ. एस. पी. पवार, सचिव प्रा. नेत्रदीपक किशोर कुवर, मार्गदर्शक माजी प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील आणि समिती सदस्य प्राचार्य डॉ. एम. के. पटेल, प्राचार्य डॉ. पी. एल. पटेल, प्राचार्या कीर्ती एल. महाडीक, उपप्राचार्य प्रा. कल्पना काशिनाथ पटेल, डॉ. विजयप्रकाश ओ. शर्मा, डॉ. चंद्रशेखर एस. सुतार व डॉ. तुषार पटेल परिश्रम घेत आहेत.

# हस्ती पब्लिक स्कूलला राष्ट्रीयस्तवर पुरस्कार

**दोंडाईचा, दि.११- दोंडाईचा परिसरात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण, अत्त्याधुनिक सोईसुविधा सोबतचप्रभावी अध्यापनाच्या पद्धतींचा वापर करत इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्यात गेल्या वर्षांपासून सदैव अग्रेसर असणाऱ्या हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, हस्ती पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज, दाऊळ शिवार, दोंडाईचा या स्कूलला नॅशनल स्कूल अवॉर्ड या संस्थेतर्फे राष्ट्रीय स्तरावरील भविष्यातील शिक्षणासाठी उत्कृष्ट स्कूल म्हणून पुरस्काराच्या सन्मान प्राप्त झाला आहे.**




सदरच्या हस्ती पब्लिक स्कूल ला मिळालेला हा पुरस्कार नॅशनल स्कूल अवॉर्ड संस्थेमार्फत दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी वेलकम हॉटेल, नवी दिल्ली येथे दिमाखदार सोहळ्यात वितरित करण्यात आला. हा पुरस्कार शिखा ढील्लोन ,फाऊंडर डायरेक्टर नॅशनल स्कूल अवॉर्ड तसेच सांताराम प्रभाकर सेवानिवृत्त सहसंचालक लोकसभा, यांच्या शुभहस्ते मयंक जैन, संचालक,हस्ती पब्लिक स्कूल यांनी स्विकारला.

नॅशनल स्कूल अवॉर्ड ही संस्था संपूर्ण भारतातील शाळा, शिक्षक, प्राचार्य व संचालक या विविध घटकांना एकत्र आणणारे व्यासपीठ आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या व संस्थांचा या संस्थेमार्फत गौरव केला जातो. शिक्षणातील गुणवत्ता, प्रभावी अध्यापन पद्धती, नाविन्यपूर्ण उपक्रम, तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापर, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि भविष्यातील शिक्षणासाठी शाळांची तयारी यांना संस्थेकडून विशेष महत्त्व दिले जाते. शाळांना नव्या कल्पना आणि उत्तम पद्धती स्वीकारण्यासाठी प्रेरित करणे हा या संस्थेचा उद्देश आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या सन्मानामुळे हस्ती पब्लिक स्कूलच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाली आहे. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकांपर्यंत मर्यादित न ठेवता आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्याधारित शिक्षण, सर्जनशील विचार आणि बदलत्या जगाशी जुळवून ठेवत आहे तसेच भविष्यातील पिढीला सक्षम , आत्मविश्वासपूर्ण शिक्षण देण्याच्या शाळेच्या प्रयतकांना अधिक बळ मिळालं आहे. या राष्ट्रीय पुरस्काराच्या सन्मानाबद्दल हस्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व उद्योगपती अशोक जैन, कार्याध्यक्ष किशोर जैन, हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन, संचालक मंडळ व प्राचार्या रजिया दाऊदी यांनी अभिनंदन केले. यापूर्वी हस्ती स्कूलने राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ५५ पेक्षा अधिक पुरस्कारांचे सन्मान प्राप्त केले आहेत. नॅशनल स्कूल अवॉर्ड या राष्ट्रीय पातळीवरील मिळालेल्या पुरस्काराच्या सन्मानामुळे हस्तीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

# धुळ्याच्या विकासाला नवी ऊर्जा पुढील झेपेसाठी सक्षम पारेषण व्यवस्था

**धुळे, दि.१२- महाराष्ट्रातील विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी जुन्या वीज जाळ्याची क्षमता वाढवून आधुनिक आणि उच्च क्षमतेच्या आंतरराज्य पारेषण कॉरिडॉरची उभारणी करणे आवश्यक आहे. या बदलाच्या केंद्रस्थानी धुळे जिल्हा आहे. नव्या वीजस्रोतांशी उच्च क्षमतेची जोडणी झाल्याने जिल्ह्याच्या ऊर्जा पायाभूत सुविधांना अधिक बळकटी मिळू शकेल.**

विश्वसनीय वीजपुरवठा हा धुळ्याच्या विकासाच्या पुढील टप्प्याला गती देणारा महत्त्वाचा घटक आहे. यामुळे नवीन गुंतवणूक आकर्षित करणे, औद्योगिकीकरणाला चालना देणे आणि स्थानिक रोजगाराच्या संधी वाढविणे शक्य होते.

वीजेचा लाभ केवळ आर्थिक घडामोडींनाच होत नाही. अखंडित वीजपुरवठ्यामुळे शेतीसाठी सिंचन व्यवस्था, शाळांमधील आधुनिक डिजिटल शिक्षण आणि रुग्णालयांमधील अत्यावश्यक सेवा सुरळीतपणे सुरू ठेवण्यास मदत होते. याउलट, वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित झाल्यास कामाचे तास वाया जाणे, शिक्षणात व्यत्यय, शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम आणि आर्थिक संधींचे नुकसान होऊ शकते. विश्वसनीय वीजपुरवठ्याचा थेट संबंध उपजीविका आणि रोजगाराशी देखील आहे. उद्योग वाढले की अभियंते, तंत्रज्ञ, ऑपरेटर, वाहतूकदार, पुरवठादार आणि विविध सेवा क्षेत्रांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतात. कृषी-प्रक्रिया उद्योगांचा विस्तार झाल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनामध्ये मूल्यवर्धन करण्याच्या नव्या संधी मिळू शकतात.विश्वसनीय वीजपुरवठा या संधींच्या वाढीसाठी आवश्यक वातावरण निर्माण करण्यास मदत करतो. त्यामुळे विश्वसनीय वीज ही केवळ पायाभूत सुविधांची गरज नाही; ती रोजगार आणि आर्थिक विकासाचीही गरज आहे.

**विकासातील महत्त्वाचा दुवा : पारेषण पायाभूत सुविधांचे महत्त्व**

वीजनिर्मितीला अनेकदा सर्वाधिक महत्त्व दिले जाते. मात्र वीज निर्माण करणे हा ऊर्जा



व्यवस्थेचा केवळ एक भाग आहे. निर्माण झालेली वीज कार्यक्षमतेने जिथे आवश्यक आहे तिथे पोहोचविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे तितकेच महत्त्वाचे आहे. पारेषण पायाभूत सुविधा म्हटले की टॉवर आणि सबस्टेशन ही त्याची दृश्यमान रूपे दिसतात. मात्र त्यांचे खरे महत्त्व त्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या संधींमध्ये आहे.

ज्याप्रमाणे रस्ते आर्थिक व्यवहारांसाठी संसाधने आणि बाजारपेठांना जोडतात, त्याचप्रमाणे मजबूत पारेषण जाळे वीजस्रोतांना विकासाच्या संधींशी जोडणारा दुवा ठरते.धुळ्यासाठी मजबूत पारेषण जोडणीमुळे औद्योगिक विस्ताराला आधार मिळू शकतो, शेती आणि कृषी-प्रक्रिया क्षेत्राला बळकटी मिळू शकते, वीजपुरवठ्यातील व्यत्ययांमुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत होऊ शकते आणि भविष्यातील गुंतवणुकीसाठी मजबूत पाया तयार होऊ शकतो.

धुळ्याची अर्थव्यवस्था वाढत असताना विजेची मागणीही वाढणार आहे. अशा परिस्थितीत सक्षम पारेषण व्यवस्था जिल्ह्याला भविष्यातील वाढत्या ऊर्जेच्या गरजांसाठी सज्ज राहण्यास मदत करू शकते.पायाभूत सुविधांसमोरील आव्हाने अनेकदा तेव्हा निर्माण होतात, जेव्हा मागणीच्या तुलनेत उपलब्ध क्षमता कमी पडू लागते. त्यामुळे पायाभूत सुविधा उभारण्याचे सर्वात मोठे आव्हान अनेकदा त्या खूप लवकर उभारणे नसते, तर गरज निर्माण झाल्यानंतर त्या उभारण्यात होणारा विलंब असतो.

**धुळ्याची वीज व्यवस्था मजबूत करण्याची गरज का आहे?**

मजबूत वीज जाळे : वाढत्या विजेच्या मागणीला सामोरे जाण्यासाठी सक्षम आणि उच्च क्षमतेची पारेषण व्यवस्था.

वीजपुरवठ्याची लवचिकता वाढविणे : वीजपुरवठ्यातील व्यत्ययांच्या परिस्थितीत अधिक सक्षम आणि विश्वासार्ह व्यवस्था निर्माण करण्यास मदत.

रोजगार आणि आर्थिक विकासाला चालना : उद्योग, कृषी-प्रक्रिया आणि सेवा क्षेत्राच्या विस्तारामुळे स्थानिक पातळीवर रोजगार आणि व्यवसायाच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत.मजबूत धुळ्यासाठी मजबूत वीज पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. आणि याच विकासाच्या पुढील झेपेसाठी पारेषण मनोऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठरते.

* धुळे, दि.९- वडजाई शिवारातील शेतातून चोरट्यांनी कॉपर वायर चोरून नेली. या प्रकरणी मोहाडी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला. वडजाई येथील मच्छिंद्र बाबूलाल देवरे यांचे गाव शिवारात शेत आहे. शेतातील वीज पंपासह वेगवेगळ्या ठिकाणी जोडलेली कॉपर वायर चोरट्यांनी काढून नेली. तीन सप्टेंबरला सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आला. साडेसात हजार रुपये केबलची किंमत आहे. मोहाडी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला..

पान १ वरुन

## राज्य व राष्ट्रीयस्तरावर पदकांची कमाई करणाऱ्या

**(पान १ वरून)** धुळे येथे पुरस्कार वितरण महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या शुभेच्छा व मार्गदर्शनाखाली ११ सप्टेंबर २०२६ रोजी कान्हा रीजन्सी, धुळे येथे या पुरस्कार वितरणाचा दिमाखदार समारंभ संपन्न झाला. सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कुस्तीगीरांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी धुळे शहराचे आ.अनुप अग्रवाल, धुळे जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, प्रमुख आश्रयदाते संजय शेठ अग्रवाल, जिल्हा उपाध्यक्ष सुनील काका महाले, पै. रावसाहेब गिरासे, तालुका अध्यक्ष पै. रवींद्र आघाव, सी.ए. मनोज डिसा आदी मान्यवर उपस्थित होते.

लंगोटाला बाप, लाल मातीला आई माना

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष पै. रावसाहेब गिरासे यांनी कुस्तीगीरांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. लंगोटाला बाप आणि लाल मातीला आई मानून प्रामाणिकपणे कष्ट करा. ज्यांनी तुम्हाला मार्गदर्शन केले.

खेळाडूंना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा

समारंभाच्या शेवटी माजी आमदार राजवर्धन कदमबांडे आणि संजय शेठ अग्रवाल यांच्या वतीने सर्व सन्मानित खेळाडूंना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. धुळे जिल्ह्यातील कुस्तीला अधिक बळ मिळावे, युवा पिढीने मोठ्या संख्येने कुस्तीच्या आखाड्यात यावे आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर धुळे जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सचिव सुनील चौधरी व उमेश चौधरी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन धुळे जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमास धुळे महानगर तसेच जिल्ह्यातील कुस्तीगीर, वस्ताद, प्रशिक्षक, मार्गदर्शक, व्यायामशाळांचे प्रतिनिधी, पालक आणि कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत खेळाडूंच्या पाठीशी उभे राहून त्यांच्या क्रीडा प्रवासाला आर्थिक व सामाजिक पाठबळ देणारा हा उपक्रम धुळे जिल्ह्याच्या लाल मातीची परंपरा अधिक समृद्ध करणारा ठरत आहे.

# शिरपूरला पावसामुळे दुकानांचे नुकसान

शिरपूर दि.१२ (का.प्र.): शिरपूर शहर आणि परिसरात ११ सप्टेंबरला रात्रीपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले. शहरात राजपाल कॉम्प्लेक्सचा तळमजला पाण्याखाली गेल्याने स्थानिक दुकानदारांचे मोठे नुकसान झाले.

शहरातील करवंद नाका परिसराला पावसामुळे जलाशयाचे स्वरुप आले होते. राजपाल कॉम्प्लेक्सच्या तळमजल्यात पाणी शिरले. शिरपूर वरवाडे नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांसह संबंधित दुकानदारांनी पंपाद्वारे पाणी बाहेर काढले. शहरातील इदगाह नगर परिसरात गटारीमधून पाणी रस्त्यावर वाहते होते. पाण्यासोबत गटारातील घाणही रस्त्यावर आली. यासोबतच शहरात अनेक ठिकाणी पाणी साचल्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली. अनेक ठिकाणी रस्त्यावरुन पावसाच्या पाण्याचे लोंढे वाहताना दिसून आले. अचानक पाऊस आल्यामुळे गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची धावपळ झाली. शहरात गणेशमूर्ती विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनाही जोरदार पावसाचा फटका बसला. जोरदार पावसामुळे कापूस, सोयाबीन, मका, ज्वारी यासह विविध पिकांना या पावसामुळे जीवदान मिळणार आहे.

## प्रकाश में आज सत्यकाम




धर्मेंद्र, शर्मीला टॅगोर संजीव कुमार अशोककुमार रोबी घोष सारिका मनमोहन

## शब्दकोडे क्रमांक : २४५२



<u>**आडवे शब्द :**</u> १.एखाद्या गोष्टीला असणारा दुसरा विकल्प ४.भारताच्या पूर्वेकडील एक राज्य ८.एकमेकांत पूर्णपणे मिसळून किंवा एकरूप होऊन गेलेला १०.वडाचे झाड किंवा जरब ११.कविवर्य मंगेश पाडगावकरांचा एक काव्य संग्रह १२.ओळ किंवा सिरीयल नंबर १४.आजारपणावर घेतली जाणारी औषधी १५.घोड्याला खाऊ घातले जाणारे द्विदल धान्य १६.चरबी १७.वजनदार, बलाढ्य किंवा प्रतिष्ठित व्यक्ती १८.मैल १९.मनोरंजन किंवा शरीराला व्यायाम देणारी क्रीडा २१.दोन संघांमध्ये होणारा मुकाबला किंवा मॅच २३.अग्नीची उष्णता किंवा तीव्र शेक २४.वाईट कृत्य २५.शिकवण २७.श्रीमंत २९.प्रजा,जनता किंवा छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतकरी लोक ३१.बाधा ३३.वायू,पवन ३५.मळलेला ३७.इंग्रजीत-पैसे ३९.तो-विरुद्ध ४०.डोळे, नेत्र किंवा लोचन ४२.नजर ४५.जंगलात आढळणारा एक हिंस्र प्राणी ४६.मत्सर,असूया ४८.परंपरेने किंवा जुन्या काळापासून चालत आलेली प्रथा ४९.ऋषी कपूर आणि डिंपल कपाडिया यांचा गाजलेला जुना चित्रपट ५०.अंतराने खूप समीप किंवा दूर नसलेला भाग ५२.समुद्रात मिळणारा एक अतिशय चवदार आणि प्रसिद्ध मासा ५५.ताकत, शक्ती किंवा जोर ५६.कावळा-इंग्रजीत ५७.गाण्यात अनेक गायकांनी एकत्र मिळून दिलेली साथ ५८.विचारलेला प्रश्न <u>**उभे शब्द :**</u> १.फेरी,देवळास श्रद्धेने मारलेली चक्कर २.इंग्रजीत-हो ३.आजच्या नंतरचा दुसरा दिवस ५.तांदळाचे पीठ आंबवून बनवली जाते ती पोळी ६.कपाळावर येणारी केसांची बट ७.एक गोड आणि लोकप्रिय फळ ९.मुस्लिमांची पारंपारिक शाळा किंवा धार्मिक शिक्षण संस्था ११.आनंद १३.स्वतःचा असणारा स्वार्थ किंवा हेतू १५.सजीव १६.संगम १८.मज्जाव १९.गाढव आणि घोडा यांच्या संगमातून जन्मास येणारी प्रजात २०.ज्वर २२. पुरुषाचे एक नाव,आनंद घेणे २४.तरल २५.नमस्ते-उर्दूत २६.गुण २८.सोबत ३०.संगीतातील प्रसिद्ध राग ३२.चपाती बनवण्यासाठी वापरतात ते मुख्य धान्य ३४.माकड ३६.तुरुंगवास ३८.व्यवस्थित ४१.शाहरुख खान,जुही चावला,आदित्य पांचोली यांचा एक सिनेमा ४३.भलं ४४.अलमारी ४५.हरकत ४७.आश्चर्यकारक ५१.वण ५३.ओसाड ५४.परंतु

### शब्दकोडे क्रमांक : २४५१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| को | प | र | ख | ळी | | धो | | मै | ल | | स |
| ल | | ड | ब | | वा | र | दा | त | | श | त |
| म | सा | | र | ण | र | ण | | र | स | ना | |
| | स | म | दा | | स | | ब | | क | या | स |
| जो | र | | र | फू | | बु | ल | बु | ल | | ब |
| क | | बा | | ट | क | ला | | वा | | दा | ब |
| | त | | ता | | ल | वा | द | | न | ख | |
| कां | | बे | श | र | म | | ग | ज | | ला | भ |
| दे | व | ता | | या | | ग | ड | ब | ड | | ला |
| पो | | ज | रा | | अ | स्त | | वी | | हो | |
| हे | र | | स | रा | व | | स | मे | ट | | पो |
| | ज | ग | | म | स | ला | | ट | | न | ट |






आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर



प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०



### विश्वातील महान राजे

विघ्नांचा नाश करून मांगल्याची निर्मिती करणारा देव म्हणून गणपतीला पुजले जाते. प्रत्येक चांगल्या कार्याची सुरूवात गणपती पूजनाने होते. अगदी प्राचीन काळापासुन ही प्रथा सुरू आहे. सातवाहन काळापासुन गणपतीची उपासना करण्याची प्रथा रूढ आहे. भाद्रपद चतुर्थीला हा सण साजरा केला जातो. मराठा कालखंडामध्ये गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी, वसंत पंचमी, शिमगा हे सण मोठ्या थाटामाटात साजरे केले जात असत.महाराष्ट्राच्या समाज जीवनात सांस्कृतिक उत्साहामध्ये गणेशोत्सवाला महत्वाचे स्थान आहे.सहयाद्रीमध्ये उभ्या असलेल्या प्रत्येक किल्ल्यावर गणपतीची व विभिन्न देवदेवतांची विविध रूपे दिसुन येतात. ही गड-किल्ल्यांवरील देवदेवतांची रूपे म्हणजे संकटातुन बाहेर पडणारी व विजयाला शक्ती देणारी स्फुर्तीस्थाने आहेत. शत्रूवर विजय मिळविण्यासाठी

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील गणेशोत्सव




या देवदेवताची शक्ती मावळयांच्या अंगामध्ये हत्तीचे बळ निर्माण करीत असे म्हणून प्रत्येक गड-किल्ल्यावर ही देवदेवतांची विविध रूपे आपणास आजही पाहावयास मिळतात.

स्वराज्यामध्ये संस्कृती आणि एकात्मता निर्माण करण्यासाठी विविध उत्सव साजरे केले जात असत. स्वराज्यातील जनतेमध्ये आत्मबल आणि राष्ट्रनिष्ठा निर्माण होण्यासाठी गणपती उत्सवाला प्रोत्साहन दिले. छत्रपतींच्या कालखंडात पुण्यात व स्वराज्यातील प्रत्येक गड-किल्ल्यांवर गणपती उत्सवाचे आयोजन केले जात असे. स्वराज्यात गणपती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात असे. स्वराज्यातील गड-किल्ले हे फक्त युध्द ठिकाणे नसुन रयतेची सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची महत्वाची केंद्रे होती. गणपतीची उपासना सर्वत्र प्रचलित होती.

गणपती हा सण भाद्रपद शुध्द चतुर्थी या दिवशी साजरा केला जातो. मातीच्या गणेशाच्या मुर्ती घरोघरी स्थापन केल्या जातात. अनंत चतुर्थी या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा व उत्सव मोठ्या आनंदी वातावरणात साजरा केला जातो. इ.स. १६३६साली शहाजी राजे यांनी पुण्यामध्ये कसबा येथे सुसज्ज असा वाडा बांधला तोच सुप्रसिध्द पुण्याचा लाल महाल होय. माता जिजाऊ व बाल शिवाजी राजे यांनी पुण्यात कसबा पेठेत कसबा गणपतीची स्थापना केली. स्वराज्याची पहिली राजधानी राजगडावरती सुवेळा माचीवर सुंदर अशी गणपतीची मुर्ती आहे. सुवेळा, संजीवनी व पद्मावती अशा तीन माच्या आहेत. त्यातील सुवेळा माचीचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी छत्रपतींनी स्थापलेली गणपतीची मूर्ती सुवेळा माचीवर झुंजार बुरुजाच्या खाली पाहावयास मिळते.

किल्ले विशाळगडावर जवळ-जवळ चार गणेश मूर्ती आहेत. किल्ल्यावरील भगवतेश्वर महादेवाच्या मंदिरातील गाभा-यात शिवलिंगाबरोबरच काळ्या पाषाणातील पार्वतीला व बाल गणेशाला मांडीवर घेऊन बसलेली शंकराची नंदीवर आरूढ मूर्ती फार सुंदर आहे. मंदिराच्या बाहेर डाव्या बाजूला एका देवळीत बैठ्या गणपतीची फारच देखणी मूर्ती आहे. स्वराज्यातील रांगणा उर्फ प्रसिध्दगडावरती तीन गणपतीच्या मूर्ती आहेत. किल्ल्याच्या पूर्व बाजूला कड्यावर स्वतंत्र घुमटीवजा मंदिरात गणपतीची सुंदर मूर्ती आहे. याशिवाय दोन मुर्ती महादेव मंदिरातील गाभायात ठेवण्यात आलेल्या आहेत.सर्वात सुंदर गणपतीचे मंदिरजर कोणत्या किल्ल्यावर असेल तर ते मुल्हेर किल्ल्यावर होय. हा किल्ला नाशिक जिल्हयातील बागलाणात वसलेला आहे. या किल्ल्याच्या मध्यभागी गणपती तलाव व या तलावाच्या पाठीमागे काळ्या पाषाणातील गणेश मंदिर आहे. मंदिराच्या गाभा-यात शेंदुर फासलेली बैठी गणेश मूर्ती आहे. या गणेश मूर्ती बरोबरच सोमेश्वर महादेवाच्या मंदिरात भिंतीला टेकून ठेवलेली आणखी एक गणेश मूर्ती आहे. या किल्ल्याच्या दरवाज्यावर शस्त्रसज्ज अशी गणेश मूर्ती आहे.तशी गणेश मूर्ती आपल्याला दुस-या कोणत्याही किल्ल्यावर बघता येत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली तालुक्यातील रामगड किल्ल्यावर किल्लेदाराच्या वाडयाच्या भिंतीवर एका देवळीत काळया पाषाणातील गणपतीची सुंदर मूर्ती आहे. या मूर्ती च्या पायात सात कवट्या कोरल्या असून गळयातही कवट्याची माळ आहे. एका वेगळ्या रूपात या गणेश मूर्तीला दाखविण्यात आलेले आहे. पुणे जिल्हयातील सिंदोळागडावर गडाच्या प्रवेशव्दाराच्या डाव्या हाताला काताळावर नृत्य करणा-या गणपतीची मुर्ती आहे. कमळ, परशू, अंकुश, मोदक, माथ्यावर मुकुट व कानी कुंडले अशी नटलेली ही नृत्य गणेश मूर्ती अतिशय सुंदर आहे.

किल्ले सुंदरगडावरील प्रवेशव्दारातुन आत प्रवेश केल्यावर खडकात खोदलेल्या सुमारे २९ पाय-या चढून गेल्यानंतर पाच फूट उंचीची दगडातील उत्कृष्ट कोरीव काम केलेली दक्षिणाभिमुख गणेश मूर्ती आहे. दिवस उगवताच सूर्यकिरणे गणेश मूर्तीवर पडतात. यावरून मंदिर स्थापत्य कलेतील कल्पकता दिसून येते. किल्ले अवचितगडावर पूर्वाभिमुख गोमुखी बांधणीच्या दरवजातुन सदरेच्या चौथा-या समोर एक भक्कम बांधणीचा व्दादशकोनी तलाव लागतो. या तलावाच्या पुढे गणपतीचे छोटेखाणी मंदिर आहे. या गडावर एक शिलालेख आहे त्यावर 'श्रीगणेशाय नमः' असा मजकूर कोरलेला आहे.

सातारा जिहयातील पाटण तालुक्यातील दाते गडावरती विघ्नहर्ता महा गणेशाची सुंदर मूर्ती आहे. (पान ६ वर)

# बुद्धीचा नायक गणरायाचे आगमन!

चैतन्याचा, भक्तीचा आणि आनंदाचा संदेश घेऊन ६४ विद्यांचा अधिपती, बुद्धीचा नायक, विघ्नहर्ता श्री गणरायाचे आगमन होत आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. घराघरात गणरायाची प्रतिष्ठापना झाली की वातावरणात एक वेगळेच मांगल्य निर्माण होते. सकाळची आरती, गणरायाला वाहिलेली फुले, प्रसादाचा सुगंध, मुलांचा उत्साह आणि गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष यामुळे दहा दिवस घराघरात प्रसन्नतेचे वातावरण निर्माण होते.

हिंदू धर्मपरंपरेत श्री गणेशाला प्रथमपूज्य देवता मानले जाते. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात गणेशपूजनाने करण्यामागे मोठा आध्यात्मिक संदेश आहे. श्री गणेशाचे मोठे मस्तक म्हणजे व्यापक विचार, मोठे कान म्हणजे सर्वांचे ऐकण्याची वृत्ती, लहान डोळे म्हणजे एकाग्रता आणि सोंड म्हणजे परिस्थितीनुसार स्वतःला बदलण्याची क्षमता. गणेशाचे वाहन असलेला उंदीर इच्छाशक्तीचे आणि चंचल मनावर नियंत्रण ठेवण्याचे प्रतीक मानले जाते. म्हणूनच गणरायाची उपासना म्हणजे केवळ पूजा नव्हे, तर ज्ञान, विवेक, संयम आणि सद्विचारांची साधना आहे.







## भक्ती, संस्कृती, रोजगार आणि आनंदाची दहा दिवसांची मंगलपर्वणी

गणेशोत्सवाला सामाजिक आणि राष्ट्रीय इतिहासाचीही मोठी परंपरा आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप देऊन समाजाला एकत्र आणण्याचे आणि जनजागृतीचे प्रभावी माध्यम निर्माण केले. त्यामुळे गणेशोत्सव हा भक्तीबरोबरच एकता, सामाजिक बांधिलकी आणि लोकजागृतीचा उत्सव बनला.

आजच्या काळात गणेशोत्सवाचे आणखी एक महत्त्वाचे रूप म्हणजे स्थानिक अर्थव्यवस्थेला मिळणारी चालना. गणेशमूर्ती बनविणारे मूर्तिकार, सजावटीचे साहित्य विकणारे व्यापारी, फुलविक्रेते, हारवाले, पूजेचे साहित्य विकणारे दुकानदार, मिठाईवाले, फळविक्रेते, किराणा दुकानदार, कापडविक्रेते, इलेक्ट्रिशियन, मंडप उभारणारे कामगार, रंगारी, सुतार, वाहतूकदार अशा असंख्य छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना या उत्सवामुळे रोजगार आणि उत्पन्नाची संधी मिळते.

गणेशोत्सवाच्या काळात बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होतात. एखाद्या कुटुंबाने गणरायासाठी मूर्ती घेतली, फुले घेतली, सजावटीचे साहित्य घेतले, प्रसादासाठी पदार्थ घेतले किंवा आरतीसाठी पूजेचे साहित्य घेतले की त्या पैशाचा एक भाग थेट स्थानिक व्यापाऱ्यांच्या हातात जातो. त्यामुळे गणेशोत्सव हा भक्तीबरोबरच हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाला हातभार लावणारा उत्सव आहे. विशेषतः छोटे दुकानदार आणि घरगुती व्यवसाय करणाऱ्यांसाठी हा काळ आशेचा आणि आनंदाचा असतो.

विकास कपोले
९४०३४२५७७७

मात्र या आनंदाला गोंगाटाची गरज नाही. गणरायाला मोठमोठ्या आवाजाचा डीजे किंवा कानठळ्या बसविणारा ध्वनी आवडतो, असे आपल्या धर्मात कुठेही सांगितलेले नाही. उलट आरतीतील घंटानाद, टाळ-मृदंगाचा ताल, भजन-कीर्तनाची गोडी आणि सामूहिक प्रार्थनेतील शांतता यामध्येच खरा आध्यात्मिक आनंद आहे. म्हणून यंदाचा गणेशोत्सव गर्दी नको, गोंगाट नको; भक्ती हवी, संस्कृती हवी आणि आनंद हवा या भावनेने साजरा करूया.

प्रत्येक कॉलनीत, प्रत्येक गल्लीत आणि प्रत्येक घरात मुलांसाठी सुंदर उपक्रम आयोजित करता येतील. सामान्य ज्ञान स्पर्धा, प्रश्नमंजुषा, चित्रकला, वक्तृत्व, निबंधलेखन, संस्कृत श्लोक, अभंग, देशभक्तीपर गीते, पारंपरिक खेळ, बुद्धिबळ, कॅरम, कथाकथन, पुस्तक वाचन अशा उपक्रमांमधून मुलांचे मनोरंजनही होईल आणि त्यांच्या ज्ञानातही भर पडेल.

ज्येष्ठ नागरिकांसाठी अभंग, भजन, कीर्तन, अनुभवकथन आणि सांस्कृतिक कार्यक्रम ठेवता येतील. महिलांसाठी पारंपरिक पाककला, रांगोळी, गीत-स्पर्धा किंवा हळदी-कुंकू यांसारखे कार्यक्रम घेता येतील. तरुणांनी रक्तदान, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप अशा सामाजिक उपक्रमांतून गणरायाची सेवा करावी.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही आजची मोठी गरज आहे. शक्यतो शाडू मातीच्या किंवा पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर, नैसर्गिक सजावट, प्लास्टिकचा कमीत कमी वापर आणि विसर्जनाच्या वेळी जलस्रोतांचे प्रदूषण होणार नाही याची काळजी घेणे हीदेखील गणरायाचीच सेवा आहे.

दहा दिवसांचा हा उत्सव म्हणजे घरातील प्रत्येक सदस्याला एकत्र आणण्याची सुंदर संधी आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात कुटुंबातील सदस्यांना एकत्र बसून आरती करण्यासाठी मिळणारा वेळ, प्रसाद वाटताना होणारे हास्य, शेजाऱ्यांशी होणारा संवाद आणि मुलांच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह-हीच तर गणरायाची खरी कृपा आहे.

गणरायाकडे आपण मोठ्या अपेक्षा घेऊन जातो; पण यंदा त्याच्याकडे एकच मागणी करूया-प्रत्येक घरात सुख, समाधान, आरोग्य, ज्ञान, प्रेम आणि परस्परांबद्दल आदर नांदो. कोणाच्याही घरातील चूल विझू नये, कोणाच्याही डोळ्यात अश्रू राहू नयेत आणि प्रत्येकाच्या आयुष्यात आशेचा नवा प्रकाश निर्माण व्हावा.

चला, यंदाचा गणेशोत्सव भक्तीचा करूया, संस्कृतीचा करूया, ज्ञानाचा करूया आणि माणुसकीचा करूया.

गणरायाच्या आगमनाने बाजारपेठा फुलू देत, छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांच्या व्यवसायाला भरभराट मिळू देत, हजारो हातांना रोजगार मिळू देत आणि प्रत्येक घरात आनंदाचे दीप उजळू देत.

***गर्दीपेक्षा संस्कार मोठे,***
***गोंगाटापेक्षा आरती मोठी,***
***दिखाव्यापेक्षा भक्ती मोठी,***
***आणि उत्सवापेक्षा माणुसकी मोठी!***
***श्री गणरायाच्या चरणी एकच प्रार्थना-***
***सर्वांच्या जीवनातील विघ्ने दूर होवोत,***
***ज्ञान-विवेकाची ज्योत प्रज्वलित होवो,***
***आणि प्रत्येकाच्या घरात सुख-समृद्धी नांदो!***
***गणपती बाप्पा मोरया!***
***मंगलमूर्ती मोरया!***

## गणपती बाप्पा मोरया

आजच्या काळात गणेशोत्सव साजरा करताना गणरायाच्या मूर्तीची उंची नव्हे, तर तिच्यामागचा विचार महत्त्वाचा आहे. यंदा पाण्याची कमतरता जाणवत असताना नदी-नाल्यांमध्ये मोठ्या मूर्तींचे विसर्जन करणे अनेकदा अडचणीचे ठरते. त्यामुळे उगाचच प्रचंड उंचीच्या मूर्ती उभारण्यापेक्षा आकाराने सुबक, कलात्मक, आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचा विचार प्रत्येक मंडळाने करायला हवा. गणरायाला मोठे करण्यासाठी मूर्तीची उंची वाढविण्याची गरज नाही; आपल्या भक्तीची उंची, आपल्या विचारांची उंची आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी हीच खऱ्या अर्थाने गणरायाची महती वाढवते. विशेष आनंदाची बाब म्हणजे धुळे शहरातील एका गणेश मंडळाने कागदाच्या लगद्यापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करून आणण्याचे नियोजन केले आहे. हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय असून, इतर मंडळांनीही त्यातून प्रेरणा घ्यावी.

गणेशोत्सवातील देखावेही केवळ भव्यता आणि खर्चाचे प्रदर्शन करणारे नसावेत, तर समाजाला दिशा देणारे आणि विचार करायला लावणारे असावेत. व्यसनमुक्ती, जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन, स्त्री-सन्मान, शिक्षण, स्वच्छता, वाहतूक शिस्त, ज्येष्ठांचा सन्मान, डिजिटल सुरक्षितता, देशभक्ती, सामाजिक एकोपा अशा विविध विषयांवर सुंदर आणि जिवंत देखावे सादर करता येतील. त्यामुळे सगळ्यात उंच मूर्ती कोणाची? यापेक्षा सगळ्यात सुंदर संदेश कोण देत आहे? याची स्पर्धा व्हावी. गणरायाच्या चरणी फुलांची उधळण करण्याबरोबरच एखादे झाड लावले, एखाद्या गरजू विद्यार्थ्याला मदत केली, पाण्याची बचत केली किंवा समाजात एखादा चांगला विचार रुजवला, तर तीच गणरायाची खरी आराधना ठरेल. उंचीपेक्षा आकर्षकता, दिखाव्यापेक्षा संस्कार आणि खर्चापेक्षा समाजोपयोगी विचार-असाच यंदाचा गणेशोत्सव असावा!

आजच्या काळात गणेशोत्सव साजरा करताना गणरायाच्या मूर्तीची उंची नव्हे, तर तिच्यामागचा विचार महत्त्वाचा आहे. यंदा पाण्याची कमतरता जाणवत असताना नदी-नाल्यांमध्ये मोठ्या मूर्तींचे विसर्जन करणे अनेकदा अडचणीचे ठरते. त्यामुळे उगाचच प्रचंड उंचीच्या मूर्ती उभारण्यापेक्षा आकाराने सुबक, कलात्मक, आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचा विचार प्रत्येक मंडळाने करायला हवा. गणरायाला मोठे करण्यासाठी मूर्तीची उंची वाढविण्याची गरज नाही; आपल्या भक्तीची उंची, आपल्या विचारांची उंची आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी हीच खऱ्या अर्थाने गणरायाची महती वाढवते. विशेष आनंदाची बाब म्हणजे धुळे शहरातील एका गणेश मंडळाने कागदाच्या लगद्यापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करून आणण्याचे नियोजन केले आहे. हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय असून, इतर मंडळांनीही त्यातून प्रेरणा घ्यावी.

गणेशोत्सवातील देखावेही केवळ भव्यता आणि खर्चाचे प्रदर्शन करणारे नसावेत, तर समाजाला दिशा देणारे आणि विचार करायला लावणारे असावेत. व्यसनमुक्ती, जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन, स्त्री-सन्मान, शिक्षण, स्वच्छता, वाहतूक शिस्त, ज्येष्ठांचा सन्मान, डिजिटल सुरक्षितता, देशभक्ती, सामाजिक एकोपा अशा विविध विषयांवर सुंदर आणि जिवंत देखावे सादर करता येतील. त्यामुळे सगळ्यात उंच मूर्ती कोणाची? यापेक्षा सगळ्यात सुंदर संदेश कोण देत आहे? याची स्पर्धा व्हावी. गणरायाच्या चरणी फुलांची उधळण करण्याबरोबरच एखादे झाड लावले, एखाद्या गरजू विद्यार्थ्याला मदत केली, पाण्याची बचत केली किंवा समाजात एखादा चांगला विचार रुजवला, तर तीच गणरायाची खरी आराधना ठरेल. उंचीपेक्षा आकर्षकता, दिखाव्यापेक्षा संस्कार आणि खर्चापेक्षा समाजोपयोगी विचार-असाच यंदाचा गणेशोत्सव असावा!



# निसर्ग

***फुलांनी कधीच सुगंधाचा***
***गाजावाजा केला नाही,***
***नदीने कधी प्रवासाचा***
***हिशोब मांडला नाही,***
***निसर्ग शिकवतो फक्त देत***
***राहण्याची कला,***

म्हणूनच त्याने कधी मोठेपणाचा मुकुट घातला नाही...

निसर्ग केवळ डोळ्यांना आनंद देत नाही, तर मनाला शांतता, विचारांना सकारात्मकता आणि जीवनाला नवीन ऊर्जा देतो. निसर्ग हा आपल्याला अनेक धडे देतो. निसर्ग एक निस्वार्थ शिक्षक आहे. वृक्ष कधी फळे खात नाही, पण स्वतः उन्हात उभे राहून इतरांना सावली देतात. नद्या स्वतःसाठी वाहत नाहीत, सूर्य स्वतःसाठी प्रकाश देत नाही, तर चंद्र शितलतेचा अनुभव देतो, म्हणजेच दुसऱ्याच्या कल्याणाची भावना यातून यात दिसून येते. तसेच निसर्गाचा प्रत्येक घटक आपल्याला प्रेम, त्याग, संयम आणि सेवाभाव शिकवतो.

निसर्ग म्हणजे देवाचं सुंदर गीत,
त्यात दडलेलं असतं जगण्याचं संगीत.
झाडं, फुलं, नदी आभाळाचा साज,
निसर्गच आहे जीवनाचा खरा ताज.

निसर्गाच्या सानिध्यात काही क्षण घालवले की मनातील ताण कमी होतो. मन शांत होते. पहाटे उगवणाऱ्या सूर्याच्या किरणांनी नवचैतन्याचा अनुभव होतो .पक्षांचे मधुर किलबिलाट, फुलांचा सुगंध, झाडांची हिरवाई पाहून पृथ्वीने हिरवा शालू नेसला, असे वाटते. पहिल्या पावसाने येणारा मातीचा सुगंध, खळखळणाऱ्या नद्या , अथांग समुद्राच्या लाटांचा आवाज जणू एक संगीतच होय. हे सगळे निसर्गाचे अलंकार होय. निसर्ग हा असा ग्रंथ आहे की त्याच्या प्रत्येक पानाने आपल्याला प्रेरणा मिळते, तसेच प्रत्येक ऋतूने आपल्याला नव्या आशांची प्रीत मिळते. निसर्गाशी जर आपण एकरूप झालो, तर आपल्याला स्वर्गात आल्याचा भास होतो.

जयश्री बिर्ला
पुणे, मो.९४०४०५६८४३

झाडांची सावली पैशाने मिळत नाही,
म्हणूनच निसर्गाची किंमत कधी कमी होत नाही.

आजच्या आधुनिक व विज्ञान युगात माणूस निसर्गापासून दूर जात आहे. जंगलतोड, नष्ट होणाऱ्या नद्या, वाढत्या प्रदूषणामुळे हवामान - तापमानात बदल झाल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. निसर्ग हा अत्यंत सहनशील आहे .परंतु जेव्हा मानवाकडून अतिरेक होतो तेव्हा त्याचा प्रकोप महापूर, भूकंप, दुष्काळ अशा रूपात समोर येतो. त्यामुळे या गंभीर बाबी लक्षात घेऊन समतोल राखणे, ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे .वास्तविक आजपासूनच निसर्ग संवर्धनाची सुरुवात करावी लागेल. निसर्गाचे रक्षण म्हणजे आपल्या अस्तित्वाचे रक्षण होय. निसर्गाकडून फक्त घेण्याची नाही, तर त्याला परत करण्याची देखील गरज आहे. जसे प्रत्येक लावलेले झाड हा पृथ्वीला दिलेला श्वास आहे. वाचवलेला प्रत्येक पाण्याचा थेंब हा भविष्यासाठी जपलेला खजिना आहे. तसेच निसर्ग म्हणजे सृष्टीच्या हृदयाचे स्पंदन आहे.

***हिरव्या पानात जीवनाचा***
***अर्थ लपलेला असतो,***
***वाहणाऱ्या नदीत संघर्षाचा***
***धडा लिहिलेला असतो.***
***निसर्गाच्या कुशीत प्रत्येक***
***क्षण फुलून जातो,***
***थकलेला जीवही नव्या आशेने***
***पुन्हा उभा राहतो!!!***



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

# आत्मबळ

आत्म्यात संकल्प किंवा निश्चय करण्याची जी शक्ती असते तिला आत्मबळ असे म्हणतात. आत्मबल म्हणजे संकल्प शक्तीचे सामर्थ्य .आत्म बळाचा उपयोग प्रत्येक जण नेहमीच करीत असतो. पण आपल्या अंगी आत्मबळ आहे आणि त्याचा उपयोग आपण जीवनात पदोपदी करीत असतो अशी जाणीव मात्र सहसा कोणालाही नसते .आपल्या शारीरिक शक्तीने आपण अनेक क्रिया नेहमी करीत असतो. पण त्याकरतांना आपण शक्तिमान आहोत आणि आपल्या शक्तीचा उपयोग करीत आहोत असे आपल्याला क्वचितच वाटते. जेव्हा विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त शक्ती खर्च करण्याची पाळी येते तेव्हा शक्ती खर्च करावी लागत असल्याची जाणीव आपल्याला होते आणि अशी जाणीव होऊ लागली म्हणजेच आपल्या अंगी शक्ती आहे की नाही हे सांगण्याचा किंवा ठरविण्याचा प्रश्न उत्पन्न होतो. ज्या गोष्टी करण्याची आपल्याला नेहमी सवय असते त्या करताना जे मनोव्यापार होत असतात त्याकडे आपले लक्ष नसते जे संकल्प रोज करण्याची सवय असते ते करण्याकरिता आत्मबळ फारसे लागत नाही .पण बुद्धीच्या निर्णयानुसार संकल्प करावयाचा असला तर मात्र तो करताना आत्मबळ बरेच लागते. ज्या गोष्टी करण्याचा मोह आपणाला होतो त्या करण्याचा संकल्प करताना आत्मबळ विशेष लागत नाही पण ज्या गोष्टी स्वाभाविक पणे आपल्याला आवडत नाही किंवा ज्या करण्याची सवय नसते त्या करण्याचा संकल्प करताना आत्मबळ जास्त लागते. आत्मबळाचा उपयोग चांगले किंवा वाईट असे दोन्ही प्रकारचे निश्चय करण्यासाठी केला जातो. म्हणूनच आत्मबलाचे निरनिराळे प्रकार असू शकतात. आत्मबलाचे सात्विक राजस आणि तामस असे तीन प्रकार सांगितलेले आहेत .ज्या आत्मबलाच्या योगाने मनप्राण व इंद्रिय यांच्या क्रिया विशुद्ध किंवा सात्विक बुद्धीच्या निर्णयानुसार कोणत्याही रीतीने न चळता होतात ते सात्विक आत्मबल होय यालाच नैतिक किंवा दैवी बळ असे म्हणतात. ज्या आत्मबलाच्या योगाने धर्म अर्थ आणि काम यांच्यापासून प्रसंगानुसार प्राप्त होणाऱ्या फलाच्या इच्छेने मनुष्य ते पुरुषांर्थ साधण्याचा निश्चय करतो ते आत्मबल राजस होय. ज्या आत्मबलाच्या योगाने मनुष्य सात्विक बुद्धीच्या निर्णयानुसार न वागता दुष्ट भावनांच्या आहारी जाऊन झोप भीती शोक विशाद आणि गर्व ही सोडित नाही ते आत्मबल तामस होय .यालाच राक्षसी किंवा आसुरी बळअसंही म्हणतात .

सात्विक आत्मबळयुक्त पुरुष उच्चशीलवान निस्वार्थी परोपकारी आणि सदाचारी असतात. राजस आत्मबल युक्त मनुष्ये मध्यम शिलाची असतात आणि तामस आत्मबलयुक्त मनुष्ये निकृष्ट शिलाची किंवा दुशिल परपोषक आणि दुराचारी असतात सात्विक आत्मबळयुक्त पुरुष स्वतः उच्च पदाला जातात व समाजाची उन्नती करण्यास कारणीभूत होतात तामस आत्मबल युक्त पुरुष समाज शत्रू असतात ते स्वतः अधोगतीला जातात आणि इतरांना अनेक प्रकारे दुःख देतात. मनुष्याचे व्यक्ती सुशील वा दुशील होतात. आत्मबल व सवयी यांचा याप्रमाणे निकट संबंध असल्यामुळे सवयी कशा जडतात कशा तोडता येतात आणि जीवनात सवयीचे महत्त्व काय आणि किती असते हे पाहणे ही जरूर आहे. एकच क्रिया पुन्हा पुन्हा केल्याने त्याची सवय लागली असे आपण म्हणतो .शारीरिक श्रम विचार आत्मबल आणि वेळ यांची बचत होण्याकरिता सवय ही एक ईश्वर निर्मित नामीयुक्ती आहे असे म्हणण्यास हरकत नाही. मनुष्याचे जीवन व्यवस्थित पद्धतशीर नियमित आणि यशस्वी होण्यासाठी चांगली सवय असणे ही एक महत्वाची गोष्ट आहे. चांगल्या सवयी लहानपणापासून लावून घेणे हे सात्विक आत्मबल वाढविण्याचे सोपे




आणि अत्यंत परिणामकारक साधन आहे .वाईट सवयी म्हणजे आत्म्याची दुर्बलता आणि असंस्कृतपणाचे चिन्ह होय. वाईट सवयीमुळे मनुष्याचे जीवन अव्यवस्थित होते. मनुष्याच्या सवयी नेहमी त्याच्या ताब्यात असल्या पाहिजे म्हणून मनुष्याने वारंवार आत्मनिरीक्षण करून आपले संकल्प सात्विक बुद्धीच्या निर्णयानुसार होत आहे की नाही याची पाहणी करीत गेले पाहिजे .या सवयी अनिष्ट आणि अपायकारक आहेत असे आढळून येईल त्यांना तात्काळ आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आत्मबल किंवा शील पुष्कळ अंशी त्याच्या सवयीवर अवलंबून असते. लहानपणापासून ज्याला उत्तम सवयी लागलेल्या असतात त्याचे शील सर्वोत्कृष्ट असते ज्याला लहानपणापासून किंवा नंतर वाईट सवयी लागतात तो दुशील होतो. व्यक्तीच्या स्वतःच्या सवयीप्रमाणे कौटुंबिक जातीय धार्मिक सामाजिक राष्ट्रीय किंवा ऐतिहासिक सवयी जिला आपण परंपरा असे म्हणतो तिचाही परिणाम व्यक्तीच्या आत्मबलावर होत असतो. परंपरा चांगली किंवा वाईट असेल त्यानुसार त्या परंपरेत वाढलेल्या

# एक आगळेवेगळे मागणे



**नुकतीच आषाढी एकादशी होऊन गेली. आता श्रावण येणार आणि त्यानंतर आपल्या सर्वांच्या लाडक्या गणरायाचे आगमन होणार. या उत्सवाची प्रतीक्षा आणि उत्सुकता प्रत्येकालाच असते.**

**तसे पाहायला गेले तर आज प्रगत तंत्रज्ञान, आधुनिक विचार आणि काळानुसार बदलणारी जीवनशैली या सर्वांमध्ये अध्यात्माला स्थान तसे कमीच आहे. पण आमचे घर मात्र याला अपवाद म्हणावे लागेल. आमच्या घरात आधुनिकता तर आहेच; पण त्याचबरोबर अध्यात्मिकताही आहे. नित्यनेमाने पूजा-विधी, देवाचे नामस्मरण, उपासना, आरती इत्यादी होत असते.**

नेहमीप्रमाणे आईने पूजा केली आणि त्यानंतर आरतीसाठी आम्ही सर्वजण एकत्र आलो. गणरायाची मनोभावे आरती झाली आणि आई म्हणाली, हे गणराया, शेवटच्या श्वासापर्यंत माझ्या शरीराचे सर्व अवयव सक्रिय राहू देत.

मी आईला म्हणाले, लोक देवाकडे धनसंपत्ती, सुखसमृद्धी मागतात. विघ्न दूर होऊ दे, अशी प्रार्थना करतात. आणि तू हे काय आगळेवेगळे मागतेस?

त्यावर आई म्हणाली, अगं, शरीरात ताकद आहे तोपर्यंतच सर्व काही ठीक आहे. हात, पाय, डोळे, कान यांची कार्यक्षमता कमी झाली तर कितीही सुख असू दे, कितीही ऐश्वर्य असू दे; त्यांचा काय उपयोग?

दिपाली पाचपुते
मो.८०८७७ ३६५८३

मी म्हणाले, हो, हेही खरंच आहे. पण तू काळजी का करतेस? तुझे किंवा बाबांचे काही दुखले-खुपले तर मी आहे ना! मी घेईन काळजी.

आई हसून म्हणाली, अगं माझी चिमणी, तुझ्या आणि आमच्यात जीव आहे, हे खरं. पण तू कायम आमच्याजवळ राहणार नाहीस ना? आणि एकदा तुझं लग्न झालं की तू तुझ्या मनाची मालकीण राहणार नाहीस, बाळा. नाही म्हटलं तरी बंधने येतातच. म्हणूनच देवाला सांगते की, शेवटपर्यंत मी निरोगी आणि उत्साही राहू दे. अंगात बळ राहू दे.

आईचे हे आगळेवेगळे मागणे खरंच आपल्या सर्वांना विचार करायला भाग पाडणारे आहे.

बदलत्या जीवनशैलीनुसार वेळेवर जेवण नाही, पुरेशी झोप नाही, सकस आहार नाही आणि मग अशा परिस्थितीत कमी वयातच आपण विविध आजारांनी ग्रासले जातो. मग श्रीमंती कितीही असली, ऐश्वर्य कितीही असले तरी सुख मात्र लाभत नाही.

आपले आयुष्य कितीही धावपळीचे असले तरी स्वतःसाठी थोडा वेळ काढायलाच हवा. नित्यनेमाने योग किंवा व्यायाम करणे आवश्यक आहे. नाहीतर पॅकेजच्या नावाखाली तासन्तास बसणारा सध्याचा युवावर्ग पाठदुखी, कंबरदुखीने त्रस्त होताना दिसतो. कमी वयातच अनेकांना हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब यांसारख्या आजारांनी पछाडले आहे. आणि जर तारुण्यातच ही अवस्था असेल, तर वृद्धापकाळात काय होणार?

यासाठी सर्वांनी केवळ परिश्रम करणे आणि पैसे कमावणे यामागे न लागता स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घ्यायला हवी. कारण शरीर निरोगी असेल तरच आपण आपल्या कष्टाचे, संपत्तीचे आणि आयुष्यातील सुखाचे खऱ्या अर्थाने उपभोग घेऊ शकतो.

नाहीतर तो गणराय तरी काय करणार?

चला तर, या गणेशोत्सवात आपण सर्व मिळून श्रीगणेशाला एक आगळेवेगळे गाऱ्हाणे घालूया-

हेची दान देगा देवा, तुझा विसर न भावा।
आरोग्याचा देई ठेवा, त्रास कोणाचा न भावा।।

आपल्या या प्रार्थनेत केवळ स्वतःच्या आरोग्याची नव्हे, तर सर्वांच्या आरोग्याची भावना असू दे.

संस्कृतमधील हे सुभाषितही याठिकाणी सार्थ ठरते-
सर्वे भवन्तु सुखिनः। सर्वे सन्तु निरामयाः।
अर्थात-सर्वजण सुखी होवोत आणि सर्वजण निरोगी राहोत.

यंदा गणरायाकडे धन, संपत्ती किंवा ऐश्वर्य मागण्याबरोबरच एक गोष्ट नक्की मागूया-निरोगी शरीर, प्रसन्न मन आणि उत्साही आयुष्य!



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

# संस्कार

शारदा विद्यालयाच्या हॉस्टेलमधील नववीच्या विद्यार्थिनींनी कॉमन रूममध्ये सरस्वतीची तसबीर आणून लावायची असे ठरले. खरंतर ही कल्पना होती रुपालीची. तिने आपल्या चार-पाच मैत्रिणींना मनातील हा विचार बोलून दाखवला. मैत्रिणींना नाही म्हणण्याचा काही प्रश्न नव्हता. प्रश्न होता तो तसबीर लावायला अधिक्षिका परवानगी देतील का? कारण हॉस्टेलच्या बाहेरच्या व्हरांड्यात सरस्वतीची मूर्ती अगोदरपासून ठेवलेली होती. नीताने शेवटी न राहून विचारलेच.

तू म्हणतेस त्याबाबत कोणाची हरकत नाही.पण साबळे मॅडमला विचारायला हवे.

तुम्ही वीस-वीस रुपये वर्गणी गोळा करा. साबळे मॅडमला आपण विचारायला जाऊ. कॉमनरूममध्ये कायम असच्छता असते. तिथे सरस्वतीची तसबीर लावली तर आपण मुली तरी तिथे स्वच्छता ठेवू. सफाईकरणाऱ्या मावशी बऱ्याचवेळा कॉमनरूम झाडतच नाहीत. देवीची पुजा करायच्या निमित्ताने स्वच्छता राखली जाईल, असे साबळे मॅडमला पटवून देऊ.

तुझी आयडिया एकदम बरोबर आहे. स्वप्ना म्हणाली.

अगं, पण दररोज पुजा कोण करील?दिव्याने शंका विचारली.

अगं,पुजा हे निमित्त झालं. तिथे जाऊन शांतपणे अभ्यास करायचा.वाचन करायचं. खोलीतल्या गोंगाटामुळे कधी-कधी लक्ष लागत नाही.रुपालीने स्पष्ट केलं.

तसबीर लावलीच आहे तर पुजाही करायला हवी. दिव्या म्हणाली.

मग ही जबाबदारी तूच घे. तुला जमेल तशी पुजा करीत जा. आम्ही तुला मदत करू. रुपाली बोलली.

मी एकटीच का करू? तुम्हा सगळ्यांना पुजा करता यायला हवी.दिव्या हट्ट सोडत नव्हती.

दिव्या,तुला तसबीरीची कल्पना पटत नसेल तर सोडून दे. काय करायचं ते ठरू या नंतर... रुपालीने सगळ्यांना आपापल्या रूममध्ये जाण्यासाठी सुचवले.

हॉस्टेलमध्ये एक कॉमनरूम होती. रविवारच्या किंवा सुट्टीच्या दिवशी काही मुली इथे बसून आपल्या आवडीच्या,छंदाच्या गोष्टी करीत. कोणी मांडी घालून चित्र काढून रंगवायच्या. कोणी प्रयोगाची वही पूर्ण करत. तर कोणी ग्रंथालयातून आणलेले पुस्तक निवांतपणे वाचत बसे. पण बऱ्याचवेळा ही खोली स्वच्छ झाडलेली नसे. मग मुलींनाच सफाई करावी लागे. सफाई करणाऱ्या मावशी देवभोळ्या आहेत, हे मुलींनी ओळखले होते. मात्र काही अडगळ असली की त्या कॉमनरूममध्ये आणून ठेवायच्या. मुली त्यामुळे वैतागायच्या. यावर रुपालीनं ही आयडिया शोधून काढली होती.

मात्र रुपालीच्या बोलण्याने दिव्याचा गैरसमज झाला. तिला तो स्वतःचा अपमान वाटला. तेव्हापासून तिने रुपालीसोबत अबोला धरला. रुपालीच्या इतर मैत्रिणींसोबतही ती कमी बोलू लागली.

त्याचदरम्यान शाळेत शिक्षणविषयक परिषद आयोजित केली होती. कलाशिक्षिका मेंधळे मॅडम यांनी रुपालीच्याचमूला ईशस्तवन आणि स्वागतगीताची तयारी करण्यास सांगितले. रुपालीने आपल्या मैत्रिणींना याबाबत तयारी करण्यासाठी एकत्र बोलावले. तेव्हा दिव्या आली नाही. तिने आपल्या नव्या मैत्रिणींना सांगायला सुरुवात केली की रुपाली देवाला वगैरे मानत नाही तर तिने कशाला ईशस्तवन म्हणावं? तसबिरीला नमस्कार न करणाऱ्या मुलींना ईशस्तवन म्हणायची संधीच द्यायला नको.

दिव्याचं बोलणं फारसं कोणी मनावर घेतलं नाही,त्यामुळे ती आणखी आक्रमकपणे रुपालीच्या नास्तिक असणे,देवपूजा न करणे याबाबत शाळेतील,हॉस्टेलमधील मैत्रिणींसोबत बोलू लागली. रुपालीच्या कानावरही दिव्याचे बोलणे गेले असावे. मात्र तिने आपल्यावर दिलेल्या जबाबदारीवर लक्ष केंद्रित केले. ईशस्तवनाची निवड, स्वागतगीताची निवड, गोड गळा असणाऱ्या मैत्रिणींना सरावासाठी बोलावणे, वेळेनुसार सराव करणे, यातच रुपालीचा आणि तिच्या मैत्रिणींचा वेळ जात होता. मेंधळे मॅडम सांगत तशा त्या सरावातून बदल करत होत्या. आपल्या बोलणे ऐकून तरी रुपाली आपल्याला जाब विचारायला येईल, अशी दिव्याची अपेक्षा होती. मात्र रुपालीने कोणताही प्रतिसाद न दिल्याने दिव्या स्वतःच अस्वस्थ झाली होती.



शिक्षण परिषदेचा कार्यक्रम यथासांग पार पडला. पाहुण्यांनी गायन करणाऱ्या मुलींचे मनापासून कौतुक केले. विशेषतः रुपालीच्या नेतृत्वाचे मुख्याध्यापकांनी जाहीर कौतुक केले.

कार्यक्रम संपल्यानंतर दिव्या मैत्रिणीच्या कानाला लागली, नुसता आवाज चांगला असून फायदा नाही, आपले वागणेही चांगले असायला हवे.

तिंच्या मैत्रिणींना समजत होते की ती कोणाबद्दल बोलतेय.

आठ-पंधरा दिवसांनी रुपालीच्या कानावर या सगळ्या गोष्टी पोहचल्या. तिने दिव्याला आपल्या खोलीत बोलावून घेतले. तेव्हा रुपालीसोबत तिच्या मैत्रिणीही होत्या. दिव्याला वाटले आपण रुपालीला खडे बोल सुनावण्याची आयती संधी आलेय. ती मोठ्या उत्साहाने खोलीत आली.

दिव्या, जाब विचारावा म्हणून मी तुला अजिबात बोलावलेलं नाही. फक्त माझे विचार तुला स्पष्टपणे सांगावेत, म्हणून तुझ्याशी बोलणार आहे. अर्थात माझे विचार तुला पटावेत असा आग्रहही त्यामागे नाही. रुपालीने दिव्या आल्या-आल्याच सुरुवात केली.

अगं, पण काय झालं?दिव्या आव आणत म्हणाली.

उगीच वेड पांघरून पेडगावला जाऊ नकोस. मुख्य मुद्दा असा होता की कॉमनरूममध्ये तसबीर लावण्याचा! पुजा करणे ही अनुषंगिक बाब होती. खरंतर त्यामुळे कॉमनरूममधील अडगळ कमी होईल नि स्वच्छता राखली जाईल, एवढाच उद्देश होता. आपण शाळेत आपल्या वैयक्तिक श्रद्धा सांभाळायला येत नाहीत. पण तुला हवं असेल तर तू तुझी श्रद्धा सांभाळू शकतेस. मी नास्तिक आहे किंवा आस्तिक आहे हे तू कशावरून ठरवलंस? तू यापूर्वी माझं मत कधी विचारलं होतंस? गायनासाठी तुला बोलावंलं होतं, मात्र तू माझ्या आस्तिक-नास्तिकाच्या वादात पडलीस नि एका चांगल्या संधीला हुकलीस. यात कोणाचं नुकसान झालं हे तूच तपासून बघ. तुला आम्ही आमची मैत्रीण मानतो. शेवटी निर्णय तुझा आहे. रुपालीने बोलणे थांबवले.

दिव्याला वाटलं होतं,रुपाली जाब विचारेल. खरं-खोटं करायला सांगेल. पण तिच्या शांत आणि विचारपूर्वक बोलण्यावर नेमकं काय उत्तर द्यावं, हे दिव्याला सूचेना. ती इतर मैत्रिणींच्या तोंडाकडे पाहू लागली. त्यांनीही आपली तोंडं फिरवली. दिव्याला आपली चूक उमगली. बराच वेळ ती गप्प राहिली. मग एकदम पुढे येत म्हणाली,मला माफ कर.मी चुकीचे वागले. यापुढे असं वागणार नाही.

अगं,असं नको म्हणूस! आपल्या मनात द्वेषाची भावना येता कामा नये. आपण आणखी दोन-तीन वर्ष एकत्र राहणार आहोत. आहोत तोपर्यंत एकमेकांशी चांगलं वागायचं, अशी माझी आई मला नेहमी सांगते. जे झालं ते विसरून जा.आपण पुन्हा एखाद्या कार्यक्रमात नक्की एकत्र येऊ. तू येशील याची मला खात्री आहे.

रुपालीचे बोलणे ऐकून दिव्याच्या डोळ्यात अश्रू आले. मैत्रिणींना रुपालीविषयी अभिमान वाटला.

नक्की! आणि मला तुझ्या आईलाही भेटावसं वाटतंय! असं म्हणत तिने रुपालीला गच्च मिठी मारली.

वाचाल तर वाचाल

# मायबोलीच्या अस्सल चवीचा साहित्यिक आस्वाद : 'आंगसे रस्सा'

खान्देशच्या खाद्यसंस्कृतीत 'आंगसे रस्सा' चा पदार्थ जितका साधा दिसतो, तितकाच तो चवीने समृद्ध असतो. अगदी त्याचप्रमाणे मच्छिंद्र वाघ यांचा 'आंगसे रस्सा' हा कथासंग्रह आकाराने छोटा असला, तरी आशयाच्या गाभाऱ्यात अफाट जीवनानुभव, लोकसंस्कृतीचे वैभव आणि माणुसकीचा उबदार स्पर्श सामावून घेतो. प्रत्येक कथा वाचकाच्या मनाला भिडते, विचारांना चालना देते आणि वाचनानंतरही दीर्घकाळ स्मरणात राहते.




या कथासंग्रहाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अहिराणी बोलीभाषेचा अस्सल गोडवा. हरवत चाललेल्या म्हणी, ओव्या, वाक्प्रचार आणि लोकजीवनातील भाषिक संपदा लेखकाने अत्यंत नैसर्गिकरीत्या कथांमध्ये गुंफली आहे. त्यामुळे कथा केवळ वाचल्या जात नाहीत, तर त्या अनुभवाव्या लागतात. लेखकाने आपल्या लेखणीतून अहिराणीच्या मौखिक परंपरेला जणू नवसंजीवनीच दिली आहे.

'पिप्पयना पार' ही संग्रहातील पहिली कथा गावच्या पारावर बसलेल्या ज्येष्ठांच्या गप्पांमधून उलगडत जाते. गावातील बदल, नातेसंबंध, अनुभव, संस्कार, सामाजिक जाण आणि जीवनाचे तत्त्वज्ञान यांचे अत्यंत प्रभावी चित्रण या कथेत आढळते. बदलत्या काळातही कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व आणि माणुसकीची उब जपणाऱ्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन ही कथा घडवते.

या कथांमध्ये विणलेल्या ओव्या हा या पुस्तकाचा आत्माच म्हणावा लागेल.

सासू नी सासरा मना जिवले आसरा,
माता नी पिता जन्म देणारा दूसरा...झ

या ओव्यांतून आई-वडील आणि सासू-सासऱ्यांविषयीचा आदर, कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व आणि संस्कारांचे मूल्य अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाले आहे.

ग्रामीण जीवनातील सहज विनोद, मिश्कीलपणा आणि लोकभाषेतील खुमासदार शैली पुढील ओवीतून खुलून येते-

कुकू लाये नार जशी तलवारनी आनी,
नको भारी भरू, तुले दुसरी करी आणि...झ

तर जीवनातील चढ-उतारांची जाणीव करून देणारी ही ओवी मनाला खोलवर स्पर्श करते- नको हासू नार मन्हा फाटेल लुगडाले,
उशीर नई लागावू मन्ह दैवं हुगडाले...झ

या ओव्या माणसाला नम्रतेचा आणि संवेदनशीलतेचा मौल्यवान संदेश देतात.

सामाजिक वास्तवाचे चित्रण करताना लेखकाची लेखणी अधिक धारदार होते. स्त्रीजीवनातील वेदना, मानसिक गुलामगिरी, आंडेर बेटीचे वास्तव, रूढी-परंपरांतील विसंगती आणि समाजातील अन्याय यांवर त्यांनी अत्यंत संवेदनशील शब्दांत भाष्य केले आहे. काय सांगू पिता मन्ही जलमनी कथा,
हाई तपती ऊनथी भरी माले लोटी तरी देता...झ

ही ओवी वाचताना एका स्त्रीच्या मनातील वेदना, असहाय्यता आणि तिच्या अस्तित्वाची घुसमट तीव्रतेने जाणवते. लेखकाचा सामाजिक दृष्टिकोन आणि मानवी संवेदनशीलता येथे प्रकर्षाने जाणवते.



या कथासंग्रहात गावाकडचे जीवन, लोकसंस्कृती, चालीरीती, अंधश्रद्धा, बदलते सामाजिक वास्तव, नातेसंबंध, माणुसकी आणि स्थलांतरितांच्या जीवनातील संघर्ष यांचे वास्तवदर्शी चित्रण आहे. गावच्या पारापासून ते मुंबईच्या प्रवासापर्यंत लेखकाने अनेक विषय प्रभावी कथारूपात मांडले आहेत. हे पुस्तक वाचताना एखादी दर्जेदार वेबसिरीज अनुभवत असल्याची भावना निर्माण होते. प्रत्येक कथा नवीन अनुभव देते, प्रत्येक पान नवीन विचार देऊन जाते आणि प्रत्येक ओवी आपल्या मायबोलीच्या वैभवाची नव्याने जाणीव करून देते.

'आंगसे रस्सा' हा केवळ कथासंग्रह नाही; तर अहिराणी भाषा, लोकपरंपरा, ओव्या, म्हणी आणि खान्देशच्या सांस्कृतिक अस्मितेचा जपणारा एक महत्त्वाचा साहित्यिक दस्तऐवज आहे. या पुस्तकामुळे वाचकाला अहिराणी शब्दसंपदा आणि लोकजीवनाचा अनमोल ठेवा अनुभवता येतो.

लेखक मच्छिन्द्र वाघ यांचे मनःपूर्वक अभिनंदन! त्यांच्या लेखणीतून अशीच मायबोली समृद्ध करणारी, समाजाला विचार देणारी आणि अहिराणी भाषेचे वैभव जपणारी साहित्यनिर्मिती सातत्याने घडत राहो, हीच सदिच्छा.

अहिराणीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक वाचकाने 'आंगसे रस्सा' हा कथासंग्रह अवश्य वाचावा. या पुस्तकातून केवळ कथा नव्हे, तर आपल्या मातीचा सुगंध, मायबोलीचा गोडवा आणि लोकसंस्कृतीचे चिरंतन वैभव अनुभवायला मिळते.

**- कवी मोहन पाटील कवळीथकर. मो.नं.-९८९८२०६९६४. पुस्तकाचे नावः- आंगसे रस्सा लेखकः- मच्छिंद्र वाघ.९८५०७७०७४५ प्रकाशकः- अनित्य प्रकाशन, मुंबई.**



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

## माझा खान्देश

# राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

भारतीय स्वातंत्र्याचा लढा आपल्या इतिहासातील एक रोमहर्षक पर्व आहे. वर्षानुवर्ष लुटारू, दरोडेखोर ठरविण्यात आलेल्या भिल्ल समाजात तंट्या भिल, खाज्या नाईक, भीमा नाईक,बिरसा मुंडा यांच्यासारखे शूरवीर पुरुष होऊन गेले. परंतु ब्रिटिशांनी लिहिलेल्या त्यांचा सोयीचा इतिहास आणि स्वातंत्र्यानंतरही इतिहासकारांनी आदिवासींचा शौर्याचा इतिहास पूर्णपणे समोर आणला नाही ही वस्तुस्थिती आहे. अत्यंत धाडसी, स्वातंत्र्यप्रेमी, संघर्षशील, धैर्यवान असलेल्या आदिवासी समाजातील क्रांतिकारी पुरुष-महिलांचा गौरवशाली व संघर्षशील जीवनाचा इतिहास तसेच स्वातंत्र्य संग्रामासाठी निस्वार्थपणे लढलेल्या भिल्ल समाजातील वीर पुरुषांची संघर्ष कहाणी लेख मालिकेतून मांडण्याचा छोटासा प्रयत्न.

क्रांतिवीर खाज्या नाईक

भारतातील आदिवासी प्राचीन काळापासून स्वतंत्र वृत्तीने रानावनात निसर्गाशी एकरूप अवस्थेत जीवन जगत आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक समाज गटांचा सक्रिय सहभाग होता त्यात आदिवासींचा सुद्धा फार मोठा सहभाग असल्याचे इतिहासाची पाने चाळतांना दिसून येतो.बस्तर, मुंडा, संथाल, मीना या आदिवासी समूहांनी तसेच तंट्या मामा, भीमा नाईक, खाज्या नाईक, उमाजी नाईक,बाबूजी नाईक या विद्रोही शूरवीर लढवय्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या उठावाला जगाच्या इतिहासात तोड नाही.

खानदेशातील सन १८१८ ते सन १८६० हा कालखंड पेशवाई नंतरच्या ब्रिटिश साम्राज्य प्रस्थापित झालेल्या काळात जवळपास ४२ वर्ष सतत विद्रोह संघर्षाने पेटलेला हा कालखंड होता.या कालखंडात इंग्रजांना साम्राज्यात शांतता अनुभवता आली नाही.कारण याच कालखंडात खानदेशात राष्ट्रीय उद्रेक उफाळून आला होता .खाज्या नाईक या लढवय्या आदिवासी क्रांतिवीराने इंग्रजांना जेरीस आणले होते. काज्या ,खाज्या ,काजिसिंग, खर्जासिंग अशा विविध नावांनी खाज्या उपाख्य खाज्यासिंग नाईक प्रसिद्ध होते. खाज्या नाईक याचे नाव ब्रिटिश अधिकाऱ्याचा उच्चारामुळे काज्यासिंग झाले. कालांतराने अपभ्रंश होत त्याचे नाव खाज्या नाईक झाले. वास्तविक त्यांच्या नाईक आडनावाबद्दल देखील संभ्रम आहे. कुठेही त्याची स्पष्ट नोंद नाही. मात्र सांगवी- पळासनेर भागातील एका पाड्यावर ते राहायचे अशी आख्यायिका आहे.त्यांचे वडील गुमानसिंग नाईक ब्रिटिश सैन्यात सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत होते.त्यांच्यावर मुंबई -आग्रा रस्त्यावरील शिरपूर -सेंधवा घाटाची संरक्षणाची जबाबदारी होती.या घाटातून इंग्रजांनी गोळा केलेला महसूल तसेच दिल्ली-आग्रा येथील व्यापाऱ्यांचा खजिना मुंबई येथे नेण्यात येत होता.साधारण १८१८ ते १८३१ अशी १३ वर्षे त्यांनी सेवा बजावली. त्यांच्या प्रामाणिक कार्याची दखल घेत ब्रिटिशांनी त्यांचा मुलगा काजेसिंग (खाज्या) वर सोपवली.१८३१ ते १८५१ खाज्या नाईक यांनी देखील आपल्या वडिलांप्रमाणे प्रामाणिक नोकरी केली.खानदेशचा 'रॉबिन हूड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खाज्या नाईक यांचा जन्म, जन्म स्थळ व सुरुवातीच्या जीवनाबद्दल वेगवेगळे मतप्रवाह असले तरी तरुणपणी अन्यायाच्या विरोधात युवकांना संघटित करून सावकाराविरुद्ध दंड थोपटणारे खाज्या नाईक नंतरच्या काळात ब्रिटिश सैन्य दलात शिपाई या पदावर भरती झाला. खजिना ने-आण करणाऱ्या सेंधवा-बिजासन घाटाचे संरक्षक म्हणून त्याने १८३१ ते १८५१ अशी सतत वीस वर्ष काम पाहिले. जवळपास ४० मैलाचा सेंधवा-बिजासन घाटातील घनदाट जंगल असलेले क्षेत्र त्याच्याकडे होते. घाट भागातून जाणाऱ्या बैलगाड्या व प्रवासी वाहनांना सुरक्षा देवून लुटीच्या प्रकारास पायबंद घालणे ,वेळप्रसंगी परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर बळाचा वापर करणे ही कर्तव्ये पार पाडण्यासाठी खाज्या नाईक यांची खास नेमणूक करून त्यांना तसे आदेश ब्रिटिशांनी दिले होते. या काळात त्यांनी चोख नोकरी बजावली होती.परंतु १८५१ साली एका गुन्हेगाराच्या गुन्ह्याची चौकशी करीत असताना बेदम मारहाण होऊन गुन्हेगाराचा मृत्यू झाला. त्या गुन्ह्यात मनुष्यवधाचा खटला त्याच्यावर भरण्यात आला. त्याला दहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.परंतु त्यांच्या चांगल्या वर्तणुकीमुळे कोर्टाने पाच वर्षाची शिक्षा कमी करून त्यांना मुक्त केले. त्याने पुन्हा नोकरी मागितली परंतु त्यांना नाकारण्यात आले. त्याचवेळी १८५७ मध्ये उत्तर भारतात उठावाचे व बंडाचे वारे वाहू लागले होते. त्या वेळची परिस्थिती व गरज पाहून इंग्रजांनी खाज्या नाईक यांना पुन्हा कामावर घेतले. एका लहानशा चुकीमुळे कॅप्टन बर्च यांनी त्यांना अपमानित वागणूक दिली. खाज्या नाईकांचा स्वाभिमान जागा झाला, त्यांनी तत्काळ राजीनामा देऊन ते नोकरीतून बाहेर पडले. खाज्या नाईक याने वीस वर्षे इमाने इतबारे ब्रिटिशांची सेवा केली होती .परंतु कॅप्टन बर्च यांनी चूक नसताना त्यांना दिलेल्या शिव्या त्यांच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचून गेल्या. खाज्या नाईक यांनी नोकरीवर असताना ब्रिटिश रणनीती, युद्धनीती आणि व्यूहरचनेचे पुरेपूर ज्ञान प्राप्त करून घेतले होते .परंतु त्यांच्या मनात बदल्याची भावना अतिशय तीव्र झाली. त्यांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध दंड थोपटले. ते विचार करू लागले की,' हे गोरे लोक फक्त आपला वापर करून घेतात वापर केल्यावर सोडून देतात.अपमानाचा बदला आपण घेतलाच पाहिजे' या विचाराने ते पेटून उठले. इंग्रजांविरुद्ध बंड पुकारण्यासाठी त्यांनी आपल्या माणसांची जमवाजमव करून तुकडी उभी केली. होळकर राज्यातील काढून टाकलेले सैनिक रोहिले, पठाण, मकरानी येऊन त्यांना मिळाले. भीमा नाईक सारखा कुशल मार्गदर्शक त्यांना मिळाला होता.





११ एप्रिल १८५८ चा दिवस तत्कालीन खानदेशातील स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वाचा दिवस. या दिवशी शिरपूर जवळील अंबापाणीचे जंगल, ब्रिटीश सरकारच्या अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज सैनिकांनी चहुबाजूंनी घेराव घातलेला असतांना खाज्या नाईकांच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी ब्रिटिश सैन्याला दिवसभर झुंज दिली.ब्रिटिश अधिकारी व सैनिकांना ठार मारले. भिल्ल समाजातील महिला-पुरुषांनी एकत्रितपणे लढा दिला होता . खाज्या नाईकांनी ब्रिटिशांच्या नाकात दम आणला होता. ब्रिटिशांनी त्यांना जिवंत पकडून अथवा ठार करणाऱ्यास दोन हजार रुपयांचे बक्षीस व नोकरीत बढती अशा प्रकारचे आमिष दाखवण्यात आले. या आमिष व लालसेपोटी खाज्या नाईक यांच्या सैन्यात एकेकाळी सेवक असलेल्या रोहिद्दिन मकरानी याने खाज्या नाईक यांना ठार मारण्याचा कट रचला. खाज्या नाईक जंगलात गोई नदीच्या काठावर सकाळच्या प्रहरी आंघोळ करीत असताना मकरानी हा त्यांच्याजवळ गोड बोलून पोहोचला व खाज्या नाईक यांचे लक्ष दुसरीकडे वळताच त्यांच्या पाठीत गोळ्या घातल्या. खाज्या नाईक याला ठार केल्याचे ब्रिटिश अधिकाऱ्यांना दाखवण्यासाठी मकरानी याने खाज्या नाईक यांचे शिर तलवारीने कलम केले. धरणगाव येथे खाज्या नाईक यांच्या मुलाने वडिलांचे शिर ओळखत ब्रिटिश अधिकाऱ्यांसमोर मकरानी यांना शिवा घातल्या. त्यानंतर मकरानीला नोकरीत बढती मिळून दोन हजारांचे बक्षीस देण्यात आले. विश्वासघाताने पाठीत गोळ्या घालून या क्रांतीवीराची हत्या करण्यात आली. १८५७ च्या काळात आदिवासींच्या लढ्याचे मुख्य केंद्र असलेल्या धरणगाव रेल्वे स्टेशन व मिल्ट्री कॅम्प (आताचा धरणगाव रेल्वे स्थानकासमोरील भाग) यांच्यासमोर उभे असलेल्या झाडावर त्यांचे शिर तब्बल सात दिवस लटकविण्यात आले. या घटनेचे स्मरण म्हणून आदिवासी मोठ्या संख्येने दरवर्षी ११ एप्रिल रोजी धरणगाव तसेच शिरपूर जवळील अंबापाणी येथे एकत्र जमत खाज्या नाईक यांना श्रद्धांजली वाहतात.अंबापाणी व धरणगाव येथे जाजू परिवाराने खाज्या नाईक यांचे छोटे मंदिर बांधत त्यांच्या स्मृती जपल्या आहेत. गेल्या चार पिढ्यांपासून जाजू परिवारातील महिला दररोज सायंकाळी याठिकाणी दिवा लावत असतात. खाज्या नाईक यांचा मृत्यू कधी झाला याबाबत शासकीय नोंदी व इतिहासकारांमध्ये मोठे मतभेद आहेत. जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाचे गॅझेट तसेच धरणगाव नगरपालिकेच्या सुवर्ण महोत्सवाच्या स्मरण पुस्तिकेत त्यांचा उल्लेख आहे. इतिहासाचे अभ्यासक प्रा.डॉ.धनंजय चौधरी, वीरसिंग पाडवी तसेच डॉ.कांतीलाल टाटीया व अन्य इतिहास विषयाच्या अभ्यासकांनी खाज्या नाईक यांच्याशी संबंधित स्थळांना भेटी व माहिती गोळा करून आपापल्या पद्धतीने लेखी पुराव्यांच्या आधारे खाज्या नाईक यांचा मृत्यू ११ एप्रिल १८५८ रोजी अंबापाणीच्या लढाईत झाला व त्यांचा मुलाचाही याच लढाईत मृत्यू झाल्याचे सांगितले आहे. परंतु तत्कालीन ईस्ट खानदेशचे कलेक्टर असलेले ए.एन.ए. सीमकॉक्स यांनी 'ए मेमॉयर ऑफ दि खानदेश भिल्ल क्रॉप्स' या पुस्तकात खाज्या नाईक यांचे शिर कलम करून आणल्यानंतर त्यांच्या मुलाने ते शिर ओळखले असल्याचे म्हटले आहे. मुंबईचे पुराभिलेख (एलफिस्टन कॉलेज) तसेच पुणे येथील पेशवे दप्तरातील भिल्ल समाजाच्या या व अन्य उठावासंबंधी ब्रिटिशकालीन अनेक दस्तऐवजात खाज्या नाईक यांच्या संदर्भातील उल्लेख आढळतो.बलाढ्य असे ब्रिटिश साम्राज्य ज्या साम्राज्यावर सूर्याचा अस्त होत नसे, अशा साम्राज्याविरुद्ध दंड थोपटून उभा राहणारा खानदेशातील भिल्ल समाजाचा हा क्रांतीकारी वीर खाज्या नाईक तसेच अंबापाणी लढाईत भिल्ल समाजातील महिला-पुरुषांनी दाखवलेले शौर्य इतिहासकारांनी तसे उपेक्षितच ठेवले, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. केवळ मौखिक परंपरेने चालत आलेल्या कथा-गीतांमधून आणि जनसामान्यांच्या स्मृतीतून हा इतिहास सांगितला जातो.

खाज्या नाईक यांचा दरारा-

खाज्या नाईक यांचे जीवन, जीवनचर्या ,जीवन निष्ठा व जीवनदर्शन एखाद्या मिथकासारखे होते. खाज्या नाईक यांना खुनाच्या आरोपाखाली कारागृहात टाकल्यानंतर मुंबई, आग्रा रोडवरील भिल्ल समाजातील तरुणांचे हल्ले वाढले. याच दरम्यान खानदेशात देखील भिल्ल समाजाच्या विविध टोळ्यांनी इंग्रजांना जेरीस आणले. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या लक्षात आले की, खाज्या नाईक यांना सोडल्यास या सगळ्या गोष्टीवर नियंत्रण मिळविता येईल. म्हणून त्यांनी चांगल्या वर्तणूकीचा दाखला देत, खाज्या नाईक यांना पाच वर्ष आधीच सोडले.नंतर त्याला नोकरीत घेतले नाही परंतु परिस्थिती पाहून पुन्हा ब्रिटीश सैन्यात येण्यास सांगितले. दरम्यान ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून झालेल्या अन्यायाच्या भावनेतून खाज्या नाईक यांनी इंग्रजाविरुध्दच्या लढ्याची मशाल हातात घेत, भिल्ल समाजातील तरुणाची एक सशस्त्र सेना तयार केली. कालांतराने त्यांना भिमा नाईक, महादेव नाईक, दौलत नाईक, काळूबाबा, आनंदा नाईक, रूमाल्या नाईक यांच्यासह महत्वाचे साथीदार मिळाले. त्यांनी ब्रिटीश सैन्यातील अधिकारी व ब्रिटीश सरकारला मदत करणाऱ्या सावकारांच्या घरी दरोडे घालण्यास सुरुवात केली. त्रस्त झालेल्या ब्रिटीश सरकारने यामुळे त्यांच्यावर दोन हजाराचे बक्षीस ठेवले. आपली स्वतःची एक सशस्त्र सेना तयार केल्यानंतर खाज्या नाईक यांनी अनेक ठिकाणी दरोडे टाकले. १ नोव्हेंबर १८५७ रोजी सुलतानपुर तालुक्यातील गावावर हल्ला केल्यानंतर भीमा नाईकच्या नेतृत्वाखाली याच दरम्यान ब्रिटीश अधिकारी कॅ. कॅनडी यांच्यावर मोठा हल्ला चढविला व त्याला पराभूत केले. यानंतर खाजा नाईक यांनी सेंधवा घाटावर कब्जा मिळवीत ब्रिटीशऐवजी स्वतः कर वसुल करण्यास सुरुवात केली. त्यांच्या अनेक छोटे मोठे इंग्रज अधिकाऱ्यांवरील हल्यांमुळे ब्रिटीश सरकार जेरीस आले. त्यांचा दरारा दिवसेंदिवस वाढत होता. त्यामुळेच खाज्या नाईकांच्या भितीपोटी इंग्रज अधिकाऱ्यांना मुंबई-आग्रारोड असुरक्षीत वाटू लागला. या लुटीने ब्रिटीश सरकार हादरले. स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांकडून ब्रिटीश सरकारला खाज्या नाईक यांच्या नेतृत्वात उठाव करणाऱ्या अनेक भिल्ल समाजाच्या तरुणांच्या बातम्या पोहचल्या. त्यांच्याविरुध्द कारवाईची योजना ब्रिटीश सरकार आखत असतांनाच १७ नोव्हेंबर १८५७ साली खाजा नाईक यांनी आपला मित्र भीमा नाईकसह तीनशे भिल्ल तरुणांना सोबत घेत जांभळी चौकात ब्रिटीशांचा खजिना लुटला. या खजिन्याच्या संरक्षणासाठी सशस्त्र ब्रिटीशांचे २०० तर ३०० भिल्ल सैनिक नियुक्त होते. या लुटीच्या वेळी त्यांना भीतीपोटी कोणीही विरोध अथवा प्रतिकार केला नाही. खजान्यात तत्कालीन चांदीची चलनातील नाणी होती. एवढ्या मोठ्या रक्कमेचा खजाना अगदी सहजरित्या लुटून नेल्यामुळे ब्रिटीश सरकार प्रचंड हादरले. (पान ६ वर)



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

## अर्थवेध

# ट्रस्ट साठी लागू असलेल्या आयकर व जीएसटी कायद्याच्या तरतुदी

भारतात, प्रामुख्याने दोन प्रकारचे ट्रस्ट आसतात. खाजगी ट्रस्ट आणि सार्वजनिक ट्रस्ट.

खाजगी ट्रस्ट :- खाजगी ट्रस्ट म्हणजे ज्या ट्रस्टच्या मालमत्तेचा किंवा ट्रस्टपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा लाभ विशिष्ट व्यक्ती किंवा विशिष्ट गटाला मिळतो, त्या ट्रस्टला खाजगी ट्रस्ट म्हणतात. खाजगी ट्रस्टची नोंदणी करणे प्रत्येक वेळी बंधनकारक नसते. मात्र, ट्रस्टमध्ये स्थावर मालमत्तेचा समावेश असेल, तर परिस्थितीनुसार लिखित ट्रस्ट डीड आवश्यक असतो. खाजगी ट्रस्टसाठी Indian Trusts Act, १८८२ मधील तरतुदी लागू होतात. सामान्यतः सार्वजनिक धर्मादाय ट्रस्टना मिळणारी आयकर सवलत खाजगी ट्रस्टला मिळत नाही.

सार्वजनिक ट्रस्ट :-

सार्वजनिक ट्रस्ट म्हणजे सर्वसामान्य जनता किंवा जनतेच्या मोठ्या समूहाच्या हितासाठी स्थापन केलेला ट्रस्ट होय. अशा ट्रस्टची स्थापना ट्रस्ट डीडद्वारे धार्मिक, धर्मादाय, परोपकारी किंवा लोकहिताच्या उद्देशाने केली जाऊ शकते. काही ट्रस्ट धार्मिक आणि धर्मादाय अशा दोन्ही उद्देशांसाठीही स्थापन केले जातात.

मंदिर, मठ, चर्च किंवा इतर धार्मिक उपासनेच्या ठिकाणांसाठी स्थापन केलेले ट्रस्ट तसेच शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, गरजू व्यक्तींना मदत, पर्यावरण संवर्धन इत्यादी कामे करणाऱ्या संस्थांचा यामध्ये समावेश होऊ शकतो. Societies Registration -ct, १८६० अंतर्गत नोंदणीकृत धार्मिक किंवा धर्मादाय संस्था देखील त्यांच्या स्वरूपानुसार या करव्यवस्थेतील पात्र संस्थांमध्ये येऊ शकतात.

भारतात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, वैद्यकीय आणि इतर समाजोपयोगी कार्य करणाऱ्या पात्र संस्थांना आयकर कायद्यात विशेष करसवलती दिल्या आहेत. मात्र, केवळ ट्रस्टची स्थापना केली म्हणून त्याचे सर्व उत्पन्न आयकरमुक्त होत नाही. आयकर सवलतीचा लाभ घेण्यासाठी ट्रस्टने Income-tax -ct, २०२५ मधील नोंदणी, उत्पन्नाचा योग्य वापर, गुंतवणूक, लेखापरीक्षण आणि रिटर्न भरणे यांसारख्या आवश्यक अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

आयकर कायद्याचे कलम ३३६ धर्मादाय ट्रस्ट आणि संस्थांच्या अंतर्गत मालमत्तेतून मिळणाऱ्या उत्पन्नासाठी वजावट प्रदान करते. त्यांच्यावर दावा करण्यासाठी, हे उत्पन्न केवळ धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी कार्यरत असलेल्या मालमत्तेतून आले पाहिजे आणि संस्थांनी आयकर कायद्याच्या कलम ३३२ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त केले पाहिजे. जर ट्रस्ट सामाजिक कार्यासोबत काही व्यवसाय करत असेल आणि तो व्यवसाय ट्रस्टच्या उद्देशास अनुषंगिक नसेल तर ट्रस्टला व्यवसायातून मिळालेला नफा किंवा उत्पन्नावर वजावट मिळत नाही. अशावेळी ट्रस्टला त्या व्यवसायाची सर्व खाते पुस्तके वेगळी ठेवावी लागतात.

याव्यतिरिक्त, आयकर सवलती मिळवण्यासाठी इतर अनेक अटी आहेत.

१) ज्या उद्देशांसाठी व्यक्ती या संस्थांना देणगी देतात ते कायद्याच्या कलम ३५४ अंतर्गत येणे आवश्यक आहे.

२) ट्रस्ट कडे असलेल्या निधीची गुंतवणूक ही आयकर कायद्याच्या कलम ३५० मध्ये दिलेल्या संसाधनामध्येच केली पाहिजे.

३) ट्रस्टचे उत्पन्न किंवा मालमत्तेचा फायदा थेट किंवा अप्रत्यक्षपणे ट्रस्टचे संस्थापक, विश्वस्त, व्यवस्थापक, संबंधित व्यक्ती किंवा कायद्यात नमूद केलेल्या संबंधित व्यक्तींना होऊ नये.

४) ट्रस्टच्या उत्पन्नाचा वापर कायद्यातील अटींचे उल्लंघन करून एखाद्या विशिष्ट धार्मिक समुदायाच्या किंवा जातीच्या फायद्यासाठी केला जाऊ नये.

५) धर्मादाय संस्था किंवा ट्रस्टना मिळणारे निधी हे ऐच्छिक योगदानाच्या स्वरूपात असले पाहिजेत.

ट्रस्टचा खर्च त्याच्या धर्मादाय किंवा धार्मिक उद्देशांसाठीच केला पाहिजे आणि उत्पन्नाचा वापर कायद्यातील अटींनुसार झाला पाहिजे.

आयकर कायद्याच्या कलम ३३६ अंतर्गत सूट :-

ट्रस्टने मागील आर्थिक वर्षात धार्मिक किंवा धर्मदाय कार्यातून मिळवलेल्या उत्पन्नापैकी ८५% खर्च ट्रस्टच्या धर्मादाय या धार्मिक उद्देशासाठी केल्यास उर्वरित १५ टक्के रकमेवर ट्रस्टला कोणताही टॅक्स भरावा लागत नाही. १५% पर्यंत वजावट म्हणून दावा करता येतो. ८५% खर्चाची गणना करताना भांडवली व महसुली खर्च दोघही ग्राह्य धरले जातात.

जर ३३२ मध्ये रजिस्टर असलेल्या ट्रस्टने ८५% खर्च केला नाही तर त्या ट्रस्टला तेवढा फरकाची रक्कम भविष्यातील विनियोगासाठी साठवून ठेवता येते परंतु त्यासाठी आयकर कायद्याचा फॉर्म १०९ भरावा लागतो संस्था जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत ही रक्कम साठवून ठेवू शकते पाच वर्षाच्या आत ट्रस्टला ती रक्कम ठरलेल्या नियोजित कामासाठी वापरावी लागते.

आयकर कायदा, २०२५ कलम ३३२ नोंदणी:- (जुन्या कायद्यातील १२-)

आयकर कायदा, १९६१ च्या कलम ३३२ मध्ये धर्मादाय ट्रस्ट आणि संस्थांना आयकरातून सूट देण्याची तरतूद आहे. कलम ३३२ अंतर्गत सूट मिळण्यासाठी, ट्रस्ट किंवा संस्था आयकर कायदा, २०२५ च्या कलम ३३२ अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

आयकर कायद्याच्या ३३२ मध्ये नोंदणीकृत नसलेले धर्मादाय ट्रस्टला उत्पन्नातून वजावटीची सवलत मिळत नाही व त्याला असोसिएशन ऑफ पर्सन समजले जाते व त्यानुसार नुसार मॅक्सिमम मार्जिनल रेट (कमाल सीमांत दर) (३५.८८%) नुसार टॅक्स भरावा लागतो त्यामुळे धर्मदाय ट्रस्टला वजावटीचा लाभ घेण्यासाठी आयकर कायद्याच्या ३३२ मध्ये नोंदणी करणे आवश्यक असते.

आयकर कायदा, २०२५ कलम ३५४ नोंदणी:- (जुन्या कायद्यातील ८०ऋ)

आयकर कायदा, २०२५ च्या कलम ३५४ मध्ये काही धर्मादाय संस्थांना दिलेल्या देणग्यांसाठी देणगीदारांना प्राप्तिकरातून सवलत/कपात करण्याची तरतूद आहे. कलम ३५४ अंतर्गत कपातीसाठी पात्र होण्यासाठी, धर्मादाय संस्था आयकर कायदा, २०२५ च्या कलम ३५४ अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३५४ अंतर्गत नोंदणी असलेल्या ट्रस्टला सर्व देणगीदारांची यादी आयकर विभागाला वर्ष संपल्यानंतर ३१ मे पूर्वी ऑनलाइन स्वरूपात ११३ या फॉर्मद्वारे नोंदवावी लागते. तरच देणगीदारांना १३३ अंतर्गत देणगीची वजावट मिळत असते.

३५४ नोंदणी साठी पुढील संस्था पात्र आहेत: धर्मादाय ट्रस्ट, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, समाजकल्याण संस्था, धार्मिक संस्था, क्रीडा क्लब, पर्यावरण संस्था इत्यादी क्षेत्रात काम करणाऱ्या ट्रस्टला नोंदणी मिळत असते.

आयकर/प्राप्तिकर कायद्यातील (ऑडिट) लेखापरीक्षणाच्या तरतुदी :-

ट्रस्ट कायद्यानुसार प्रत्येक ट्रस्टला आपले आर्थिक पत्रकांचे वर्ष संपल्यानंतर ऑडिट करून घ्यावे लागते व त्याचे विवरण पत्र धर्मदायआयुक्तकडे ऑनलाइन स्वरूपात व प्रत्यक्ष स्वरूपात जमा करावे. आयकर कायद्याच्या कलम ३३५ अंतर्गत सूट मिळविण्यासाठी ट्रस्टसाठी त्याच्या खात्यांच्या पुस्तकांचे ऑडिट करणे अनिवार्य आहे.

धर्मादाय व धार्मिक ट्रस्ट साठी जीएसटी लागू आहे का?

धर्मादाय आणि धार्मिक ट्रस्ट या प्रामुख्याने अशा संस्था आहेत ज्या समाजाच्या सुधारणेसाठी कार्य करतात आणि मोठ्या प्रमाणावर जनतेची सेवा करतात. ते मुख्यतः एकतर गैर-सरकारी संस्थांच्या स्वरूपात किंवा विविध धर्मांच्या पूजास्थानांच्या ट्रस्टच्या (पान ६ वर)

# १३ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय आदिवासी अधिकार दिवस

## प्रत्येक आदिवासी पर्यत पोहचण्याची आवश्यकता

के.के.पावरा
मु.चोंदवाडे खुर्द,मो. ९४२३७२७३७६

१३ सप्टेंबरला आंतरराष्ट्रीय आदिवासी अधिकार दिवस म्हणून संयुक्त राष्ट्र संघाद्वारे घोषणा करण्यात आली आहे. मात्र अद्याप या दिवसाविषयी फारशी माहिती सामान्य आदिवासी बांधवा पर्यत पोहचलेली नाही.युनोद्वारा तरतुद करण्यात आलेले आदिवासींचे अधिकार त्यांच्या पर्यत पोहचविण्याचे दायित्व शासनाचे आहे. याची जाणिव शासनाला करून देण्यासाठी व आपल्या हक्क अधिकार प्रती जागृत होण्यासाठी १३ सप्टेंबर आदिवासी अधिकार दिन जनसामान्य आदिवासी पर्यत पोहचण्याची आवश्यकता आहे.

९ ऑगष्ट हा विश्व आदिवासी दिवस ज्या पध्दतीने प्रत्येक आदिवासींच्या घराघरा पर्यत पोहचला अगदी तसाच १३ सप्टेंबर विश्व आदिवासी अधिकार दिवस हा सुद्धा प्रत्येक आदिवासी पर्यत पोहचविण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत २३ डिसेंबर १९९४ ठराव पारीत करून ९ ऑगस्ट हा विश्व आदिवासी दिवस असेल अशी घोषणा करण्यात आली होती. मात्र सरकारच्या उदासिनतेमुळे या दिवसाची माहिती आदिवासी कार्यकर्त्यापर्यत पोहचण्यास एका दशकाचा कालावधी लागला तर सामान्य आदिवासी पर्यत पोहचण्यास त्याला तब्बल दोन दशकाचा काळ गेल्यानंतर आता कुठे आदिवासी आणि इतरांनाही याची थोडी का असेना माहिती मिळाली आहे. तरीही काहींनी अजुनही ९ ऑगस्ट म्हणजे केवळ आदिवासींचा सण उत्सव आहे अशी समजुत करून घेतली आहे. त्यांच्या मानसिकतेत बदल होण्याची गरज आहे.

१३ सप्टेंबर या दिवसाला सुध्दा युनोने आंतरराष्ट्रीय आदिवासी अधिकार दिवस म्हणुन घोषित केले आहे. युनोच्या महासभेतील मानवाधिकार परीषदच्या ठराव क्र. १ /२दि. २९जून २००६मध्ये आदिवासींच्या अधिकारा विषयी ज्या शिफारसी करण्यात आल्या होत्या त्या लक्षात घेऊन तसेच दि. २० डिसेंबर २००६च्या युनोच्या महासभेतील ठराव क्र. ६१ /१७८ लक्षात घेऊन आदिवासींच्या अधिकारा विषयी विचार विमर्श करण्यासाठी पुरेसा वेळ घेण्यात आला. आणि शेवटी आदिसींची सांस्कृतिक ओळख, त्यांची भाषा, रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि त्यांचे जल, जंगल, जमिन यांच्यावरील निसर्गदत्त अधिकार, खनिज संपदावरील मालिकी हक्क, त्यांची संसाधने, संस्कृती, परपंरा अबाधित राहावेत व ते मजबुत करण्यासाठी युनोच्या १०७ व्या अधिवेशनात १३ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय आदिवासी अधिकार दिवस) म्हणून घोषित करण्यात आला.

आदिवासींचे युनोने बहाल केलेले संवैधानिक अधिकार व इतर तरतुदीचे काटेकोर पालन करण्याचे दायित्व सरकारचे होते मात्र विश्व आदिवासी दिनाप्रमाणेच याही दिवसाचा व्यापक प्रमणावर प्रचार- प्रसार करून आदिवासीचे अधिकार बहाल करण्यास अक्षम्य दुर्लक्ष भारत सरकारने केले. याउलट भारतात आदिवासी राहत नसल्याची भूमिका सरकारची आहे. तरीही वन अधिनियम २००६च्या प्रस्तावनेत आदिवासींवर ऐतिहासिक अन्याय झाला आहे हे सरकारने मान्य केले आहे. त्यामुळे त्यांना काही प्रमाणात जामिनीचे पट्टे मिळाले आहे परंतु जंगलावरील सामुहिक अधिकार अद्याप बहाल करण्यात आले नाही.युनोने घोषित केलेल्या विश्व आदिवासी दिवसाला १६ वर्ष झाले तरी काही आदिवासींना अद्याप त्याचा थांगपत्ताही लागलेला नाही. आदिवासी राजकिय नेतृत्त्वाने सुध्दा यावर फारसा उहापोह केलेला दिसत नाही. तरीही ९ ऑगस्ट प्रमाणेच १३ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय आदिवासी अधिकार दिवसाचा प्रसार प्रचार करण्यासाठी व आदिवासींना मिळालेले अधिकार त्यांना मिळवुन देण्यासाठी आदिवासी कार्यकर्ते आपल्या परीने प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. त्यामुळे तो दिवस दुर नाही ९ ऑगस्ट प्रमाणेच हाही दिवस सामान्य आदिवासींपर्यत नक्कीच पोहचेल आणि युनोने बहाल केलेले अधिकार मिळवुन घेण्यासाठी समस्त आदिवासी सरसावेल. त्यासाठी आपल्या सगळ्यांनाच त्या दृष्टीने जास्तीचे प्रयत्न करावे लागतील. त्या -त्या क्षेत्रातील राजकिय नेतृत्व यासाठी काही प्रयत्न करतील याची शाश्वती नाही. ते लोकांची गर्दी होण्याची वाट पाहतील आणि आयत्या मंचावर आपली राजकिय पोळी कशी भाजुन घेता येईल यासाठी प्रयत्न करतील. येणाऱ्या काळात तसे चित्र दिसल्यास नवल नाही.

युनो द्वारा घोषित आदिवासी अधिकार दिवस च्या माध्यमातुन जगातील आदिवासींना कोण कोणते अधिकार असतील याचे अनुच्छेद तयार करून त्याची घोषणा करण्यात आली आहे. या अनुच्छेद मध्ये आदिवासींचे अनेक अधिकार नमुद करण्यात आले आहे. त्यातील शासनास निर्देशित केलेले काही अत्यंत महत्त्वपुर्ण अधिकार खालीलप्रमाणे आहेत.

१. आदिवासींचा इतिहास, भाषा, मौखिक परंपरा तत्वज्ञान, लेखन प्रणाली व साहित्य संरक्षित ठेवण्यासाठी प्रभावी उपाय करील. राजकीय, कायदेशीर आणि शासकीय कार्यवाही योग्य सुविधामर्फ़त ऐकण्यासाठी व समजून घेण्यासाठी राज्य प्रभावी उपाय केल्याची खात्री करेल. अनुच्छेद १३(२)

२. सरकारी मालकीच्या प्रसारमाध्यमांमध्ये आदिवासींच्या संस्कृतीक विविधतेचे सर्वोतोपरी प्रतिबिंब दिसेल यासाठी प्रभावी उपाय करेल. तसेच खाजगी प्रसार माध्यमांना आदिवासींच्या सांस्कृतिक विविधतेचे सर्व प्रकारे प्रचार करण्यासाठी प्रोत्साहन देईल अनुच्छेद १६(२)

३. ज्या कायद्यामुळे किंवा प्रशासनिक निर्णयाद्वारे आदिवासी व्यक्तींवर परिणाम होतो, ते लागू करण्यापूर्वी, संबंधीत आदिवासी प्रतिनिधी संस्थांशी विचार विनिमय करून लेखी सहमती घेईल. अनुच्छेद १९

४. आदिवासींच्या परंपरागत मालकीच्या, कबज़्यातील किंवा कसत असलेल्या व नियंत्रणातील जमिनींना, भू-भागांना व संसाधनाना कायदेशीर मान्यता व संरक्षण देईल. अशा प्रकारचे संरक्षण, मान्यता देतांना राज्य संबंधित आदिवासी लोकांचे रितीरिवाज, परंपराचा सन्मानपूर्वक विचार करील. अनुच्छेद २६(३)

५. कोणत्याही प्रकल्पामुळें विशेतः खनिजे, जल व इतर संसाधने या संबधी विकास, उपभोग किंवा वापर करताना आदिवसींच्या (पान ६ वर)

# शब्दझुला



## पोया..

उठे पायठाम्हा माय घट्या
घुरुघुरु चाले
वलेल गहून्या त्या पोया माय
लागथीन पोयाले
घामेघूम हुई जाए धव्वीबरफ
ती पिठी
तगारीले बांधे साडी बठे पीठ
ती गायाले..
पीठ भरे तगारीम्हा र वा
वयचाले बठे
फुकीफाकी काढे र वा कोंडा
बैलले खावाले
परातम्हा टाके पिठी
मीठपानीम्हा ती भिंजे
वरथिन वल्ला कपडा नरम
कराले लोयाले
ढणाढणा पेटे चुल्हा हरबरानी
ती दाय
शिजे गुगुगुदू दाय मंग टाके
त्याम्हा गुय
पानी नितारीनुतारी घोटे
चिक्कन पुरन
रशी भात नि कुल्लाया चवदार
करे माय
सांज व्हताज दारम्हा खिल्लारी
बैलजोडी
सुपडाम्हा लये पोया ववायानी
ती तातडी
पानी पायवर टाके लाये
कपायले कुकु
घास खावाडे बैलले पाय पडे
घडीघडी..
मना कष्टाना तू धनी तुना
उपकार मोठा
दमीभागी येतसं नि तुमले
बठाले तो गोठा
कडबा चारा खाई खाई नही
बोलत जबान
गहूनं ते कुटार नि सदाकदा
ती गव्हानं
बैल सालदार करे घरदारनी
बरकत
आते उनात ट्रॅक्टर नही
जित्राब दिखत
नही भेटावं सोयरा देखा
बैलना सारखा
कधी इसरूज नका त्याना
उपकार बरकां..

– प्रा.सुमती पवार,
नाशिक मो.९७६३६०५६४२



## पावसा ये रे - वरूण राजाला विनंती

पाऊस नाही आला
शेत उभे सुकले ।।ध्रु।।
चारा नाही कोठे
गुरे व्याकूळ मोठे
डोळा दोन्ही धारे
हंबरती गुरे ।।१।।
पक्षी थकून गेले
पंख टाकून बसले
घरटे उजाडले कारे
झाड सुकले सारे ।।२।।
धरणी भेगाळली
आई जणू रडली
तहानलेली धरती
पाणी मागती ।।३।।
राजा ऐक गाऱ्हाणे
शेतकऱ्याचे उणे
पीक गेले वाया
आले रडाया।।४।।
नदी कोरडी पडली
विहीर तळ गाठली
पाखरांची तहान
भागवील कोण ।।५।।
मेघा धावून ये
धारा घेऊन ये
मोर नाचवाया ये
पाऊस घेऊन ये ।।६।।
गुरांना चारा दे
पक्ष्यांना दाणा दे
बाळांना पाणी दे
राजा दया आम्हा दे ।।७।।
एकदा बरसून जा
धरती हिरवी कर
अलंकाराने नटवता
सृष्टी सारी आता ।।८।।
इंदुमाय विनवते
प्रभाकर प्रार्थितो
पाऊस येऊनजा
देवा मेघराजा ।।९।।

– इंदुमाय– प्रभाकर
भामरे, धुळे.




डॉ.रोहन कुलकर्णी
MBBS, MD Medicine, IDCCM
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
धुळे मो.९५०३४२०५१२

# ताप, अंगदुखी आणि अंगावर काळी खपली? पावसाळ्यातील ‘स्क्रब टायफस’कडे दुर्लक्ष नको!

पावसाळ्यात ताप आला की आपल्या मनात सर्वप्रथम डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड किंवा साधा व्हायरल ताप येतो; पण याच काळात शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण भागातील नागरिक आणि गवत-झुडपांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांना होणारा स्क्रब टायफस हा आजारही आता महत्त्वाचा आरोग्यविषयक धोका ठरत आहे. सप्टेंबर २०२६ च्या सुरुवातीलाच देशातील काही भागांत त्याच्या रुग्णसंख्येत वाढ नोंदवली गेली आहे. आरोग्य अधिकाऱ्यांनी पाऊस, वाढलेली झाडी आणि चिगर माइट्सची वाढ यांचा या वाढीशी संबंध सांगितला आहे.

स्क्रब टायफस हा जीळशपींळर ीीीीीसरीीहळ नावाच्या जिवाणूसदृश सूक्ष्मजीवामुळे होणारा संसर्ग आहे. तो डासामुळे होत नाही. गवत, झुडपे आणि शेतांमध्ये आढळणाऱ्या अतिशय लहान संक्रमित लहळससशी ळीींश च्या चाव्यामुळे हा संसर्ग माणसात पोहोचतो. त्यामुळे शेतात काम करणारे शेतकरी व मजूर, जंगल किंवा झुडपांमध्ये जाणारे नागरिक, गवतावर बसणारे किंवा झोपणारे लोक आणि ग्रामीण भागात राहणाऱ्यांना त्याचा धोका तुलनेने अधिक असतो. पावसाळ्यात झाडाझुडपांची वाढ झाल्याने या माइट्ससाठी अनुकूल वातावरण निर्माण होते. अलीकडील आरोग्य सूचनेतही पूर्ण बाह्यांचे कपडे, लांब पँट व बंद पादत्राणे वापरण्याचा आणि गवतावर थेट बसणे टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

आजाराची सुरुवात अनेकदा अचानक ताप, थंडी वाजणे, तीव्र डोकेदुखी, अंगदुखी, अशक्तपणा आणि भूक कमी होण्याने होते. काही रुग्णांना पुरळ किंवा गाठीही जाणवू शकतात. मात्र या आजाराची एक वैशिष्ट्यपूर्ण खूण म्हणजे चावलेल्या जागी तयार



होणारी काळसर खपली-जिला ‘ऐलहरी’ म्हणतात. ती सिगारेटने चटका बसल्यासारखी दिसू शकते आणि अनेकदा वेदनारहित असल्यामुळे लक्षात येत नाही. बगल, कंबर, जांघेचा भाग किंवा त्वचेच्या घड्यांमध्ये ती लपलेली असू शकते. महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक रुग्णामध्ये शीलहरी दिसेलच असे नाही; त्यामुळे काळी खपली नाही म्हणजे स्क्रब टायफस नाही, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल.

वेळीच निदान झाल्यास स्क्रब टायफस प्रभावी उपचारांनी बरा होऊ शकतो; पण उपचाराला विलंब झाल्यास तो गंभीर स्वरूप धारण करू शकतो. फुफ्फुसांवर परिणाम होऊन श्वास घेण्यास त्रास, मेंदूचा संसर्ग, हृदयावर परिणाम, कावीळ, मूत्रपिंडाचे कार्य बिघडणे, रक्तदाब कमी होणे किंवा अनेक अवयव निकामी होण्यासारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. त्यामुळे तापासोबत श्वास लागणे, सतत उलट्या, खूप गुंगी किंवा गोंधळ, झटके, लघवी कमी होणे, रक्तदाब कमी होणे किंवा प्रकृती झपाट्याने बिघडणे ही धोक्याची चिन्हे समजून तातडीने रुग्णालयात जावे.

स्क्रब टायफसचे निदान फक्त तापावरून करता येत नाही. डॉक्टर रुग्ण कुठे राहतो, शेत किंवा झुडपांशी संपर्क आला आहे का, शरीरावर शीलहरी आहे का आणि इतर लक्षणे काय आहेत याचा विचार करतात. उइउ, यकृत व मूत्रपिंडाच्या तपासण्यांसह आवश्यकतेनुसार स्क्रब टायफससाठी खसच,खसत्रू एडखड- किंवा इतर विशिष्ट चाचण्या केल्या जाऊ शकतात. डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पायरोसिस आणि टायफॉईड यांची लक्षणे काही प्रमाणात सारखी असल्यामुळे योग्य वैद्यकीय तपासणी अत्यंत महत्त्वाची ठरते.

या आजाराबाबत दिलासादायक गोष्ट म्हणजे योग्य वेळी उपचार सुरू केल्यास परिणाम चांगला असतो. डॉक्टर रुग्णाचे वय, प्रकृती आणि आजाराची तीव्रता पाहून वेूलूलश्रळपश किंवा रळींहीूलळप सारखी योग्य रपींळलळींळली निवडू शकतात. स्वतःहून मेडिकलमधून रपींळलळींळल घेणे मात्र टाळावे. गंभीर रुग्णांना रुग्णालयात दाखल करून ऑक्सिजन, द्रवपदार्थ आणि आवश्यकतेनुसार अतिदक्षता उपचारांची गरज लागू शकते. ताप उतरवणारी गोळी घेतली म्हणजे आजार बरा झाला हा गैरसमज धोकादायक ठरू शकतो, कारण औषधामुळे ताप तात्पुरता कमी झाला तरी मूळ संसर्ग शरीरात वाढत राहू शकतो.

स्क्रब टायफस एका व्यक्तीला स्पर्श केल्याने किंवा त्याच्यासोबत जेवल्याने साधारणपणे पसरत नाही. त्यामुळे रुग्णाला वेगळे ठेवण्याची अनावश्यक भीती बाळगण्यापेक्षा संसर्ग करणाऱ्या माइटपासून स्वतःचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. शेतात जाताना पूर्ण बाह्यांचे कपडे, लांब पँट आणि बंद बूट वापरणे, गवत किंवा जमिनीवर थेट बसणे टाळणे, घराभोवतीचे गवत व झुडपे नियमित कापणे आणि शेतातून आल्यानंतर अंघोळ करून कपडे धुणे या साध्या सवयी उपयोगी ठरतात.

भारताच्या अनेक ग्रामीण आणि आदिवासी भागांसाठी हा आजार विशेष महत्त्वाचा आहे.

या पावसाळ्यात फक्त पाच गोष्टी लक्षात ठेवा- शेतात पूर्ण अंग झाकणारे कपडे घाला, गवतावर थेट बसू नका, घराभोवतीची झुडपे स्वच्छ ठेवा, अनेक दिवस ताप राहिल्यास स्वतः औषधे घेत बसू नका आणि शरीरावर काळी खपली दिसल्यास ती डॉक्टरांना नक्की दाखवा. स्क्रब टायफस हा घाबरण्याचा नव्हे तर वेळेत ओळखण्याचा आजार आहे. पावसाळ्यातील प्रत्येक ताप डेंग्यू किंवा मलेरिया असेलच असे नाही. विशेषतः ग्रामीण भागात ताप + तीव्र अंगदुखी + शेत किंवा झुडपांचा संपर्क ही जोड दिसल्यास स्क्रब टायफसची शक्यता लक्षात ठेवणे आणि वेळीच डॉक्टरांकडे जाणे

# राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

(पान ५ वरुन) यानंतर खाज्या नाईक यांनी ब्रिटीश पोस्ट ऑफीसदेखील लुटले. एवढेच नाही तर ब्रिटीशांच्या दळणवळणावर, संपर्कावर मोठा परिणाम व्हावा म्हणून टेलीग्राफच्या तारा तोडल्या. यामुळे ब्रिटीश सरकारचा जणू या भागातील दबदबा व अस्तित्वच संपुष्टात आल्यासारखे झाले होते. या खजान्यातून लुटलेल्या पैशातून त्यांनी आपल्या सेनेसाठी शस्त्रे खरेदी केलीत. एकदा सेंधवा घाटात चार लाखाचा खजिना लुटल्यामुळे तरुणांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढली

ब्रिटीश सरकारचा दबदबा सर्वत्र असतांना त्यांच्या सैन्याविरुध्द बंड पुकारण्याची ताकद त्यावेळी कोणामध्येही नव्हती. परंतु खाज्या नाईक यांनी हिम्मत दाखवित तरुणांना एकत्र केले. एवढेच नव्हेतर लुटलेला पैसा ते गरीबांमध्ये वाटत असत. गरीब लोकांवर अन्याय करणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्यांवर ते तुटून पडत. सावकार, व्यापारी यांच्याकडील लुटलेले खजिने दान करीत. अशा अनेक कारणामुळे खाज्या नाईक अल्पावधीत तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाले. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत अनेक तरुण ब्रिटीश सरकारविरुद्ध बंड पुकारू लागले होते. अल्पावधीत खान्देशातील ब्रिटीश सरकारच्या कारभाराविरुद्ध त्रस्त असलेल्या तरुणांचे नेतृत्व म्हणून खाज्या नाईक यांना जनमान्यता मिळाली.

# ट्रस्ट साठी लागू असलेल्या आयकर व जीएसटी कायद्याच्या तरतुदी

(पान ५ वरुन) स्वरूपात अस्तित्वात आहेत. या ट्रस्टच्या उत्पन्नाचा स्त्रोत हा मुख्यतः योगदान, देणग्या इत्यादींद्वारे असतो. त्या सामान्यतः ना-नफा आधारित संस्था आहेत. जे ट्रस्ट ३३२ मध्ये नोंदणीकृत असतात व ज्यांचा उपक्रम हा कोणताही व्यवसाय नसतो अशा ट्रस्टला जीएसटी मधून वगळण्यात आलेले आहे त्यामुळे अशा उपक्रमवर जीएसटी लागत नाही. परंतु जर ट्रस्टचा उपक्रम हा व्यवसाय स्वरूपात असेल किंवा नफा कमवणे असेल तर त्यासाठी जीएसटी लागू राहील.

ट्रस्टचे काम योग्य पद्धतीने चालवण्यासाठी विश्वस्तांनी नवीन प्राप्तिकर कायदा, २०२५ मधील महत्त्वाच्या तरतुदी समजून घेणे गरजेचे आहे. ट्रस्टची नोंदणी झाल्यानंतरही करसवलत मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व नियमांचे पालन करावे लागते. उत्पन्नाचा योग्य वापर, देणग्यांची नोंद, निधीची योग्य गुंतवणूक, लेखापरीक्षण आणि प्राप्तिकर विवरणपत्र वेळेत दाखल करणे आवश्यक आहे. नवीन कायद्यातील कलम ३३२ आणि३५४ यांसारख्या महत्त्वाच्या तरतुदींची माहिती विश्वस्तांना असणे आवश्यक आहे. नियमांचे वेळेवर पालन केल्यास ट्रस्टला उपलब्ध करसवलतींचा लाभ घेता येतो आणि अनावश्यक करभार टाळता येतो. त्यामुळे नवीन प्राप्तिकर कायद्याची योग्य माहिती ठेवणे आणि त्यानुसार सर्व नियमांचे पालन करणे ही प्रत्येक विश्वस्ताची महत्त्वाची जबाबदारी आहे.

# १३ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय आदिवासी अधिकार दिवस प्रत्येक आदिवासी पर्यंत पोहचण्याची आवश्यकता

(पान ५ वरुन) जमिनी, भू भाग आणि संसाधने यावर परिणाम होत असेल तर प्रकल्पाला मंजुरी देण्यापुर्वी आदिवासी लोकांची स्वतंत्र व सूचित सहमती प्राप्त करण्यासाठी त्याच्या प्रातिनिधिक संस्थाशी राज्य विचार विनिमय व सहकार्य करेल. अनुछेद ३२(२)

हे आणि असे अनेक आदिवासींचे संवैधानिक अधिकार व तत्सम तरतुदीं युनोने या निमित्ताने बहाल केले आहे त्याचे काटेकोर पालन करणे हे सरकारचे दायित्व आहे ही जाणिव सरकारला करुन देण्यासाठी विविध आदिवासी संस्था -संघटना तसेच आदिवासी समन्वय मंच गेल्या अनेक वर्षापासुन हा दिवस साजरा करून विचार विमर्श करीत आहे. रणनिती आखत आहे. यंदाचा आंतरराष्ट्रीय आदिवासी अधिकार दिनचा कार्यक्रम १२ व १३ सप्टेंबर २०२६ रोजी झारखंड राज्यातील रांचीच्या हरीवंश ताना भगत इंडोर स्टेडियन, खेलगांव येथे संपन्न होत आहे. आदिवासी समन्वय मंच, भारत, द्वारा हा कार्यक्रम आयोजित केला आहे. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात देशभरातील आदिवासी एकत्र येऊन विचारमंथन करणार आहे. विविध परीसंवाद, गट चर्चा, खुला सत्र या सारख्या कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे. आपली ही जागरूक आदिवासी आणि संघटना म्हणून जबाबदारी वाढलेली आहे ती आपण पार पाडूया.आपली ऊर्जा समाजहिताचे उपक्रम निरंतर सुरु ठेवण्यासाठी कामी आणूया. आणि येणाऱ्या काळात विश्व आदिवासी अधिकार दिवस दरेक आदिवासी बांधवापर्यंत पोहचविण्यासाठी भूमिका घेऊया.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील गणेशोत्सव

(पान ३ वरुन) जवळ-जवळ ६ फुटाच्या गणेशाची मूर्ती या किल्ल्यावर स्थानापन्न करण्यात आलेली आहे. उजव्या सोंडेची चतुर्भुज गणपतीची ही मूर्ती असून मागील हातामध्ये अंकुश आणि परशू आहेत. पुढच्या हातात मोदक आहे. मूर्तीच्या पोटावर नागाचे वेटोळे स्पष्ट दिसत आहे. भोरगिरी किल्ल्याच्या पायथ्याला महादेव मंदिराच्या आवारात अनोखी अशी गणेशाची मूर्ती आहे. या मूर्तीला गरूडासारखे पंख दाखविलेले आहेत. किल्ले रसाळगडावर झोलाई देवीच्या मंदिराच्या शेजारीच छोटेखाणी गणेशाचे मंदिर आहे.या मंदिरातील गणेशाची मूर्ती म्हणजे कलाअविष्कारच आहे. किल्ले प्रबळगडाच्या माथ्यावर गणपतीचे मंदिर आहे. मंदिरातील गणपतीची मूर्ती अतिशय देखणी आखीव व रेखीव आहे. यशवंतगडावरती श्री. गणेश मंदिर उत्कृष्ठ असे आहे. किल्ले वैराटगडावर श्री. गणेश मंदिर असुन मूर्ती देखणी आहे. वसंतगडावर देखणे असे श्री. गणेशाचे मंदिर आहे.

कुलाबा किल्ल्यावर तलावाच्या पश्चिमेस गणेश मंदिर आहे. या मंदिराला सिध्दी विनायक मंदिर असेही म्हणतात. मंदिर १९ मीटर लांब ६ मीटर रूंद व १३ मीटर उंच आहे. मंदिर दगडी चि-यात बांधले असून आतील गाभारा अष्टकोनी आहे.गाभा-याचे प्रवेशद्वार अतिशय सुंदर आहे.प्रवेशव्दारात खाली सुंदर कीर्तिमुख व दोन्ही गाभा-याच्या प्रवेशव्दाराचे दोन्ही बाजूचे व्दारपक्ष एकात एक गुंफलेल्या पटट्याचे पिरॅमिडच्या आकाराचे आहेत. मंदिराच्या मध्यभागी गणपतीची मुर्ती आहे. मंदिराचे सभागृह अष्टकोनी आहे. संगमरवरी गणपतीची मूर्ती ६०२ सें. मी. उंच आहे. ही मूर्ती उजव्या सोंडेची सुबक आहे. या किल्ल्यावर गोडया पाण्याच्या पुष्करणी समोर सुंदर असे गणपतीचे मंदिर आहे. त्यात पाच मूर्ती आहेत. त्याला गणेशपंचायतन असे म्हणतात. इ.स. १६७५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी फोंडा किल्ला जिंकून घेतल्यानंतर किल्ल्याच्या मुख्य दरवाजावर काळया दगडाची सुंदर गणेशपट्टी तयार करवून बसविली आहे. ठाणे जिल्हयातील अर्नाळा किल्ल्यावर सुंदर असे श्री. गणेश मंदिर आहे. वैराटगड, दुर्गाडी, प्रबळगड, सागरगड, जयगड, महिमतगड, यशवंतगड, गंधर्वगड, पारगड, पन्हाळागड, अलंगड, कलागड, पाबरगड, रवळा, कलानिधीगड आदि. किल्ल्यांवरती विविध रूपातील श्री. गणेश मूर्ती दिमाखात उभ्या आहेत.आजही आपणास महाराष्ट्रातील प्रत्येक किल्यावर गणेश पट्टी पाहावयास मिळते.तसेच किल्ल्याच्या प्रवेशव्दारावर गणपतीची छोटी मूर्ती हमखास विराजमान झालेली असते. छत्रपतींच्या प्रत्येक किल्ल्यावर गणपतीचे मंदिर निश्चित पहावयास मिळते.गड-किल्ल्यावरील गणपतीची ही मंदिरे आजही जागती आहेत. त्या-त्या मंदिराच्या आजुबाजुचे ग्रामस्थ व लोक गणेशोत्सवाला गडावरील देवतेच्या पूजेसाठी जातात. काही ग्रामस्थ व भक्त कायमच देवदेवतांच्या पूजेसाठी गडावर जाताना दिसतात. गड-किल्ल्यावरील ही गणपतीची मंदिरे म्हणजे आपली शक्तीपीठे आहेत. त्यांच्या पुढे अदराने नतमस्तक होऊन यशाचा मानदंड प्रत्येकाने जपला पाहिजे. संपूर्ण भारतात गणपती उत्सव एकता आणि उत्सवाचे प्रतीक बनला आहे. आज हा उत्सव सामाजिक ऐक्य व पर्यावरण संरक्षणाने साजरा केला जातो. तो सामाजिक आणि सांस्कृतिक सौहार्दाचे द्योतक असुन एक आंतरराष्ट्रीय उत्सव बनला आहे.




**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी एखादी नवीन संधी घेऊन येणार आहे. नवीन भौतिक आनंद, सुख सोयी अनुभवता येतील. अडकलेले काम सुटेल. कौटुंबिक सुख समृद्धी राहील. एकूण परिस्थिती सुधारेल. तब्येत चांगली होईल. घर, गाडी, नोकरी, व्यवसाय, जमिनीचे काम यासंदर्भात प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही सावकाश आणि चिकाटीने काम करण्याची गरज आहे. कामाच्या ठिकाणी एखादी नवीन योजना मांडा. नवीन सुरुवात करायची असेल तर करा. काम होण्याची शक्यता आहे पण ते पूर्ण होण्यासाठी संयम ठेवा!

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी संभ्रम निर्माण करणारा वाटू शकतो. अनेकविध विचारांनी मनावर परिणाम होऊ शकतो. निर्णय घेणं अवघड वाटू शकतं. तुम्ही ठरवलेल्या कामात किंवा तुम्ही आखलेल्या नियोजनात फार गती येणार नाही. एक प्रकारची स्तब्धता येऊ शकते. गोष्टी हव्या तशा पुढे सरकणार नाहीत. अकारण विलंब होऊ शकतो. या आठवड्यात तुम्ही शांत बसून, तोलून मापून विचार करून पुढे जाण्याची गरज आहे. निर्णय घेताना बुद्धीने, सारासार विचार करून घ्या. ध्यान, उपासना करा.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी एकाच वेळी खूप पर्याय घेऊन येणार आहे. निरनिराळ्या गोष्टींमुळे निर्णय घ्यायला अवघड जाईल. मल्टी टास्किंग करावं लागेल. पण यांपैकी कोणतीही गोष्ट हवी तशी पुढे सरकणार नाही. एकूण थोडी तारांबळ उडण्याची शक्यता आहे. हवे ते साध्य होण्यासाठी अजून वेळ लागेल. या आठवड्यात तुम्ही बऱ्याच गोष्टींमधून एक दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. खूप काही करायला जाऊ नका, फसवणूक संभवते. वरवर आकर्षक वाटणाऱ्या कुठल्याही गोष्टीला भुलू नका. स्वप्नरंजन करत बसू नका!

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी आर्थिक मुबलकता घेऊन येत आहे. तुम्ही वस्तू, पैसे, लोक, कौशल्य यांनी युक्त असाल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाल. घराबाबत किंवा जमिनीबाबत चांगली घटना घडेल. कौटुंबिक आनंद राहील. या आठवड्यात तुम्हाला तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आर्थिक नियोजन नीट करा. कुठे आर्थिक गुंतवणूक करायची असेल तर करू शकता. लोकांना मदत करा. सगळ्यांचा सांभाळ करा. व्यावहारिक वागा, पण तुटक वागू नका. दानधर्म करा. गृहलक्ष्मीला प्रसन्न ठेवा!

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी थोडा विरंगुळा मिळण्याचा असणार आहे. तुम्ही पूर्वी श्रम केले आहेत, आता या आठवड्यात तुम्हाला त्याचे चांगले परिणाम बघायला मिळतील. तुम्ही आत्मपरीक्षण करू शकाल आणि काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करू शकता. तुम्ही भौतिक सुखात आरामात असाल. या आठवड्यात तुम्ही काळजी सोडून आनंद घेण्याची गरज आहे. हा वेळ स्वतः मधे सुधारणा करण्यासाठी वापरा. जरी तुमच्याकडे चांगली संपन्नता असली तरी वस्तूंचा अतिरेक वापर करू नका. गरजेपुरताच वापर करा. कसलाही दिखावेपणा करू नका!

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी थोडा कठीण असणार आहे. तुम्ही अशा परिस्थितीत अडकाल ज्यात तुम्हाला तुमच्या जागेवर पाय घट्ट रोवून उभं रहावं लागेल. काही लोक, काही स्पर्धक तुम्हाला तुमच्या जागेवरून खाली आणण्याचा प्रयत्न करतील. पण तुम्ही मोठ्या आत्मविश्वासाने त्यांना सामोरे जाऊ शकाल. या आठवड्यात तुम्ही येणाऱ्या परिस्थितीला धीराने सामोरे जाण्याची, तुमचं सर्वोत्तम देण्याची गरज आहे. काळजीपूर्वक पुढचे पाऊल टाका. धीट व्हा, घाबरण्याची गरज नाही. स्वतःच स्वतःसाठी उभे रहा, दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका.

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी उत्साहाचा आणि आनंदाचा आहे. एखादं काम पूर्णत्वास जाऊ शकते. तुम्हाला अपेक्षित यश मिळण्याची शक्यता आहे. ज्या मार्गावर आहात तिथे खंबीरपणे पुढे जाऊ शकाल. अडथळे दूर होतील, त्यांना पार करण्याची

## साप्ताहिक राशी भविष्य १३ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर




शक्ती तुमच्याकडे असेल. या आठवड्यात तुम्हाला तुमचा आवाज लोकांपर्यंत पोचण्याची गरज आहे. बुजरेपणा झटकून पुढे या. परिस्थितीशी दोन हात करा. आत्मविश्वास ठेवा फक्त त्याचा अतिरेक नको! गरज पडेल तसे पुढे होऊन नेतृत्व करा. बदल घडण्याची वाट बघू नका, तो स्वतः घडवून आणण्यासाठी प्रयत्न करा!

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी सोबतीने पुढे वाढण्याचा असणार आहे. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांचे चांगले सहकार्य मिळेल. घरामध्ये जोडीदाराकडून अपेक्षित किंवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात साहचर्य मिळेल. दुरावलेली नाती पुन्हा जवळ येतील. प्रेम आणि नात्यांच्या बाबतीत आनंददायी घटना घडेल. विवाहास अनुकलता मिळेल. साथ संगतीमुळे अवघड मार्ग सोपा होईल! या आठवड्यात तुम्हाला एकटे राहण्यापेक्षा इतरांच्या सोबत राहणे जास्त फायद्याचे ठरणार आहे. एखाद्या कलेतून आनंद मिळवा. बुध्दीचा तर्क बाजूला ठेवून भावना समजून घ्या.

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी भावभावनांचं प्राधान्य घेऊन येत आहे. तुम्ही आनंदी राहणार आहात. तुम्हाला तुमच्या मनाचा कौल घेऊन, बुध्दी आणि इतर व्यवहारिक गोष्टींपेक्षा मन काय सांगत आहे त्याप्रमाणे वागून चांगला अनुभव येईल. कठीण परिस्थितीसुद्धा सकारात्मकतेने हा-ताळू शकाल. कला क्षेत्रात चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही भावनांमध्ये वाहवत जात नाही आहात ना, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कोणामध्येही भावनिक दृष्ट्या अडकू नका. तुम्हाला आवडणारा एखादा छंद किंवा एखादी कला आत्मसात करा, त्यात वेळ घालवा.

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक अवघड वळण घेऊन येत आहे. एखादे ध्येय हुकले जाऊ शकते. तुम्ही करत असलेले कष्ट या काळात कमी प्रमाणात फलित होतील म्हणून जास्त अपेक्षा न ठेवलेल्या चांगल्या. वास्तविक परिस्थिती पेक्षा तुमची मानसिक स्थिती कशी आहे यावर तुमचा हा काळ अवलंबून राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्या मनाला येईल तसे वागायला जाऊ नका कारण त्यात तुमची चुकण्याची शक्यता जास्त आहे. कोणत्याही प्रसंगात कोणाचा तरी आधार घेऊन, सल्ला घेऊन पुढे चाला. तुमच्याकडे जे नाही त्यापेक्षा जे आहे त्याबद्दल सकारात्मक विचार करा!

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं ला-गेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयत्न करा. गरिबांना मदत करा. आरोग्य सांभाळा!

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक आणि आर्थिक जडणघडणीचा असणार आहे. इतरांच्या मदतीने निश्चितच एक टप्पा गाठला जाईल. प्रयत्नांना यश येईल. तुम्ही केलेल्या कामाला ओळख मिळेल. घर, जमीन, गाडी, नोकरी, व्यवसाय किंवा इतर व्यावहारिक गोष्टींमध्ये चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही कामामध्ये परिपूर्णता आणायचा प्रयत्न करा. इतरांच्या मदतीने, सोबतीने पुढे चाला. दिलेल्या सूचना अंमलात आणा. इतरांना तुम्ही देखील मदत करा. एकट्या पेक्षा मिळून मिसळून काम करा. एकीचे बळ लक्षात ठेवा!

# काटवानला पंधरा दिवस पाणी, मग चिकसे-देगावला कधी?

# लाटीपाडा धरणाचे पाणी शेतीसाठी द्या- शेतकऱ्यांची मागणी

**पिंपळनेर, दि.१२ (प्रतिनिधी)- पावसाने दीड महिन्यापासून दडी मारल्याने साक्री तालुक्यातील खरीप पिके पाण्याअभावी संकटात सापडली आहेत.दरम्यान, ऑगस्टपासून काटवान भागातील पिकांसाठी उजव्या कालव्याद्वारे लाटीपाडा धरणाचे पाणी सोडण्यात आले आहे.मात्र काटवान भागासाठी जाणारा कालवा चिकसे,देगाव व गव्हाणीपाडा शिवारातून जात असतानाही या गावांतील शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. काटवान भागाला पंधरा दिवस पाणी दिल्यानंतर चिकसे, देगाव व गव्हाणीपाडा परिसरातील पिकांसाठी किमान सात ते आठ दिवस सांडव्याद्वारे वाहून जाणारे पाणी उपलब्ध करून द्यावे,अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.**



लाटीपाडा धरणातून उजव्या कालव्याद्वारे काटवान भागातील शेतीसाठी पाणी सोडण्यात आले आहे.हे पाणी चिकसे,देगाव व गव्हाणीपाडा शिवारातून पुढे जाते.मात्र संबंधित गावांतील शेतकऱ्यांना या पाण्याचा शेतीसाठी उपयोग करता येत नाही.त्यामुळे धरणातून सांडव्याद्वारे नदीपात्रात वाहून जाणाऱ्या पाण्याचा काही काळ या परिसरातील पिकांसाठी विनियोग करण्यात यावा, अशी मागणी पुढे आली आहे.

**आवक घटली, सांडव्याचे पाणीही कमी**

दरम्यान, गेल्या दीड महिन्यापासून पाऊस नसल्याने धरणात होणारी पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात घटली आहे. सध्या सांडव्याद्वारे बाहेर पडणारे पाणीही अत्यल्प आहे. आगामी काळात सांडव्यावरून वाहून जाणारे पाणी पूर्णपणे बंद झाले, तर कालव्याद्वारे शेतीसाठी सुरू असलेला पाणीपुरवठाही बंद होण्याची शक्यता आहे.त्यामुळे उपलब्ध असलेल्या पाण्याचा तातडीने योग्य विनियोग करून पिकांना संजीवनी देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**सध्या सांडव्यावरून केवळ दोन सेंटीमीटर पाणी**

याबाबत कालवा निरीक्षक दर्शन कापडणीस यांनी सांगितले की, पिंपळनेर येथील लाटीपाडा धरणाच्या सांडव्याद्वारे सध्या केवळ सुमारे दोन सेंटीमीटर पाणी बाहेर पडत आहे. पाऊस कमी झाल्यामुळे धरणाची आवक घटली आहे. मात्र धरणाच्या वरील भागातील ओढे,ओहोळ व नाल्यांमधून थोड्याफार प्रमाणात पाणी धरणात येत आहे.पाण्यावर निर्माण होणाऱ्या छोट्या लाटांमुळे सांडव्याद्वारे काही प्रमाणात पाणी बाहेर पडत असल्याचे त्यांनी सांगितले.

चिकसे,देगाव व गव्हाणीपाडा परिसरातील पिकांची सध्याची परिस्थिती लक्षात घेता लाटीपाडा धरणाच्या सांडव्याद्वारे वाहून जाणारे उपलब्ध पाणी किमान सात ते आठ दिवस या भागातील शेतीसाठी सोडण्यात यावे. याबाबत पाटबंधारे विभागाच्या शाखाधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांनी निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. यावेळी पाटबंधारे विभागाचे पिंपळनेर शाखा अधिकारी सचिन दुसाने यांना निवेदन देण्यात आले.यावेळी चिकसेचे माजी उपसरपंच संजय जगताप, पं.स.चे माजी सदस्य प्रकाश अकलाडे,शेतकरी प्रकाश कापसे, नामदेव खैरनार, हिम्मत गायकवाड, शिवाजी खैरनार, दादाजी ठाकरे, विश्वनाथ वाघ, विजय चौधरी गिरीधर एखंडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

पावसाअभावी मक्याच्या पिकाला आवश्यक पाणी मिळत नसल्याने वाढ खुंटली आहे. सर्वसाधारणपणे सहा ते सात फूट उंचीपर्यंत वाढणारे मक्याचे ताटवे सध्या तीन ते चार फुटांपर्यंतच वाढले आहेत.त्यातच पाण्याच्या ताणामुळे वेळेपूर्वीच कणसे निसवू लागल्याने दाणे अपक्व राहण्याची शक्यता आहे.परिणामी मक्याच्या उत्पादनात मोठी घट होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची भीती आहे. म्हणून पाटबंधारे प्रशासनाने पिकांना वाचण्यासाठी उजव्या कालव्यातून पाणी उपलब्ध करून द्यावे. अशी प्रतिक्रिया संजय जगताप, शेतकरी,चिकसे यांनी दिली.

# हस्ती बँकेकडून पाच टक्के अतिरिक्त डिव्हीडंट रक्कम खात्यात जमा; सभासदांमध्ये समाधान

दोंडाईचा, दि.१२ : उत्तर महाराष्ट्रातील नावलौकिकप्राप्त दि हस्ती को-ऑप. बँक लि. (मल्टीस्टेट बँक) ने आपल्या गौरवशाली वाटचालीतील **५५ वर्षांचा प्रखर प्रवास पूर्ण केला असून, या ऐतिहासिक पर्वानिमित्त सभासदांना विशेष आनंदाची भेट दिली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी बँकेने यापूर्वी जाहीर केलेला १५% नियमित डिव्हीडंट वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली सभेतील प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर तत्काळ सभासदांच्या खात्यात डिव्हीडंट जमा केला होता.**

वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान बँकेचे चेअरमन कैलास जैन यांनी बँकेस ५५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सभासदांना अतिरिक्त ५% डिव्हीडंट देण्याची घोषणा केली होती. यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करण्यात आला होता. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त ५% डिव्हीडंटची रक्कम ५ सप्टेंबर २०२६ रोजी सभासदांच्या खात्यात जमा करण्यात आली. त्यामुळे सभासदांना नियमित १५% डिव्हीडंटसह एकूण २०% डिव्हीडंटचा लाभ मिळाला आहे.

हस्ती बँकेचे आधारस्तंभ स्व. कांतिलालजी जैन यांनी बँकेच्या प्रारंभिक काळापासूनच सभासदांच्या आर्थिक हिताला केंद्रस्थानी ठेवून बँकेच्या प्रगतीचा लाभ सभासदांपर्यंत पोहोचावा, या दूरदृष्टीने डिव्हीडंट देण्याची परंपरा सुरू केली. सभासद हा बँकेच्या प्रगतीचा खरा भागीदार आहे या विचारातून सुरू झालेली ही गौरवशाली परंपरा आजही अखंडितपणे सुरू आहे. स्व. कांतिलालजी जैन यांनी रुजविलेल्या या विश्वासाच्या परंपरेचा वारसा पुढे नेत विद्यमान चेअरमन कैलास जैन यांच्या नेतृत्वाखाली सभासदांच्या आर्थिक हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे.



विशेष अभिमानाची बाब म्हणजे, हस्ती बँकेने गेल्या ३३ वर्षांपासून सातत्याने १५% डिव्हीडंट देण्याची परंपरा जपली आहे. बँकेच्या आर्थिक सक्षमता, पारदर्शक कारभार, सातत्यपूर्ण प्रगती आणि सभासदांच्या दृढ विश्वासाचे हे द्योतक मानले जात आहे. ५५ वर्षांच्या या गौरवशाली वाटचालीत सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे मार्गदर्शन तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांचा मोलाचा वाटा आहे.

५५ वर्षे ही केवळ बँकेच्या वाटचालीची वर्षे नसून, सभासदांनी बँकेवर ठेवलेल्या विश्वासाची साक्ष आहेत. सभासदांच्या आर्थिक हिताला प्राधान्य देत बँकेच्या प्रगतीचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याची परंपरा यापुढेही कायम ठेवण्यात येईल, असे प्रतिपादन बँकेचे चेअरमन कैलास जैन यांनी केले.

अतिरिक्त ५% डिव्हीडंट सभासदांच्या खात्यात जमा झाल्याने सभासदांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ५५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीतील हा क्षण संपूर्ण सभासद व हस्ती परिवारासाठी अभिमानाचा ठरला आहे.

# छ.राजर्षी शाहू महाराज नाट्यगृहाची दुरावस्था अल्पदरात कलाकारांसाठी उपलब्ध करून द्या- चत्रे

**धुळे, दि.१२- शहरात राजर्षी शाहू महाराज नाट्य गृहाची अत्यंत सुरेख आणि सुंदर वास्तू उभारण्यात आली होती. मात्र, सध्या या नाट्यगृहाची कमालीची दुरवस्था झाली असून अत्यंत अवाजवी व न परवडणाऱ्या भाड्या मुळे स्थानिक कलाकारांना या नाट्यगृहाचा काहीच उपयोग झालेला नाही. परिणामी धुळ्यातील सांस्कृतिक चळवळीची मोठी अधोगती होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कलावंतांना अल्पदरात उपलब्ध करून देण्याची मागणी जिल्हा कलावंत विकास मंचचे अध्यक्ष सुरेश चत्रे यांनी केली आहे.**

महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यात अत्यंत अल्प दरात कलाकारांना आपली कला सादर करता यावी, तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ सर्व सामान्य नागरिकांना व कलावंतांना मिळावे या उद्देशाने सांस्कृतिक कला भवनांची निर्मिती केली. शहर आणि जिल्ह्याला सांस्कृतिक चळवळीचा उज्वल आणि समृद्ध वारसा लाभलेला आहे. चित्रपट, नाटक व संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंतांच्या वास्तव्याने आणि सादरीकरणाने धुळ्याची भूमी पावन झाली आहे. गान कोकिळा भारतरत्न स्व. लता मंगेशकर यांच्या समृद्ध वारसा मुळे धुळे जिल्ह्याला देशभरात एक वेगळेच सांस्कृतिक वलय प्राप्त झाले आहे. या शिवाय धुळे जिल्ह्यात वारकरी संप्रदाय, शाहिरी, भजनी मंडळे व आर्केस्ट्रा कलावंतांची मोठी परंपरा असून हजारो कलाकार आपली कला निरंतर सादर करून आपले उदरनिर्वाह करीत आहेत.

**नाट्यगृहात सुविधांचा अभाव**

सध्या शाहू महाराज नाट्यगृहातील वातानुकूलित (एसी) यंत्रणा, पंखे, ध्वनिक्षेपक (स्पीकर) यंत्रणा सर्व बंद अवस्थेत असून प्रेक्षकांच्या खुर्च्या, प्रकाश व्यवस्था आणि पडदे पूर्णपणे खराब झाले आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे या ठिकाणी स्वतंत्र विजेची कायम स्वरूपी व्यवस्था नसल्यामुळे आयोजकांना महागडे जनरेटर लावावे लागतात. तसेच पंखे व एसी बंद असल्याने बाहेरून कुलर भाड्याने आणावे लागत आहेत. यामुळे कार्यक्रमांचा खर्च आवाक्या बाहेर जात आहे.

**संवादासाठी व्यासपीठ गरजेचे**

अलीकडच्या काळात सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मानवी प्रत्यक्ष संवाद कमालीचा कमी झाला आहे. समाजात प्रगती होत असली तरी काही गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, संवादातूनच समाजोपयोगी वातावरण निर्माण होऊ शकते. यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे धुळे महानगर पालिकेने या गंभीर विषयाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

या साठी धुळे महानगर पालिकेने छत्रपती राजर्षी शाहू महाराज नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी तातडीने स्वतंत्र तज्ञ पथकाची नेमणूक करावी. इमारतीची डागडुजी, एसी, साऊंड व विजेची व्यवस्था पूर्ववत करून इतर जिल्ह्या प्रमाणे हे नाट्यगृह अत्यंत कमी व परवडणाऱ्या दरात स्थानिक कलाकारांना उपलब्ध करून द्यावे अशी आग्रही मागणी सर्व कलावंता तर्फे धुळे जिल्हा कलावंत विकास मंचचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते सुरेश चत्रे यांनी केली आहे.

# हैद्राबाद व सातारा गॅझेटच्या अंमलबजावणीसह जरांगे पाटलांच्या मागण्या मान्य करा- मराठा समाज



**धुळे, दि.११- हैद्राबाद गॅझेट व सातारा गॅझेटच्या अंमलबजावणीसह मनोज जरांगे पाटलांच्या मागण्या मान्य कराव्यात. या मागणीचे निवेदन सकल मराठा समाजाच्या वतीने ना.उदय सामंत यांना देण्यात आले.**

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, मराठा आरक्षणाबाबत आपणास पूर्ण कल्पना असूनही मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करून ही प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी सरकारकडून टाळाटाळ होत असल्याने जरांगे पाटील यांचे उपोषण आज १४ दिवसापासून सुरू आहे. आपणच त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून मागण्या मान्य करून देखील सरकारकडून अंमलबजावणी होत नाही. धुळे जिल्ह्यातील कोणत्याही ग्रामपंचायत किंवा कोणत्याही सरकारी कार्यालयात कोणतीही यादी आज पर्यंत लागली नाही. यावरून लक्षात येते की, सरकारने जरांगे पाटील व संपूर्ण मराठा समाजाची फसवणूक व दिशाभूल केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे पाटलांच्या सर्व मागण्यांची पूर्तता करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात यावी.

निवेदन देतांना सकल मराठा समाज, धुळे जिल्हा भानुदास बगदे, विनोद जगताप, भैया शिंदे, मनोज ढवळे, निंबा मराठे, हेमंत भडक, भानुदास चौधरी, सुरेश पवार, प्रफुल्ल माने, रवींद्र नागणे, श्याम रायगुडे, ॲड. दिनेश काळे, बाळासाहेब ठोंबरे, उल्हास पाटील, राकेश भोसले, अशोक बाबर, अरुण मराठे, अशोक चव्हाण, अर्जुन पाटील, आबा कदम, किशोर वाघ, गोविंद वाघ, वामन मोहिते, मुकुंद शिंदे, अमर फरताडे, श्याम निरगुडे, मनोज रुईकर, यांच्यासह मोठ्या संख्येने मराठा समाज उपस्थित होता.

**झाडे लावा झाले जगवा**



# गणेशोत्सव निमित्त पांझरा पात्रात मनपाने राबवली स्वच्छता मोहीम

**धुळे, दि.१२- श्री गणेश उत्सवच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिके मार्फत शहरातील पांझरा नदी किनारी स्वच्छता मोहीम संपन्न करण्यात आली.**

यामध्ये शहरातील नागरिकांना गणेश मूर्ती संकलन व मांगल्यदान अशा ११ ठिकाणी स्वच्छता मोहीम घेण्यात आली. यामध्ये कुमार नगर घाट, झुलता पूल, जॉगिंग ट्रॅक, अग्रवाल भवन, दाता सरकार, नकाने रोड पूल, सिद्धेश्वर हॉस्पिटल जवळ, जयहिंद जलतरण तलाव, स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा जवळ, एकविरा मंदिरजवळ त्याचप्रमाणे हत्तीडोह या ठिकाणी स्वच्छता मोहीम घेण्यात आली. यावेळी आयुक्त नितीन कापडणीस यांनी सर्व ठिकाणाची पाहणी करून स्वच्छता मोहीम घेण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने सर्व ठिकाणी स्वच्छता मोहीम हाती घेऊन काटेरी गवत झुडपे तोडण्यात आले यामध्ये साधारण २ ते ३ कचरा संकलन करण्यात आला. दाता सरकार या ठिकाणी उपायुक्त हेमंत निकम यांनी पाहणी केली. मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे लक्ष्मण पाटील यांच्या अधिपत्याखालील सर्व स्वच्छता निरीक्षक मुकादम व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.


Stree Shikshan Sanstha's

**S. M. BIYANI LAW COLLEGE, DHULE.**

C/o. Kamalabai Girls High School, Sakri Road, Dhule. Mob.No. 9890069102

**- WANTED -**

Applications are invited for the post of Principal, Librarian and Assistant Professor, from eligible candidates, for the following subject/s:

| Sr. No. | Designation & Qualification | No. of Post/s | Nature of Post (Granted / Non Granted/ | Category (SC/ST/VJNT/ OBC/SBC/OPEN SEBC/EWS) |
|---|---|---|---|---|
| 1. | **Principal** Subject - Law LL.M Net Set Ph.D. (15 Years Experince of teaching in law college) | 01 | Full Time Permanent Non - Granted | ISOLATED |
| 2. | **Librarian Sub.- Library Science** M.Lib. NET / SLET / SET / Ph.D. in the same stream | 01 | Full Time Permanent Non - Granted | ISOLATED |
| 3. | **Assistant Professor Subject - Law** LL.M NET / SET / Ph.D | 04 | Full Time Permanent Non - Granted | VJ-A 1/ OBC-1/ SEBC-1/ OPEN-1/ |

Eligibility and Qualification details are available on **KBCNMU** University website www.nmu.ac.in Eligible condidates should submit their Applications within 15 days from the date of publication of this advertisement at the above college address.

Secretary President


# गौतमेश्वर महादेव मंदिरात पूजन

शहादा,दि.१०(प्रतिनिधी)- दक्षिण काशी प्रकाशा येथील गौतमेश्वर महादेव मंदिर परिसरात श्रावणमासाच्या सांगतेनिमित्त ५१ मातीपासून तयार केलेल्या शिवलिंगांची २०१ महिलांनी विधिवत पूजा केली. श्रावणमासाच्या सांगतेनिमित्त आयोजित या धार्मिक उपक्रमाला महिला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सिंहस्थ पर्वणीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सोहळ्यात सिंहस्थ पर्वणीचे मानकरी दुर्गेश उद्धव पाटील हे मंदिराच्या गाभाऱ्यात पूजेला बसले होते. तर मुख्य यजमान म्हणून गंगोत्री फाऊंडेशनच्या अध्यक्षा प्रीती अभिजीत पाटील यांच्यासह २०१ महिला मंदिर परिसरात पूजेत सहभागी झाल्या होत्या. शहादा येथील भक्ती मार्ग सेवा समितीच्यावतीने रुद्राभिषेक करण्यात आला. महिलांनी मातीपासून तयार केलेल्या ५१ शिवलिंगांची पूजा-अर्चना केली. रुद्राभिषेकानंतर गौतमेश्वर महादेवाची विधिवत महाआरती करण्यात आली. उपस्थित भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी प्रल्हाद पाटील, पंढरीनाथ पाटील, हरी पाटील, दिलीप पाटील, दिलीप चौधरी, विजय पाटील, एस.आर. पाटील, हिरजी पाटील यांच्यासह प्रकाशा येथील ग्रामस्थ व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. गौतमेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट, भक्ती मार्ग सेवा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

**७/१२ उताराप्रमाणे : स. नं. ४६६/१/अ/२/अ पैकी प्लॉट नं. १५ चे एकूण क्षेत्र १६७.५० चौ. मी. यापैकी पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र ८३.७५ चौ. मी. बखळ प्लॉट हे हमीद कमरोद्दीन खाटीक यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे**

मिळकतीचे मालक हमीद कमरोद्दीन खाटीक, रा.अविष्कार कॉलनी, ४० गांव रोड, धुळे तर्फे दस्त सादरीकरण व नोंदणीकामाचे ज. मु. म्हणून नेहाल शेख हकीमोद्दीन खाटीक रा. २७, चित्तरंजन हौ. सोसा. मार्केट यार्ड, धुळे यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दि. १२/०९/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**

पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे मो.९८८१९२९४२४ (नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर ता. जि. धुळे येथील सव्हें नं. ६९/१ पैकी प्लॉट नं. २४ यांस वि. सि. स . नं. ५६२१ चे क्षेत्र ३८२ चौ. मी. सत्ता प्रकार क यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र २५९.३७ चौ. मी. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **१) किशोर पुरुषोत्तम पाटील रा. निमखेडी शिवार, जळगांव, २) छाया जितेंद्र शिंदे रा सदाशिव नगर, देवपूर, धुळे, ३) नंदा वसंत शिंदे रा. तिरुपती नगर, देवपूर, धुळे** यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकती पैकी पश्चिम : दक्षिण भागातील क्षेत्र २१०० चौ. फुट यासी चतु:सिमा पुर्वेस : याच प्लॉट नं. २४ पैकी भाग, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : याच प्लॉट नं. २४ पैकी भाग येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, , बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितांस तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १२/०९/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**

नोटरी भारत सरकार

रा. बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील स. नं. १७२/२ यापैकी प्लॉट नं. १९ एकूण क्षेत्र १८०.०० चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी लागू चतु:सिमा

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस : | ९ मी. रुंद रस्ता |
| पश्चिमेस : | स. नं. १७२/१ |
| दक्षिणेस : | प्लॉट नं. २० |
| उत्तरेस : | प्लॉट नं. १८ |

सदर मिळकत सुनिल मोहनलाल कांकरीया रा. नेहरु नगर, देवपूर, धुळे –४२४००१ यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी उपरोक्त मिळकत कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकत लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत इतर सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचा मिळकती निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १२/०९/२०२६

**ॲड.चेतन महादु यादव**

ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५, मिरच्या मारुती चौक, धुळे ४२४००१

मो. ९६८९१२४६९२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील स. नं. १७२/२ यापैकी प्लॉट नं. २३ एकूण क्षेत्र १८०.०० चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी लागू चतु:सिमा

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस : | ९ मी. रुंद रस्ता |
| पश्चिमेस : | स. नं. १७२/१ |
| दक्षिणेस : | प्लॉट नं. २४ |
| उत्तरेस : | प्लॉट नं. २२ |

सदर मिळकत सुनिल मोहनलाल कांकरीया रा. नेहरु नगर, देवपूर, धुळे–४२४००१ यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी उपरोक्त मिळकत कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकत लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत इतर सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचा मिळकती निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १२/०९/२०२६

**ॲड.चेतन महादु यादव**

ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५, मिरच्या मारुती चौक, धुळे ४२४००१

मो. ९६८९१२४६९२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील स. नं. १७२/२ यापैकी प्लॉट नं. २० एकूण क्षेत्र १८०.०० चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी लागू चतु:सिमा

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस : | ९ मी. रुंद रस्ता |
| पश्चिमेस : | स. नं. १७२/१ |
| दक्षिणेस : | प्लॉट नं. २१ |
| उत्तरेस : | प्लॉट नं. १९ |

सदर मिळकत सुनिल मोहनलाल कांकरीया रा. नेहरु नगर, देवपूर, धुळे–४२४००१ यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी उपरोक्त मिळकत कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकत लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत इतर सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचा मिळकती निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १२/०९/२०२६

**ॲड.चेतन महादु यादव**

ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५, मिरच्या मारुती चौक, धुळे ४२४००१

मो. ९६८९१२४६९२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कावठी ता. जि. धुळे येथील शेत गट नं. ६८३ चे एकूण क्षेत्र ला. ला. २ हे. ६३ आर. पो. ख. ० हे. ५३ आर, आकार रु. ३.३५ पैसे, भोगवटादार वर्ग–२, यांसी चतु:सिमा मंजूर गांव नकाशा प्रमाणे, येणे प्रमाणे वर्णन केलेली शेत मिळकत १) गणेश हिरामण न्हावी (सोनवणे),२) बाळू उर्फ बाळकृष्ण नारायण न्हावी (सोनवणे), ३) हरी नारायण न्हावी (सोनवणे) तिघे रा. कावठी ता. जि. धुळे, ४) संगीता अशोक ठाकरे रा. बडगुजर प्लॉट पारोळा रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी सदरहू शेत मिळकत कायम विक्रीचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना सक्षम प्राधिकार्याच्या पूर्व परवानगीने पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सहकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, मुखत्यारपत्र, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, हितसंबंध, वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. तसेच सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्याचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १२/०९/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**

नोटरी भारत सरकार

रा. बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँकांना, हित संबंधितांना सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन मौजे बाळापूर येथील गट नं. ३९/१/अ/१/ब पैकी प्लॉट नं. ६० चे एकूण क्षेत्र ३०१.७५ चौ. मी. बखळ प्लॉट यासी मापे व चतु:सिमा खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| पुर्वेस | : १६.५० मी. प्लॉट नं. ६१ |
| पश्चिमेस | : १९.०० मी. ९ मी.रस्ता |
| दक्षिणेस | : १७.०० मी. प्लॉट नं. ५९/ब |
| उत्तरेस | : १७.२५ मी. १२ मी. रस्ता |

येणे प्रमाणे ही मिळकत श्री. हेमंत भिकनचंद बोथरा व शैलेश हुकुमचंद संकलेचा दोन्ही रा. धुळे यांचे ताबे उपभोगातील मालकीची होती व आहे सदर मिळकत ही आमचे पक्षकाराने लेखी सौदा केला आहे. ह्या मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार संबंधीत व्यक्ती पूर्ण करणार आहे.

तरी सर्वांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित संबंध, देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपट्टा व लिज ताबा गहाण, मृत्यूपत्र, दान, बोजा, कर्ज, लिज, टाच वा वारस हक्क, खावटी, ज. मु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीसजाहीर झाल्यापासून ०८ दिवसांचे आंत योग्य त्या कागदपत्रांसह आमचे कार्यालयात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वनर्तमानपत्रात आल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत ही निर्बोज म्हणून खरेदी करतील. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस होय.

ठिकाण–धुळे,दिनांक– १२/०९/२०२६.

**ॲड.आशा शिवकुमार डोंगरे**

(नोटरी भारत सरकार)

एफ.५६ पहिला मजला गरुड कॉम्प्लेक्स, साक्रीरोड, धुळे

मो. ९९२३३६६१११

## श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे.

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त पतसंस्थेच्या सभासदांसाठी)**

श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळेच्या सर्व सभासदांना सविनय कळविण्यात येते की, पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७/०९/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता श्री. दिनेश कॉम्प्लेक्स, नेहरु चौक, आग्रारोड, देवपूर, धुळे येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती

**सभेपुढील विषय :-**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२६ या वर्षाचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद वाचून मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२६-२७ या वर्षाच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे व सन २०२५-२६ या वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५) सन २०२५-२६ चे ऑडीट रिपोर्ट वाचून त्याची नोंद घेणे.
६) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
७) सामोपचार कर्ज परतफेड अंतर्गत संचालक मंडळाने सन २०२५-२६ थकीत कर्जदारांना व्याजात दिलेल्या सुट रक्कमेस मान्यता देणे.
८) सन २०२६-२७ या वर्षासाठी सामोपचार कर्ज परतफेड योजना लागू करणेबाबत विचार करणे.
९) सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणेबाबत.
१०) मुदतीत येणाऱ्या प्रश्नांचा विचार करणे.
११) मा. चेअरमन यांच्या परवानगी ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

धुळे
दिनांक १२/०९/२०२६

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**राजेंद्र गंगाराम भदाणे**
मॅनेजर

**सभासदांसाठी विशेष सुचना :-**

१) कोरमच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी लगेच अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
२) ज्या सभासदांना वार्षिक हिशोबाबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दिनांक २४/०९/२०२६ पावेतो संस्थेच्या कार्यालयात दुपारी ३ वाजेपर्यंत लेखी प्रश्न पाठवावेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार करता येणार नाही. कोणत्याही सभासदास वैयक्तीक प्रश्न विचारता येणार नाही.

टीपः- दि. ३१/०३/२०२६ अखरेची आर्थिक पत्रके पतसंस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. संबंधित आर्थिक पत्रके सभासदांना कार्यालयीन वेळेत पहाता येतील.

पान १ वरुन

## ब्रिक्सने वीस वर्षे महत्त्वाकांक्षी अजेंड्यावर काम करावे

अध्यक्षपद दरवर्षी बदलत असल्याने विविध उपक्रम आणि निर्णयांचा प्रभावीपणे पाठपुरावा करण्यासाठी ट्रायका यंत्रणेचा अधिक प्रभावी वापर करता येईल, असे मोदी यांनी सुचवले. प्रत्येक निर्णयासाठी नोडल पॉईंट, निश्चित कालमर्यादा आणि अंमलबजावणीची स्थिती निश्चित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जागतिक प्रशासनाच्या सध्याच्या व्यवस्थेवर भाष्य करताना मोदी यांनी ती पिरॅमिडसारखी असल्याचे म्हटले. या व्यवस्थेत शक्ती आणि निर्णय वरच्या स्तरावर केंद्रीत असून, खालच्या स्तरावरील घटकांना निर्णय प्रक्रियेत पुरेसे स्थान मिळत नसल्याचे त्यांनी सांगितले. ही पिरॅमिडसदृष्य व्यवस्था अधिक सर्वसमावेशक आणि भागीदारीच्या मंचात बदलण्याची गरज आहे. मानवतेच्या विकासासाठी ग्लोबल गव्हर्नन्समध्ये सुधारणा करण्यासाठी ब्रिक्स देशांनी दहा ठोस प्रस्ताव तयार करावेत, असे आवाहन मोदी यांनी केले. या प्रस्तावांमध्ये प्रतिनिधित्व, जबाबदारी आणि नियमांची निर्मिती यांसारख्या मुद्द्यांना प्राधान्य देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणा आता टाळता येणार नाहीत, असेही मोदी यांनी स्पष्ट केले. आजच्या जागतिक परिस्थितीला अनुरूप मतदानाचे अधिकार आणि इतर धोरणांमध्ये बदल करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

## युद्ध सर्वांच्या हिताविरूध्द : शी जिनपिंग

सध्याच्या जागतिक परिस्थितीत ब्रिक्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगताना, ब्रिक्स देशांनी इतिहासाची योग्य बाजू घेत एकत्र उभे राहण्याची गरज असल्याचेही शी जिनपिंग यांनी नमूद केले. दरम्यान, २०२७ मध्ये चीन ब्रिक्सचे अध्यक्षपद स्वीकारणार असून, १९ व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे आयोजन चीनमध्ये केले जाणार असल्याची घोषणा जिनपिंग यांनी केली. मध्यपूर्वेत आणि आखातात शांतता व स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी चीन ब्रिक्सच्या सदस्य देशांसोबत महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## बारा राज्यात मुसळधार नंदुरबारला ऑरेंज अॅलर्ट

दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, आसाम, महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, केरळ, त्रिपुरा आणि नागालँड या राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या काळात वादळी वारे वाहतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

चौदा आणि पंधरा सप्टेंबरला उत्तर कोकण, उत्तर-मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा, विदर्भात बहुतेक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. संपूर्ण राज्यात बहुतेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्रातील चार जिल्हे वगळता संपूर्ण राज्यासाठी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. आज (दि. १३) उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत येलो अलर्ट देण्यात आला असून नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, यंदा राज्यात पावसाचे प्रमाण असमान आहे. अनेक भागात पावसाची तूट कायम आहे. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला असला तरी बहुतांश भाग कोरडे होते. पुढील दोन दिवसांत हवामान प्रणालीच्या सक्रियतेमुळे हवामान विभागाने राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता वर्तवली आहे. काही भागात मुसळधार पावसाची, तर काही भागात वादळी पावसाची शक्यता आहे.

## महिला आंदोलकांना जरांगेंचा संदेश

अमृताताई आणि लताताई यांच्या घरी जाऊन हळदी-कुंकू लावावे. त्या बाहेर आल्या नाहीत तर त्यावरही प्रश्न उपस्थित होतील. सरकारकडून महिलांना उन्हात उभे केले जाणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आंदोलनात मोठ्या संख्येने महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. मुंबईकडे निघताना मराठा समाजाने मान खाली घालण्याची वेळ येऊ देऊ नका, असे जरांगे यांनी म्हटले. मात्र, आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्याचे आवाहनही त्यांनी केले. पोलिसांनी आंदोलकांना अडवले तर ज्या ठिकाणी अडवतील, त्याच ठिकाणी शांतपणे बसून राहण्याचे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, आंदोलन दरम्यान हिंसाचार झाल्यास महाराष्ट्र बंद करण्याबाबतही जरांगे यांनी आक्रमक वक्तव्य केले. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी अडवू नये, असे आवाहन त्यांनी केले. पंधरा सप्टेंबरपासून मुंबईकडे

मनोज जरांगे पाटील यांच्या नियोजित मुंबई दौऱ्याचा मार्गही जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटी ते पाटोदा, बीड येथे पहिला मुक्काम, सोळा सप्टेंबरला श्रीगोंदा, अहिल्यानगर येथे दुसरा मुक्काम. सतरा सप्टेंबरला हडपसर, पुणे येथे तिसरा मुक्काम, अठरा सप्टेंबरला खोपोली, रायगड येथे चौथा मुक्काम, एकोणावीस सप्टेंबरला मुंबईतील आझाद मैदान येथे आगमन. मुंबईत पोहोचल्यानंतर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आझाद मैदानावर पुढील आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## लोक अदालतीच्या माध्यमातून मनपाच्या

लाभ घेतला. दरम्यान, नागरिकांची गैरसोय होऊ नये आणि कर भरण्याची प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी महानगरपालिकेच्या वतीने विशेष व्यवस्था करण्यात आली होती. महानगरपालिकेत टोकन काढून देण्यासाठी दोन स्टॉल लावण्यात आले असून, या स्टॉलवरही नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. टोकन घेऊन नागरिकांना कर भरण्याची प्रक्रिया पूर्ण करता येत होती.

या विशेष वसुली मोहिमेदरम्यान दुपारी एक वाजेपर्यंत एक कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता कर जमा झाल्याची माहिती मिळाली. थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी मनपाने केलेल्या आवाहनाला मिळालेल्या प्रतिसादामुळे महसूल वसुलीला चालना मिळाली आहे.

यावेळी महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, उपायुक्त हेमंत निकम, मनोज वाघ, सहायक आयुक्त सागर जकातदार, किशोर वाघ, राजेंद्र महेंद्र, किशोर शिंदे, वसुली अधीक्षक शिरीष जाधव, मुकेश अग्रवाल, के. जी. शेख, विद्या बाविस्कर यांच्यासह वसुली निरीक्षक व लिपिक उपस्थित होते.

## गरूड वाचनालयात आज सत्यशोधक मेळा

या पथनाट्यातून दिशा संदानशिव, सुनिता मोरे, भारती कोळी, माधुरी पाटील, निवेदिता कापडणेकर, रामेश्वर भदाणे, डी.ए.पाटील, संजय पाटील, प्रा.अशोक पवार आदि कलावंत आपला कलाविष्कार सादर करणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थितीचे आवाहन विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे एल.जे.गावीत, सुरेश मोरे, रतन सोनवणे यांनी केले आहे.

## तासंतास वाहतुकीचा होतो आहे खोळंबा

समृध्दी हायवेने जाणे पसंद करू लागले आहे. मात्र सार्वजनिक प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांना तसेच नाशिकहुन धुळ्याला व धुळ्याहुन मालेगाव किंवा नाशिकला जाण्यासाठी दुसरे पर्याय नसल्याने प्रवासी व वाहनचालकांना होणाऱ्या त्रासावर तोडगा निघणे आवश्यक झाले आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व एन.एच.ए.आय.च्या अधिकाऱ्यांनी समक्ष जावून परिस्थितीचा आढावा घ्यावा. व वाहतुक सुरळीत राहिल याची व्यवस्था करण्याचे निर्देश संबंधीतांना देणे गरजेचे झाले आहे.

पान १ वरुन

## वडिलांचा चिमुकल्या मुलींवर काचेच्या बाटलीने

काचेच्या बाटलीने व दगडांनी दोन्ही मुलींच्या डोक्यावर सपासप वार करून त्यांना गंभीर जखमी केले. घटनेनंतर दोन्ही चिमुकल्या रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडल्या होत्या. पत्नी राधिकाने तात्काळ नातेवाईकांशी संपर्क साधून स्थानिक नागरिकांच्या मदतीने रुग्णवाहिका मागवली. मुलींना प्रथम सोनगीर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना तातडीने धुळे येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवलं. मेडिकल कॉलेजच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना, शनिवारी सकाळी दुर्दैवाने मोठी मुलगी दिव्या (वय ४) हिची प्राणज्योत मालवली. तर लहान मुलगी नित्या (वय २) हिच्यावर अजूनही अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

विशेष म्हणजे, या घटनेतील संशयित आरोपी पती दिनेश सोलंकी हा स्वतः देखील १५ ते २० टक्के भाजलेल्या अवस्थेत जखमी आढळला आहे. त्याच्यावरही धुळ्यातील हिरे वैद्यकीय महाविद्यालयात पोलिसांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.

या संपूर्ण प्रकरणी पीडित आई राधिका सोलंकी हिच्या जबाबावरून संशयित आरोपी पती दिनेश आसाराम सोलंकी याच्याविरुद्ध सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रशांत ताकाटे हे पुढील तपास करत आहेत.

# श्री व्यंकटेश बालाजी संस्थानतर्फे रथोत्सवासाठी तेरा सप्टें.ला बैठक

**शिरपूर, दि.१२ शिरपूर शहरातील वर्षांची परंपरा असलेल्या श्री व्यंकटेश बालाजी संस्थान, वरचेगाव यांच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने वहनोत्सव, संस्थानचा वर्धापनदिन तसेच भव्य रथोत्सव आयोजित करण्यात येणार असून, या कार्यक्रमांच्या नियोजनासाठी दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजता बैठक बोलावण्यात आली आहे.**

संस्थानचे अध्यक्ष शरदकुमार शेडूराम अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत नवरात्रोत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन, भाविकांच्या सोयी-सुविधा, रथोत्सवाची तयारी तसेच कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनाबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

रविवार, दि.१३ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री वाजता श्री व्यंकटेश बालाजी मंदिर हॉल, वरचेगाव, शिरपूर, जि. धुळे येथे ही बैठक होणार आहे.

संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या वतीने सर्व संबंधितांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शिरपूर परिसरातील भाविकांसाठी श्री व्यंकटेश बालाजी संस्थानला धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असून, तब्बल वर्षांची परंपरा असलेल्या या संस्थानच्या नवरात्रोत्सवाकडे भाविकांचे विशेष लक्ष असते. नवरात्रोत्सवाच्या काळात विविध धार्मिक विधी, वहनोत्सव आणि रथोत्सवाच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण होते.

यंदाच्या उत्सवाचे नियोजन अधिक व्यापक आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यासाठी विश्वस्त मंडळ, भाविक व संबंधित कार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. उपस्थितीचे आवाहन करण्यात आले.

पान १ वरुन

## शिक्षणानेच जीवनात बदल होऊ शकतो

इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यामागील उद्देश व पार्श्वभूमी स्पष्ट केली. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे, त्यांना आपल्या विचारांची प्रभावीपणे मांडणी करण्याची संधी देणे आणि इंग्रजी भाषेचा आत्मविश्वासाने वापर करण्यास प्रोत्साहन देणे हा स्पर्धेचा प्रमुख हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेतील विविध गटांतील विजेत्यांमध्ये ग्रामीण लहान गट प्रथम श्रुती पंकज पाटील (आर.सी. पटेल प्राथमिक शाळा, टेकवाडे), द्वितीय ध्रुव जगदीश पाटील (आर.सी. पटेल प्राथमिक शाळा टेकवाडे), तृतीय ध्रुवी अमोल परदेशी (जिल्हा परिषद शाळा, पळासनेर).

ग्रामीण मोठा गट प्रथम नेहा राजेंद्र बंजारा (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बभळाज), द्वितीय आशिया कालू खाटीक (जिल्हा परिषद शाळा दहिवद), तृतीय गायत्री अनिल धनगर (आर.सी. पटेल प्राथमिक शाळा टेकवाडे).शहरी लहान गट प्रथम स्वरांश मिलिंद सोनवणे (आर.सी. पटेल मराठी प्राथमिक शाळा, शिरपूर), द्वितीय रियल हरीश बारी (एच. आर. पटेल कन्या प्राथमिक शाळा, शिरपूर), तृतीय प्रणिता चेतन जाधव (एच. आर.पटेल कन्या प्राथमिक शाळा, शिरपूर).

शहरी मोठा गट प्रथम नचिकेत कैलास कोळी (आर.सी. पटेल मराठी प्राथमिक शाळा, शिरपूर), द्वितीय कुमुदिनी राहुल सनेर (एच. आर. पटेल कन्या प्राथमिक शाळा, शिरपूर), तृतीय आरोही ज्ञानेश्वर सोनवणे (आर. सी.पटेल मराठी प्राथमिक शाळा, शिरपूर).आश्रम लहान गट प्रथम आरुषी रुस्तम पावरा (आर.सी.पटेल आश्रमशाळा, असली), द्वितीय वैष्णवी सुरेश पावरा (आर.सी.पटेल आश्रमशाळा, असली), तृतीय मेहुल भरत पावरा (आर.सी.पटेल आश्रमशाळा, वाघाडी).

आश्रमशाळा मोठा गट प्रथम भावेश राकेश पावरा (आर.सी. पटेल आश्रमशाळा, असली), द्वितीय पियुष जितेंद्र पावरा (आर.सी. पटेल आश्रमशाळा, निमझरी), तृतीय नेहा अशोक पावरा (आर.सी. पटेल आश्रमशाळा, शिरपूर). इंग्लिश मीडियम लहान गट प्रथम त्रिशा ज्ञानेश्वर थोरात (मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), द्वितीय जीवेश अजितसिंग राजपूत (आर.सी.पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय दिव्या राहुल शहा (अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर). इंग्लिश मीडियम मोठा गट प्रथम ग्रीष्मा सुमित अग्रवाल (अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर), द्वितीय आरोही दीपक चावला (मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय कैवल्य रवींद्र पाटील (आर.सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय अनुश्री नंदकिशोर पाटील (मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय अनिशा विजय भंडारी (अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर).

स्पर्धेचे परीक्षक म्हणून संस्थेच्या माध्यमिक विभागातील इंग्रजी शिक्षकांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक पाटील व सचिन बागुल यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्याध्यापक विवेकानंद ठाकरे यांनी केले.

पान १ वरुन

## नंदुरबार जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना

शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. कर्जबाजारीपणा, वाढता शेती खर्च आणि उत्पादनातील घट यामुळे शेतकऱ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण असून, जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांच्याही घटना घडत आहे. यामुळे खरीप पिकांसाठी पीकविमा आणि दुष्काळी मदत म्हणून शेतकऱ्यांना तातडीने एक लाख रुपयांची आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी., तसेच सरकारने यापूर्वी दिलेली कर्जे सरसकट माफ करावे आणि यंदा घेतलेली कृषी कर्जेदेखील माफ करण्याचा निर्णय घ्यावा,

पावसाअभावी शेतीबरोबरच पशुधनाचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने ग्रामीण भागात जनावरांसाठी पुरेसा चारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, महावितरणकडून शेतकऱ्यांना दिवसातून केवळ सहा तास वीजपुरवठा देण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे म्हणून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना दिवसाला १२ तास वीजपुरवठा सुरळीत देण्याचे आश्वासन दिले होते. त्यावर अंमलबजावणी करावी, आत्महत्याग्रस्त कुटुंबांना तातडीने मदत द्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलपणे विशेष उपाययोजना कराव्यात., संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना तातडीने आर्थिक तसेच प्रशासकीय मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी हा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे सध्याचे संकट केवळ एका शेतकऱ्यापुरते मर्यादित नसून त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणार आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री अहवालांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

नंदुरबार जिल्ह्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत न दिल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा जिल्हा सचिव दिनेश सोनवणे, तालुकाप्रमुख रमेश पाटील,किसान सेना जिल्हाध्यक्ष बापू राजपूत,अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष मन्नान गणी शिकलीकर, युवा सेना जिल्हासचिव अक्षय श्रीखंडे,इम्तियाज खान,प्रसाद माळी,वेबु पाटील यांनी दिला आहे.

### उठावना



**स्व ओमप्रकाश, कमलकिशोर**

बड़े दुख के साथ आपको सूचित किया जाता है कि स्व ओमप्रकाश, कमलकिशोर एवं राजीव इनके जिजाजी तथा धुलिया निवासी सुनील सिंघानिया इनके पिताजी अकोला निवासी श्रीमान बजरंगलालजी बद्रीलालजी सिंघानिया इनका दुखद निधन हो गया है।

इनका उठावना आज रविवार, दि १३-०९-२०२६ को समय शामको ४ बजे अग्रवाल भवन, ऊसगल्ली, धुलिया यहा पर है

-: शोकाकुल :-

कमलकिशोर मोहनलाल अग्रवाल

राजीव मोहनलाल अग्रवाल संजय ओमप्रकाश अग्रवाल

संदीप, दर्शन, यश, विनीत, करण एवं

समस्त केजडीवाल परिवार

फर्म:- अनुपम क्लॉथ स्टोअर तिरुपति ट्रांसपोर्ट अनुपम प्लाझा श्री बालाजी एंटरप्रायझेस

### उठावना एवं शोक बैठक



**स्व.शालिग्राम मूलचंदजी पटवारी**

(मृत्यू दि.११/०९/२०२६)

शोक संदेश - अत्यंत दुःख के साथ सूचित करना पड़ रहा है कि हमारे आदरणीय स्व. शालिग्राम मूलचंदजी पटवारी इनका दुःखद निधन दिनांक ११ सितंबर २०२६ को हो गया है। उनकी आयु ८८ वर्ष थी।

**उठावना (बैठक):** दिनांक: १३ सितंबर २०२६,

**रविवार समय:** दोपहर ३:०० बजे

**स्थान:** अग्रवाल भवन, धुलिया।

**शोक सभा (निजी निवास):** दिनांक: १३ सितंबर २०२६,

**रविवार समय:** सायं ५:०० से ७:०० बजे तक

**स्थान:** ईशा डेंटल क्लीनिक, लोहार गल्ली, नंबर-२, धुलिया।

-: शोकाकुल :-

**पुत्र :** सुशील पटवारी, संदीप पटवारी

**भतीजे :** दिलीप पटवारी, विलास पटवारी, शेखर पटवारी

**नातू :** डॉ.संकल्प पटवारी, एवं

**समस्त पटवारी परिवार, धुलिया।**

**पाहिजेत**

लेखी अकाउन्ट लिहिणारा जेष्ट जेण्टस लावणे आहे. कापड दुकानात काम करणेसाठी लेडीज/जेण्टस पाहिजेत.

-: संपर्क :-

मो.9423941247

**पाहिजेत**

मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.

-:संपर्क:-

9881118707

234494/237494

**पाहिजेत**

ऑफिस असिस्टंट पाहिजेत.

शक्यतो पदवीधर असावा.

: भेटण्याची वेळ :

दुपारी १२.०० ते २.००

दि. १३/०९/२६

-:संपर्क:-

फिजीक्सवाला बिल्डींग, जेएस टॉवर, प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे

8055401841

**माणुस पाहिजे**

आशुतोष सर्जीकल गल्ली नं. ५, सोन्या मारुती समोर, सावरीयाके बाजुमें बाहेर फिरण्यासाठी व ऑफिस कामासाठी

-:समक्ष भेटा:-

9422775376

**पाहिजेत**

लॉज कामासाठी खालील पदे भरणे आहेत.

मॅनेजर : १

कॅम्प्युटर ऑपरेटर : २ (महिला)

रुम बाय : ३

-:संपर्क:-

महाले रिजन्सी

आग्रारोड, धुळे

मो. 8551049444

**पाहिजे**

मेन्स वेअर शोरुमसाठी सेल्समन पाहिजे. अनुभव आवश्यक.

-:संपर्क:-

8888294987

**विकणे आहे**

अजळकर नगर रो हाऊस विकणे. सुरत बायपास जवळ अजळकर नगरमध्ये दोनमजली रोहाऊस घर फर्निचरसह विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज

94222 89693

**विकणे आहे**

नकाने रोडटच पाच एकर

नकाने रोट टच गावाला लागून पाच एकर जागा विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज

94222 89693

**विकणे आहे**

रामचंद्र नगर कॉंक्रीट रोडटच प्लॉट विकणे

कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगरमध्ये ६० फुटी कॉंक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज

94222 89693

**विकणे आहे**

अग्रवाल नगरच्या बाजूला 4 बीएचके फ्लॅट.

अग्रवाल नगर जवळ नवीन 4 BHK बीएचके फ्लॅट त्वरीत विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज

94222 89693

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



**शंकर विजय सॉ मिल**

प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे

फो. 9595397718, 9665886722

**विकणे आहेत**

२ बी-एच-के प्लॉट व दुकान विकणे आहेत.

**१ महिन्यात ताबा**

**१) इंदिरा आर्केड,**

प्लॉट नं. ६०, जयहिंद कॉलनी, मॉडर्न नर्सरी समोर, देवपूर, धुळे.

**२) उषा हाईटस्,**

प्लॉट नं. १०३, जयहिंद कॉलनी, सोना सुपर शॉप समोर, देवपूर, धुळे.

-: संपर्क :-

8698955000/9158478557

Godrej

27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट

BAJAJ FINSERV

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक

नियम व अटी लागू*

ak media- 238222

59 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०